



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ४ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०


## लाडकी बहीण योजनेतून 2,289 महिलांना वगळले

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेणा-या २,२८९ महिलांना वगळले आहे. योजनेतून वगळण्यात आलेल्या या महिला सरकारी कर्मचारी होत्या. अलिकडील काळात झालेल्या छाननीत या लाभार्थी महिला अपात्र असल्याचे आढळून आले, अशी माहिती महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली.लाडकी बहीण योजना ऑगस्ट २०२३ मध्ये महायुती सरकारने नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू केली होती. या योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकार २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपयांची आर्थिक मदत देते. मे महिन्यात, आदिती तटकरे यांनी पहिल्यांदाच स्पष्ट केले होते की, चालू पडताळणी प्रक्रियेदरम्यान लाडकी बहीण योजनेत २,२०० हून अधिक सरकारी कर्मचारी महिला अपात्र लाभार्थी म्हणून आढळून आल्या आहेत. दरम्यान, राज्य सरकारकडून इतर अपात्र महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यासाठी आणि लाभ वितरण प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणखी चौकशी सुरू आहे.

### प्राप्तिकर छाननी होणार

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अर्जांच्या प्राप्तिकर छाननीसाठी लागणारी माहिती उपलब्ध करून देण्यास केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) तयारी दर्शवली आहे. ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर सर्व २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींच्या अर्जांची पडताळणी होणार आहे. परंतु राज्यातील विधानसभा निवडणुकीचे चित्र पलटवणा-या या योजनेची प्राप्तिकर पडताळणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत होण्याची शक्यता कमी आहे.

# मराठीवरून मविआत फूट?

### काँग्रेसला बोलावले नाही, आता ठाकरेंच्या मेळाव्याला शरद पवार जाणार नाहीत

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून राज्यात वातावरण तापलेले पाहायला मिळत आहे. पहिली पासून हिंदीची सक्ती नको, अशी भूमिका राज्यातील अनेक संघटना आणि विरोधी पक्षांची होती. याच मुद्द्यावरून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्रित येउन मोर्चा काढणार होते. परंतु, त्यापूर्वीच सरकारकडून त्रिभाषा सूत्राचे दोन्ही जीआर रद्द करण्यात आले. मात्र आता त्याच दिवशी ठाकरे बंधू एकत्र येउन विजयी मेळावा साजरा करणार आहेत. यावरून महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे पाहायला मिळत आहे. या मेळाव्याचे निमंत्रण काँग्रेसला देण्यात आलेले नसून, ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आता शरद पवारही जाणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.



५ जुलैच्या ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याचे निमंत्रण काँग्रेसला मिळाले नसल्याचे म्हटले जात आहे. आम्हाला अजून तसे काही निमंत्रण मिळालेले नाही किंवा सांगण्यात आलेले नाही. कदाचित हे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा इव्हेंट असू शकतो. ५ जुलै हा मोर्चा काढण्यासाठी दिवस ठरला होता. पण हा जीआर रद्द झाला आहे असे मला अजूनही वाटत नाही. कारण नरेंद्र जाधव समिती नेमली आहे. त्यामुळे मुंह में राम, बगल में नथुराम या भाजपाच्या नितीपासून जपून राहणे आवश्यक आहे. ५ जुलैचा दिवस मराठी लोक साजरा करतील, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते अतुल लोंढे यांनी दिली होती. यानंतर आता शरद पवार हेही ठाकरे बंधूंच्या कार्यक्रमाला हजर राहणार नाहीत. पत्रकारांशी संवाद साधत असताना शरद पवार यांना यासंदर्भात प्रतिक्रिया विचारण्यात आली. मराठीच्या मुद्द्यावर ०५ जुलै रोजी ठाकरे बंधू एकत्र येउन विजयी मेळावा घेत आहेत, यात तुमचा पक्ष सहभागी असणार का, असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. यावर बोलताना, ठाकरे बंधूंच्या मेळाव्याबाबत माहिती नाही. आमच्या पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील हे काल मला भेटले होते. ते म्हणाले होते की, या सगळ्या कामात आम्ही सहभागी होणार आहोत. त्यामुळे पक्षाच्या अध्यक्षांचा निर्णय हा आम्हाला शिरसावंद्य असतो, असे शरद पवार यांनी सांगितले. तुम्ही या मेळाव्याला जाणार का, असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर शरद पवार यांनी नकारात्मक उत्तर दिले. नाही. मी त्या मेळाव्याला जाणार नाही. माझे कार्यक्रम दुसरीकडे आहेत, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

## नागपंचमीला जिवंत नागाची पूजा करण्यास परवानगी द्या

### आमदारांची विधानसभेत मागणी; सरकार केंद्राशी चर्चा करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजप आमदार सत्यजित देशमुख यांनी सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा शहरात नागपंचमीला जिवंत सापांची पूजा करण्याची प्रथा पुन्हा सुरू करण्याची मागणी केली. इतर अनेक आमदारांनी या मुद्याला पाठिंबा दिला. दरम्यान, नागपंचमीला जिवंत सापांची पूजा पुन्हा सुरू करण्याच्या मागणीला महाराष्ट्र विधानसभेत मोठा राजकीय पाठिंबा मिळाला आहे. बुधवारी भाजप आमदार सत्यजित देशमुख यांनी या मुद्यावरील लक्षवेधी प्रस्तावाअंतर्गत राज्य सरकारला विशेष विनंती केली की सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा शहरात ही पारंपरिक प्रथा पुन्हा सुरू करावी. देशमुख यांच्या मागणीला विधानसभेतील इतर अनेक आमदारांचाही पाठिंबा मिळाला आहे. तसेच या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, ते केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्यासमोर हा मुद्दा मांडतील आणि ७-८ जुलै रोजी एक बैठकही आयोजित करण्यात आली आहे. यावेळी नाईक यांनी सांगितले की, नागपंचमीला जिवंत सापांची पूजा स्थानिक लोकांच्या धार्मिक श्रद्धेशी संबंधित आहे आणि सरकार नियमांनुसार त्याचा पुनर्विचार करेल जेणेकरून ही परंपराही जतन होईल आणि सापांना इजा होणार नाही. बत्तीस शिराळा शहर श्रावण महिन्यात साज-या होणा-या नागपंचमीला जिवंत सापांची पूजा करण्याच्या जुन्या प्रथेसाठी ओळखले जाते. २००२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने बत्तीस शिराळा येथे जिवंत नाग-सापांच्या प्रदर्शनावर आणि पूजेवर बंदी घातली होती. वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत हा आदेश देण्यात आला होता. पर्यावरण कार्यकर्त्यांनी असा युक्तिवाद केला होता की यामुळे सापांना नुकसान होते. आमदार देशमुख यांनी हा दावा फेटाळून लावला आणि सांगितले की नाग पंचमीला स्थानिक लोक सापांना इजा न करता त्यांची पूजा करतात आणि नंतर त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडले जाते. जल्लीकट्टू प्रकरणाचा संदर्भ देत देशमुख म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने ज्या प्रकारे तामिळनाडूमध्ये प्रचलित असलेल्या पारंपरिक खेळाला पुन्हा मान्यता दिली, त्याचप्रमाणे नागपूजेसाठीही केली पाहिजे.



## दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आदित्य ठाकरेंना क्लीन चिट

**मुंबई/प्रतिनिधी :** सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणी नवा ट्विस्ट समोर आला आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरेंना क्लीन चिट मिळाली आहे. दिशाची हत्या झाल्याचे किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचार झाल्याचे पुराव्यांतून सिद्ध झालेले नाही, असे पोलिसांनी म्हटले आहे.सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियनची हत्या झाल्याचे किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारचा लैंगिक अत्याचार झाल्याचे वैद्यकीय आणि वैज्ञानिक पुराव्यांतून सिद्ध झालेले नाही, अशी माहिती मुंबई पोलिसांनी बुधवारी उच्च न्यायालयात दिली. दिशा सालियनच्या वडिलांनी केलेल्या याचिकेत शिवसेना (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात आला होता. या याचिकेवर पोलिसांनी हे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. दिशाची हत्या झाल्याचा आणि त्यापूर्वी तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याचा दावा करून प्रकरणाची सीबीआय



चौकशी करण्याच्या मागणीसाठी तिचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे ही याचिका बुधवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी मालवणी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकांनी या प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल केले. या प्रतिज्ञापत्रात सतीश यांनी केलेल्या दाव्यांचे खंडन केले आहे. प्रतिज्ञापत्रात घटनेच्या दिवशी नेमके काय घडले हे नमूद केले आहे. तसेच घटनेच्या वेळी दिशासह असलेला तिचा प्रियकर आणि मित्रांनी दिलेल्या जबाबात सत्य असल्याचे म्हटले आहे. दरम्यान दिशा सालियन मृत्यूप्रकरणी निर्णय देण्याआधी आपली बाजू ऐकून घ्यावी, अशी मागणी आदित्य ठाकरे यांच्या वतीने बुधवारी उच्च न्यायालयात करण्यात आली. ठाकरे यांनी हस्तक्षेप याचिकेद्वारे ही मागणी केली. या प्रकरणी आपण प्रतिवादी नसलो तरीही आपलं नाव राजकीय सूडबुद्धीने गोवण्यात आलं आहे. आपल्याविरोधात द्वेषाने, वैयक्तिक आणि राजकीय सूड उगावण्यासाठी खोटी, निरर्थक याचिका केल्याचा दावाही केला आहे.

## राणेंच्या मुलाने नाक घासून माफी मागितली पाहिजे–राऊत

**मुंबई :** दिशा सालियन प्रकरणात सगळ्यात आधी देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागितली पाहिजे, त्यानंतर नारायण राणेंचा मुलगा जो मंत्री आहे त्याने नाक घासून माफी मागितली पाहिजे, अशी टीका राउतांनी केली. सत्ता आणि यंत्रणेचा गैरवापर करून तुम्ही एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करायला बघता, लक्षात ठेवा एक दिवस तुमच्यावर डाव उलटणार, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राउत माध्यमांशी बोलताना म्हणाले. दिशा सालियन प्रकरणात पोलिसांनी बुधवारी उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले, मात्र विविध पुराव्यांचा दाखला देत पोलिसांनी उच्च न्यायालयात दावा केला की या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा घातपात किंवा हत्येचा प्रयत्न दिसत नाही. या प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचे नाव भाजपच्या नेत्यांकडून घेतले जात होते. यावर, शिवसेनेचे खासदार संजय राउत यांनी आज सकाळी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस आणि सरकारमधील मत्र्यांवर जोरदार टीका केली आहे. नारायण राणे यांच्या दोन भाउ एकत्र आल्याने काही फरक पडणार नाही या वक्तव्याचा राउतांनी चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, ज्या व्यक्तीने दोन-तीन वेळा पक्ष बदलला आहे, जो व्यक्ती स्वतःचा पक्ष चालवू शकत नाही अशा व्यक्तीला महाराष्ट्र गांभीर्याने घेत नाही.

## 2 लाख 26 हजार कुणबी जात प्रमाणपत्रांचे वाटप

### सर्वाधिक 1 लाख 53 हजार 356 प्रमाणपत्र बीड जिल्ह्यात

**छ. संभाजीनगर /प्रतिनिधी :** मनोज जरांगे यांनी केलेल्या आंदोलनानंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने नोंदी आधारे कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्याचा निर्णय घेतला होता. आतापर्यंत मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये २ लाख २६ हजार २१७ कुणबी जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. तसेच, ३९७ अर्ज नाकारण्यात आलेले आहेत. यात सर्वाधिक १ लाख ५३ हजार ३५६ प्रमाणपत्र बीड जिल्ह्यात वितरीत करण्यात आलेले आहेत. मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण केल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणबी नोंदी तपासण्यासाठी शिंदे समितीची स्थापना केली होती. यानुसार, मराठवाड्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यात कुणबी नोंदी शोधण्याचे काम सुरू करण्यात आले. ऑक्टोबर




२०२३ पासून शिंदे समितीमार्फत सरकारी दस्तऐवजांमध्ये कुणबी नोंदीचा शोध सुरू करण्यात आला. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांत नोंदी शोधण्याचे काम झपाट्याने सुरू करण्यात आले होते.

विभागात आतापर्यंत २ कोटी २१ लाख ५२ हजार ६५६ कागदपत्रे तपासण्यात आली आहेत. यातून ४७ हजार ८३८ नोंदी आढळून आल्या आहेत. यात २२ हजार ५१५ नोंदी बीड जिल्ह्यात आढळल्या आहेत. नोंदीची तपासणी करण्यासाठी जिल्हा कक्ष कार्यकारिणी गठित करून प्रत्येक जिल्ह्यात अभिलेख पडताळणीसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यात वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूल पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्यात येते.

**१५११ गावांत आढळल्या नोंदी**

मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांतील १५११ गावांमधील अभिलेखांमध्ये कुणबीची नोंद आढळली आहे. या नोंदी आधारे प्रशासनाकडून जात प्रमाणपत्र देण्याचे वाटप सुरू करण्यात आलेले आहे.

## शुबमन गिल 'NO.1'


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल याने इंग्लंडविरुद्धच्या दुस-या कसोटी सामन्यात आज बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन येथे इतिहास रचला. दमदार कामगिरी करत गिलने सुनील गावस्कर, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर आणि रवि शास्त्री यांना मागे टाकले. आता तो इंग्लंडमध्ये कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडूने बनला आहे.



त्याने तब्बल ४६ वर्षांपूर्वीचा सुनील गावस्कर यांचा महा विक्रम मोडला आहे. माजी भारतीय क्रिकेटर सुनील गावस्कर यांनी १९७९ मध्ये द ओव्हल येथे २२१ धावांची खेळी केली होती. याशिवाय राहुल द्रविडने २००२ मध्ये द ओव्हल येथेच २१७ धावा फटकावल्या होत्या. या यादीत पुढचे नाव क्रिकेटचा देव म्हणवल्या जाणा-या सचिन तेंडुलकरचे आहे, त्याने २००२ मध्ये लीड्स येथे १९३ धावांची खेळी केली होती. तर रवी शास्त्री यांनीही ओव्हल येथे १९९० मध्ये शानदार फलंदाजी करत १८७ धावा केल्या होत्या. आता शुबमन गिलने या सर्वांना मागे टाकत अव्वल स्थान मिळवले आहे. त्याने इंग्लंडच्या सर्वच गोलंदाजांची जबरदस्त धुलाई केली. शुबमन गिलने कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच २०० धावांचा टप्पा ओलांडला. या खेळीत त्याने २६९ धावा कुटल्या. त्याच्या फलंदाजीचे सर्व जण कौतुक करत आहेत. या सामन्यात त्याने यशस्वी जयस्वालसोबत तिस-या विकेटसाठी ६७ धावांची मौल्यवान भागीदारी केली. यानंतर, ऋषभ पंत आणि गिल यांनी चौथ्या विकेटसाठी ४७ धावांची भागीदारी केली. या सामन्यात शुबमन गिल व्यतिरिक्त अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजानेही शानदार कामगिरी केली आणि ८९ धावा केल्या. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी २०३ धावा जोडल्या.

## पाकिस्तान आशिया कप हॉकीसाठी भारत दौ-यावर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आणि पाकिस्तानमधील तणाव असूनही, हॉकी आशिया कप आणि ज्युनियर हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी पाकिस्तान संघाला भारतात येण्यापासून रोखले जाणार नाही. क्रीडा मंत्रालयाच्या एका सूत्राने पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, आम्ही



द्विपक्षीय मालिकेच्या विरोधात आहोत, परंतु आम्ही कोणत्याही संघाला या स्पर्धेसाठी भारतात येण्यापासून रोखणार नाही.

मंत्रालयाच्या अधिका-याने सांगितले की, 'आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये, तणाव असूनही संघ सहभागी होतात. रशिया आणि युक्रेन युद्ध असूनही स्पर्धा खेळत आहेत. हॉकी आशिया कप २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान बिहारमधील राजगीर येथे खेळला जाईल.' भारत आणि पाकिस्तान क्रिकेट संघांमधील आशिया कप सामन्याबद्दल अधिका-याने सांगितले की, 'बीसीसीआयने अद्याप सरकारशी याबद्दल बोललेले नाही. बोर्डाकडून चर्चा होताच, आम्ही आशिया कपमध्ये टीम इंडियाच्या सहभागाबाबत निर्णय घेउ.' पाकिस्तान हॉकी बोर्डाने स्पर्धेत सहभागी व्हायचे की नाही याबद्दल अद्याप कोणतेही विधान जारी केलेले नाही. परंतु त्यांनी स्पर्धेतून स्वतःला दूर ठेवलेले नाही, ज्यामुळे संघ खेळण्यासाठी भारतात येईल असे मानले जात आहे.भारत आणि पाकिस्तानमध्ये १८१ ह?की सामने खेळले गेले. त्यापैकी पाकिस्तानने ८२ तर भारताने ६७ सामने जिंकले. ३२ सामने अनिर्णित राहिले. हॉकी इंडियाचे महासचिव भोलानाथ सिंग म्हणाले होते की, पाकिस्तान संघ आशिया कपसाठी येईल की नाही हे सांगणे खूप लवकर आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि भारताचे ऑपरेशन सिंदूर गेल्या महिन्यातच घडले. त्यामुळे सध्या काहीही सांगणे कठीण आहे. आम्ही शांतता प्रस्थापित होण्याची वाट पाहत आहोत. सरकार जे काही निर्देश देईल ते आम्ही पाळू.

## सोन्याच्या दरात प्रत्येक तासात बदल

### ■ प्रथम वाढले, त्यानंतर घसरण ■

**मुंबई/प्रतिनिधी :**सोन्याचे दर २४ कॅरेटमध्ये जीएसटी व मेकींग शुल्क वगळून एक लाख रुपये प्रति दहा ग्रामवर पोहचल्यावर काही दिवसांनी चांगलेच घसरले होते. परंतु त्यानंतर पून्हा दर वाढत आहे. गुरूवारी (३ जुलै २०२५) सोन्याचे दर बाजार उघडल्यावर पहिल्या तासातच वाढण्याचे संकेत होते. परंतु त्यानंतरच्या तासात सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली.नागपुरातील सराफा बाजारात १३ जुनला जीएसटी व मेकिंग शुल्क वगळून सोन्याच्या दराने २४ कॅरेटमध्ये प्रति दहा ग्राम १ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला होता. या दिवशी नागपुरात दुपारी प्रति १० ग्राम २४ कॅरेटसाठी १ लाख रु पये रुपये, २२ कॅरेटसाठी ९३ हजार रुपये, २२ कॅरेटसाठी ७८ हजार रुपये, १४ कॅरेटसाठी ६५ हजार रु पये नोंदवले गेले. हे दर ३ जुलै २०२५ रोजी सकाळी बाजार उघडल्यावर १०.३० वाजता प्रति १० ग्राम २४ कॅरेटसाठी ९७ हजार ८०० रुपये, २२ कॅरेटसाठी



९१ हजार रुपये, २२ कॅरेटसाठी ७६ हजार ३०० रुपये, १४ कॅरेटसाठी ६३ हजार ६०० रु पये होते. हे दर एक तासांनी ११.३० वाजता वाढून प्रति १० ग्राम २४ कॅरेटसाठी ९८ हजार रु पये, २२ कॅरेटसाठी ९१ हजार १०० रु पये, २२ कॅरेटसाठी ७६ हजार ४०० रुपये, १४ कॅरेटसाठी ६३ हजार ७०० रुपये होते. हे दर आणखी एक तासांनी १२.३० वाजता घसरून प्रति १० ग्राम २४ कॅरेटसाठी ९७ हजार ६०० रुपये, २२ कॅरेटसाठी ९० हजार ८०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७६ हजार १०० रुपये, १४ कॅरेटसाठी ६३ हजार ४०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे आता सोन्याचे दर आणखी घसरण्याचे संकेत दिसत आहे. नागपुरातील सराफा बाजारात मेकिंग व जीएसटी शुल्क वगळता चांदीचे दर प्रति किलो ३ जुलैला सकाळी १०.३० वाजता १ लाख ७ हजार ५०० रु पये होते. हे दर १ तासांनी ११.३० वाजता प्रति किलो १ लाख ८ हजार ३०० रु पये तर त्यानंतर तासभरांनी १२.३० वाजता १ लाख ८ हजार ५०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे चांदीच्या दरातही प्रत्येक तासात बदल बघायला मिळत आहे. सोने- चांदीच्या दरातील बदलामुळे ग्राहकांमध्ये खरेदीबाबत संभ्रम आहे.

### शिक्षक भरती घोटाळा!

## शिक्षणाधिकारी कार्यालयातील अधीक्षक सलामे यांना अटक

**भंडारा :** शिक्षक भरती घोटाळ्यात अटकसत्र सुरू असतानाच सदर पोलीस ठाण्यात आणखी एका अधिका-यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद भंडारा (सध्या नेमणूक शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय गडचिरोली) कार्यालयातील अधीक्षक आरोपी रवींद्र पंजाबराव सलामे यांना आज अटक करण्यात आली.सलामे यांच्यावर नागपूर पोलिसांत भादंविचे कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७२, ४०९, १२० ब, ३४ या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून ६ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. शिक्षक भरती घोटाळ्यातील आरोपी पराग नानाजी पूडके राहणार लाखनी हा कधीही कोणत्याही शाळेमध्ये सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्तीच नसताना त्याचे नानाजी पूडके विद्यालय जेवणाळा या शाळेतील मुख्यध्यापक पदाचे नियुक्ती करीता त्याने बनावट शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर यांचे नियुक्ती मान्यता आदेश, सेवा सातत्य, एस के. बी शाळा यादव नगर नागपूर या शाळेचे लेटरहेडवर बनावट अनुभव प्रमाणपत्र गुन्ह्यातील अटक आरोपी महेंद्र म्हैसकर याचे सोबत कट कारस्थान रचून व गैर व्यवहार करून तयार करून सलामे यांच्याकडे प्रस्ताव सादर केले होते.

### डाबर च्यवनप्राशची बदनामी प्रकरण

## पंतजलीला कोर्टाचा दणका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बाबा रामदेव यांच्या पंतजलीला दिल्ली उच्च न्यायालयाने झटका दिला असून पंतजली आयुर्वेदकडून डाबर च्यवनप्राश बद्दल जी जाहिरात केली जात आहे त्यासंदर्भात न्यायालयाने महत्त्वाचे आदेश दिले आहेत. डाबर च्यवनप्राशबद्दल जी दिशाभूल करणारी आणि नकारात्मक जाहिरात केली जात आहे, ती बंद करा असे न्यायालयाने पंतजलीला सांगितले. डाबर इंडियाने पंतजली आयुर्वेद विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पंतजली आयुर्वेद त्यांच्या जाहिरातींमधून डाबर च्यवनप्राशबद्दल चुकीची माहिती देत असून बदनाम करत आहे. ग्राहकांची डाबर च्यवनप्राशबद्दल दिशाभूल करत आहेत असे आरोप याचिकेतून करण्यात आले होते. दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मिनी पुष्कर्णा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने डाबर इंडियाला दिलासा दिला. याचिका स्वीकारताना पंतजलीला डाबर च्यवनप्राशबद्दलच्या जाहिरात बंद करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

## कृष्णा आंधळेपासून देशमुख कुटुंबाला धोका

### धनंजय देशमुख यांची भीती

**केज :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला तब्बल २०५ दिवस उलटले असले तरी, या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. त्याच्यापासून आमच्या कुटुंबीयांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे अशी भीती व्यक्त करत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी पोलिस प्रशासनाला इशारा दिला. जर कृष्णा आंधळेला तत्काळ अटक झाली नाही, तर लवकरच कठोर भूमिका घेउ असे त्यांनी माध्यमांना सांगितले. धनंजय देशमुख म्हणाले, आरोपींचे समर्थक



आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी न्यायालयातील सुनावणीच्या दिवशी पक्षचिन्हांच्या गाड्या घेउन मोठ्या संख्येने येतात. ते न्यायालयाबाहेर भयभीत करणारे वातावरण निर्माण करून देशमुख कुटुंबीयांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. याशिवाय या प्रकरणातील सर्व आरोपींना वेगवेगळ्या तुरुंगात पाठवण्यात यावे अशी मागणी केली. परंतु, ही मागणीदेखील दुर्लक्षित केली जात आहे. सर्व आरोपींना एकाच तुरुंगात ठेवल्याने ते कटकारस्थान करत असल्याचा संशय धनंजय देशमुख यांनी व्यक्त केला.



# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा सरकारची डोकेदुखी वाढणार

## ७ जुलै पासून 'सातबारा कोरा कोरा कोरा' यात्रेला प्रारंभ



**अमरावती -** राजकारणापेक्षा शेतकऱ्यांचे प्रश्?न मोठे मानणाऱ्या बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून सरकारला आव्हान दिलं आहे. ७ जुलै रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जन्मभूमी पापळ येथून सुरू होणारी '७/१२ कोरा कोरा कोरा यात्रा' ही केवळ पदयात्रा नसून, ती शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या न्यायहक्कासाठीचा ऐतिहासिक आवाज ठरणार आहे. या ७ दिवसीय यात्रेचा शुभारंभ बुधवार दि.७ जुलै रोजी पापळ येथून होणार असून, १४ जुलै रोजी चिलगव्हाण (स्व. साहेबराव करपे – पहिल्या शेतकरी आत्महत्येचे गाव) येथे या यात्रेचा समारोप होईल. १३८ किलोमीटरचे अंतर पार करताना ही यात्रा तब्बल २३ गावांमधून मार्गक्रमण करणार असून, प्रत्येक ठिकाणी सभा, चर्चा, जनसंवाद व आंदोलनात्मक थांबे नियोजित आहेत.अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सत्ताधाऱ्यांकडून मोठी आशा होती मात्र या सरकारने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरून शेतकऱ्यांना संकटात टाकले आहे. जगाचा पोशिंदा आजही अनेक संकटांचा सामना करून आपल्या कुटुंबाचा होईल तसा उदरनिर्वाह करत आहे.सरकार काहीतरी मार्ग काढेल या भ्रमात ते आहेत.काही शेतकरी मात्र दुर्दैवाने आजही आत्महत्येसारखा निर्णय घेऊन आपले जीवन संपवित आहेत त्यामुळे शेतकरी वर्गाला आता बच्चू कडू यांच्या या यात्रेकडून आस लागलेली असून जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण विदर्भातून शेतकरी वर्ग या यात्रेमध्ये सामील होणार आहे. पदयात्रेच्या माध्यमातून केवळ नारे देण्यापेक्षा ग्रामीण भागातील कणाहीन झालेल्या प्रश्नांना पुन्हा एकदा धार देण्याचा प्रयत्न बच्चू कडू करत आहेत. यात्रा जरी १३८ किलोमीटरची असली, तरी शेतकऱ्यांच्या संघर्षाचा मार्ग यापेक्षा कितीतरी मोठा व कठीण आहे. आता 'सातबारा कोरा कोरा'चा नारा केवळ घोषवाक्य न राहता, परिवर्तनाची दिशा ठरेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.प्रत्येक गावात स्थानिक प्रश्न, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय, विधवा, बेरोजगार तरुण, मनरेगा कामगार, मेंढपाळ व मच्छीमार यांच्या स्वतंत्र धोरणावर,वंचितांचे संघटन यावर देखील चर्चा होणार आहे.

### असा असणार यात्रेचा मार्ग

७ जुलै – पापळ ते दोनद : सुसंवाद सभा
८ जुलै – उंबरडा बाजार, लोहा, तरगोडी, मानकी येथे मुक्काम
९ जुलै – मानकी, वखार, तळेगाव, दारव्हा : प्रश्नमंजुषा, संवाद
१०जुलै – वखार, तिवरी, लाइखिंड : जनआव्हान, सभा
११ जुलै – तिवरी, चिरकुटा, तुपटाकळी : सभा व मुक्काम
१२ जुलै – तुपटाकळी, बसमतनगर, काळी दौलत : प्रश्नसत्र
१३ जुलै – काळी दौलत, माकडखिंडी, गुंज : शेवटचे सत्र, समारोप
१४ जुलै – गुंज ते चिलगव्हाण : ऐतिहासिक समारोप सभा

### या असतील प्रमुख मागण्या

७ जुलै पासून सुरू होणाऱ्या सातबारा कोरा कोरा कोरा या यात्रेमध्ये बच्चू कडू यांच्या शेतकऱ्यांसाठी काही प्रमुख मागण्या असणार आहेत. ज्यामध्ये सक्तीची कर्जवसुली त्वरित थांबवावी,१००ङ कर्जमाफी लागू करावी,आत्महत्या रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावेत,मनरेगा मजुरीत वाढ व ग्रामीण रोजगार विस्तार करावा,दिव्यांग, विधवा, युवकांसाठी नोकरी व सुरक्षा योजनांची अंमलबजावणी , मेंढपाळ व मच्छिमार यांच्या समस्या व धोरज्ञ , ग्रामपंचायत कर्मचारी ई. मागण्या घेऊन बच्चू कडू हे शासनाला सळो की पळो करून सोडणार आहेत.

## १ व १० वरिल उर्वरित

### परतवाडा पोलीस ठाण्याच्या

नगर, नारायणपूर मार्ग येथे बुधवारी मध्यरात्री सुमारे २.३० वाजता घडली.

**हत्यारबंद दरोडेखोरांचा थरार-** प्राप्त माहितीनुसार, ४ ते ५ अज्ञात दरोडेखोरांनी मध्यरात्री डहाके दाम्पत्याच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. घरात शिरताच त्यांनी जानराव डहाके यांच्यावर चाकूने हल्ला करून त्यांचे हात-पाय बांधले. त्यानंतर त्यांच्या पत्नीलाही बांधून ठेवत संपूर्ण घरात उधळापात करत सुमारे ९ लाख रुपये रोकड, सोनं-चांदीचे दागिने, मोबाइल फोन व इतर मौल्यवान वस्तू लुटून नेल्या. घरातील चार खोल्यांमध्ये साठवलेली वस्त्रे, कपाटे, ड्रॉवर सर्व उघडून त्यांनी त्यातली मौल्यवान वस्तू घेतली. सुमारे ३० ते ३५ मिनिटे दरोडेखोरांनी घरात दहशत निर्माण केली होती.

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण-** या घटनेनंतर परतवाडा शहरात नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे लोकांनी पोलिस प्रशासनाकडे सुरक्षा वाढवण्याची मागणी केली आहे. तसेच, आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर शिक्षा व्हावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. ही घटना परतवाडा शहरातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना दर्शवते आणि पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

### माजी मंत्री जगदीश गुप्ता ७ जुलै

सात जुलैला ते समर्थकांसह प्रवेश करणार आहे. गेल्या तीन महिन्यापासून त्यांच्या शिंदे सेना मध्ये प्रवेशाची चर्चा सुरू होती. यासंदर्भात त्यांनी समर्थकांकडून संमती पत्र सुद्धा भरून घेतला होता. समर्थकांनी त्यांना लिखित संमती दिल्यानंतर ते आता शिंदे सेना मध्ये प्रवेश करत आहे. यामुळे गेल्या तीन महिन्यापासून सुरू चर्चांना आता विराम लागला आहे.

### दर्यापूर तहसिलच्या नविन

शासकीय योजना यामध्ये श्रावण बाळ योजना,संजय गांधी निराधार योजना यासह प्रशासनाच्या संबंधित योजना या तहसिल कार्यालयात राबविण्यात येत असतात. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कागदपत्रे प्राथमिक स्तरावर महत्त्वाचे आहे. सद्यस्थितीत असलेल्या पोलिस स्टेशन मागिल तहसिल मध्ये अतोनात गर्दी जमलेली असते. तहसिल कार्यालयात अपुरी जागा असून वाहनांना ठेवण्यासाठी जागा सुद्धा कमी पडत आहे. मोटर सायकल व मोठे वाहन हे रस्त्यावर ठेवल्यामुळे तेथिल परिसरातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. ग्रामिण भागातून वयोवृद्ध नागरिक हे पहाटेपासून सावलीच्या शोधात कामे करण्यासाठी बसलेली असतात. तर अनेकदा सर्वर डाऊन असल्याने नागरिकांना, वयोवृद्धांना मोठी अडचणी निर्माण होते. या सर्व बाबींची शासनाने टिपणी करून दर्यापूर मधिल अमरावती रोडवर बांधण्यात आलेली टोलेजंग नविन इमारत याचे रितसर उद्घाटन करून सर्वसामान्य नागरिकांना तहसिल खुली करावी अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे. दर्यापूर येथिल तहसिल चे नविन बांधकाम झाले असून गेल्या सहा महिन्यापासून इमारत ही उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. विधानसभेची निवडणूक प्रक्रिया उद्घाटनाशिवायचं नविन इमारतीत पार पडली होती.

### पेट्रोल टँकरच्या धडकेत

**कुटुंबीयांचा आक्रोश-** ट्रॅकरच्या चाकाखाली आल्याने महिलेचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आला असून कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. तर पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रॅकर ताब्यात घेतला असून सिटी कोतवाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

**आपत्कालीन यंत्रणा नाही पोहोचली वेळेवर-** माहितीनुसार अपघातानंतर वर्षा काळंगे पंधरा मिनिटापर्यंत घटनास्थळावर तडफडत होत्या पण त्यांच्यामध्ये साठी कोणीही धावून नाही आले. नागरिक फोटो आणि व्हिडिओ काढण्यात मग्न होते तर ॲम्बुलन्स २० मिनिटांनी तर कोतवाली पोलीस ३० मिनिटांनी घटनास्थळावर पोहोचली. वाहतूक शाखेचे कर्मचारी सुद्धा पंधरा मिनिटानंतर घटनास्थळावर दाखल झाले. जर वेळेवर आपातकालीन यंत्रणा पोहोचली असती तर वर्षाचा जीव वाचला असता.

### नारायणपूर मध्ये बिल्डर डहाकेंच्या

पोलीस तीन बदमाश्यांचा शोध घेत आहे. माहिती अनुसार शहरातील सुप्रसिद्ध बिल्डर जानराव डहाके परतवाडा येथील नारायणपूर मार्गावरील विश्वकर्मा कॉलनीमध्ये कुटुंबीयासह आपल्या आलिशान बंगल्यात राहतात. बुधवारच्या रात्री आणि त्यांची पत्नी झोपले होते त्यावेळी रात्री दोन ते अडीच वाजता सुमारास त्यांना खळखळ ची आवाज आली यामुळे त्यांची झोप उघडले त्यांनी बाहेर जाऊन पाहिले तर तीन नकाबपोश आरोपी त्यांच्या घरात घुसले होते. आरोपींना पाहून डहाके दांपत्याने ओरडण्याचा प्रयत्न केला तर आरोपींनी त्यांना चाकू दाखवून धमकविले. आणि घरात जेही माल आहे ते स्वाधीन करण्याचे म्हटले. जाधव डहाके यांनी जसा आरोपी यांचा विरोध केला तर आरोपींनी त्यांच्यावर चाकूने हल्ला केला यामध्ये त्यांच्या हातावर जखमा झाल्या.हे पाहून त्यांची पत्नी घाबरली आणि आरोपींच्या हात पाय जोडायला लागली. त्यांच्या पत्नीने म्हटले की घरात जे काही आहे ते घेऊन जा पण कोणालाही नुकसान नका पोहोचू यानंतर आरोपींनी अलमारी उघडून तेथे ठेवलेले ९० ग्राम सोने, २०० ग्राम चांदी व १ लाख १० हजार रुपये रोख घेऊन फरार झाले. या घटनेमुळे जानराव डहाके आणि त्यांची पत्नी घाबरली होती. जसे तसे त्यांनी आज सकाळी पोलिसांना माहिती दिली. आरोपी ३० ते ३२ वर्ष वयोगटातील असल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरात जोदार हडकंप माजलेला आहे. घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलीस घटनास्थळावर पोहोचली पोलिसांनी पंचनामा केला फिंगरप्रिंट एक्सपर्ट व डॉग स्कॉड ही मदत घेण्यात आले. पोलिसांना संशय आहे की, आरोपींनी पहिले डहाके यांच्या घराची रेखी केली आणि त्यानंतर या घटनेला अंजाम दिला.

### मुलींचे अश्लील व्हिडिओ इन्स्टा वर

पेट्रोलिंग करत होते त्यावेळी त्यांना गुप्त माहिती मिळाली की बांबू गार्डन , वडाली येथे काही मुली रस्त्याने पायदळ जात असताना दोन मोटरसायकलवर आलेल्या पाच मुलांनी त्या मुलींना अश्लील हावभाव करीत असभ्य शब्दाचे वापर करून त्यांचे व्हिडिओ काढले. यावरून पोलीस पथक तिथे त्यावेळी मुलींनी पाच आरोपींमधून एका आरोपीच्या वाहनाचा क्रमांक पोलिसांना सांगितले. प्रकरणाची गांभीर्य जाणून पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी चौकशी करून आरोपी यांचा शोध घेतला. आरोपींनी काढलेले व्हिडिओ एडिट करून इंस्टाग्राम वर टाकले होते. यावरून पोलिसांनी आरोपी शेख फैजान शेख कादर, शेख साकीब, मुदत्सीर खान, जय सरसे व आयुष किल्लेकर यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपयुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजर पुराचे पोलीस निरीक्षक रोशन सिरसाट, निलेश गावंडे, डीबी पथक मधील उपनिरीक्षक राहुल महाजन, जमादार योगेश श्रीवास, हरीश चौधरी, सुरज यादव, रोशन वराडे, जयेश परी वाले ,अमोल राठोड यांनी कारवाई मध्ये सहभाग केला.

### तत्काळ ११२ वर करा फोन

नियंत्रण

कक्ष अथवा डायल ११२ वर देण्यात यावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गुपित ठेवण्यात येईल. प्राप्त माहितीवरून पोलीस दल कार्यवाही करेल.

### एएसआय अब्दुल कलाम कुटुंबीयांना

तर सर्वसामान्य माणसाच्या सुरक्षेचे काय हा प्रश्न उपस्थित झाला आहे. सदर प्रकरणात जातीने लक्ष घालून फरार आरोपींना त्वरित अटक करून या प्रकरणाची बारकाईने तपास करून आरोपी विरुद्ध पुरेसे पुरावा गोळा करून त्यांना शिक्षा होईल असे प्रयत्न करावे यामुळे पोलीस परिवाराला न्याय मिळेल. आणि भविष्यात अशा प्रकारचे घटना नाही घडणार. मृत्यूनंतर अब्दुल कलाम कुटुंबीयांना शासनाकडून लवकरात लवकर सहायता देण्यात यावी व कुटुंबातील व्यक्तीला अनुकंपा तत्त्वावर शासकीय नोकरीमध्ये समाविष्ट करावे अशी मांगणी करण्यात आली. यावेळी एड.शेख सुलतान, उपाध्यक्ष अनील किनगे, रामहरी आगळे, सूर्यभान सहारे, पुंडलिक मानकर, विजय कुमार सोनावणे आदि उपस्थित होते.

### सावत्र बापाने केली चिमुकल्या

भविष्यात संपत्तीत हिस्सा मागणार या संशयातून सावत्र बापाने त्याच्या मित्राच्या मदतीने हत्याकांड घडवून आणलं. दर्शन वैभव पळसकर असं हत्या करण्यात आलेल्या मुलाचे नाव आहे. तर आकाश साहेबराव कान्हेरकर (राहणार हिरापूर ता अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती) असं मारेकरी सावत्र बापाचं नाव आहे. याशिवाय गौरव वसंतराव गायगोले (रा. हिरापूर ता. अंजनगाव जिल्हा अमरावती.) असं मारेकऱ्याला मदत करणाऱ्या साथीदाराचे नाव आहे. अकोट पोलिसांनी दोघांनाही अटक करून त्यांच्याविरुद्ध खुनाचे गुन्हे दाखल केले आहे.

**असे आहे घटनाक्रम-** भविष्यात संपत्तीत हिस्सा मागणार या संशयातून सावत्र बापाने त्याच्या मित्राच्या मदतीने हत्याकांड घडवून आणलं. दर्शन वैभव पळसकर असं हत्या करण्यात आलेल्या मुलाचे नाव आहे. तर आकाश साहेबराव कान्हेरकर (राहणार हिरापूर ता अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती) असं मारेकरी सावत्र बापाचं नाव आहे. याशिवाय गौरव वसंतराव गायगोले (रा. हिरापूर ता. अंजनगाव जिल्हा अमरावती.) असं मारेकऱ्याला मदत करणाऱ्या साथीदाराचे नाव आहे. अकोट पोलिसांनी दोघांनाही अटक करून त्यांच्याविरुद्ध खुनाचे गुन्हे दाखल केले आहे.

**असे आहे घटनाक्रम**

काल २ जुलै रोजी सकाळी साडे ८ वाजताच्या सुमारास कुणालाही न सांगता दर्शन घराबाहेर निघून गेला असल्याची आकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होती. मुलाच्या बेपत्ता प्रकरणी आईने तक्रार दिली होती. बेपत्ताप्रकरणी तपास सुरू असतानाच सावत्र वडिलांवर पोलिसांना संशय झाला. कारण, अकोट शहरातल्या चौकातील नुकतेच लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरात वडिलांसोबत मुलगा जात असताना दिसून आलं होतं.. त्यामुळे पोलिसांनी सावत्र वडिलांची कसून चौकशी केली असता त्याने सावत्र मुलाला कायमचं संपवलं असल्याची बाब समोर आली.

**बारा तास चालली शोध मोहीम**

दरम्यान या घटनेची माहिती पोलिसांना समजतात पोलिसांनी काल रात्रीपासून जवळपास १२ तास जंगल परिसरात शोध मोहीम राबवित मुलाचा मृतदेह शोधून काढला आहे. या शोध मोहीममध्ये ७ पोलीस अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. दरम्यान, सद्यस्थितीत मृतदेह शव विच्छेदनासाठी अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अशी माहिती आयपीएस अधिकारी अनमोल मित्तल यांनी दिली.

### तलवार आणि देशी पिस्तूल

थांबवण्याचा पोलिसांनी इशारा दिला. पण चालकाने वाहना थांबवता रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी खांबाला धडक दिली. पोलिसांना पाहून दोन्ही आरोपी मधुसूदन कॉलनी कडे पळून गेले. आरोपींना तिकडे जाताना पाहाल्यावर पोलीस तिकडे गेली.दोन्ही आरोपींचा पाठलाग करत असताना एक आरोपी नालीमध्ये पडल्याने पोलिसांच्या ताब्यात आला. त्याचे नाव अब्दुल शफिक अब्दुल हफिज आहे. त्याचे अंग झडती घेतली असता त्याच्याजवळ एक लोखंडी जुना वापरता चाकू, एक ओपो कंपनीचा मोबाईल १५ हजार, एक गावठी बनावटी पिस्तूल असा एकूण २०,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विचारपूस मध्ये त्याने आणखीन दोन साथीदारांचे नाव सांगितले. या प्रकरणात राजापेठ पोलीस तपास करत आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक आयुक्त जयदत्त भवंर यांचे मार्गदर्शनाखाली राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, सागर सरदार, पवन तिवारी ,दिनेश भिसे, संजय कडू ,वकील शेख, अंकुश काळे, सुरज मेश्राम यांनी कार्यवाहीमध्ये सहभाग केला.

### मेंढपाळांना दिलासा : चराईवर

शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग, विधवा महिला, ग्रामपंचायत कर्मचारी, बेरोजगार तरुण अशा वंचित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी आमदार बच्चू कडू यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाची अखेर शासनास्तरावर दखल घेण्यात आली आहे.३ एप्रिल रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत आंदोलनात मांडलेल्या १७ महत्त्वाच्या मागण्यांवर सखोल चर्चा झाली असून लवकरच शासन निर्णय काढण्यात येईल, अशी माहिती खुद्द बच्चू कडू यांनी दिली. या बैठकीत शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, हमीभावावर २० टक्के अनुदान, तसेच शेतमजुरांना शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक सहाय्य देणे, त्यांच्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करणे यांसारख्या मागण्यांचा समावेश होता. तसेच दिव्यांग व विधवा महिलांना दरमहा ६००० रुपये मानधन, तरुणांच्या हाताला काम आणि त्यासाठी योग्य मोबदला, भरती प्रक्रिया राबवणे आणि ग्रामीण भागातील घरकुल योजनेंतर्गत ५ लाख रुपयांचे अनुदान देणे यासारख्या निर्णयांवरही सकारात्मक चर्चा झाली. अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या समाजघटकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे आंदोलन निर्णायक ठरणार असल्याचे चित्र आहे. बच्चू कडू यांनी या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, 'आम्ही केवळ आंदोलनासाठी आंदोलन करत नाही, तर जनतेच्या हक्कांसाठी लढत आहोत. शासन सकारात्मक असून लवकरच मागण्या मान्य झाल्याचा अधिकृत निर्णय जाहीर होईल.'या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेच्या प्रश्नांना पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणले गेले असून, आगामी काळात शासनाच्या निर्णयाकडे साऱ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

**धनगर समाजाला दिलासा**

या निर्णयामुळे पशुपालक मेंढपाळांना मोठा दिलासा मिळाला असून अनेक वर्षांपासून चालत आलेल्या अडचणींवर मार्ग निघण्याची आशा निर्माण झाली आहे. बच्चू कडू यांनी सांगितले की, 'हा लढा अजून थांबलेला नाही, जोपर्यंत धनगर समाजाच्या सर्व मागण्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत संघर्ष सुरूच राहील.'

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा

आर.एम.जे.सी.क्र.१४२/२०२५ ने.ता.०३.०७.२०२५

अर्जदार : १. **श्री सुशिल त्र्यंबकराव सरोदे** (मुलगा), वय ४२ वर्षे, व्यवसाय- शेती
२. **श्री रोहित त्र्यंबकराव सरोदे** (मुलगा), वय ३७ वर्षे, व्यवसाय- शेती
३. **श्रीमती निर्मला त्र्यंबकराव सरोदे** (पत्नी), वय ६६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
**अर्जदार क्र.१ ते ३ रा.माहुली चोर, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती**
४. **सौ.सारिका गजानन इंगळे** (मुलगी), वय ४६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.हिरपुर, ता.मुर्तिजापुर, जि.अकोला

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी **मयत त्र्यंबकराव विठोबाजी सरोदे** हे दि.२९/०५/२०२१ रोजी माहुली चोर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मरण पावले आहे. त्यांचा कायमचा पत्ता हा माहुली चोर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदारा यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशिर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत दिनांक १६.०४.२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **०५.०८.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३ जुलै सन २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस
अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६७/२०२५ ने.ता.२५/०७/२०२५

पिटीशनर :- गौरी नंदकुमार गावनेर व इतर
-- विरुध्द --
रिस्पांडंट :- निरंक

पालक पाल्य अधिनियमाचे कलम ८ प्रमाणे सामाईक शेतजमीन विक्रीची परवानगी मिळण्याबाबत अर्ज

ज्याअर्थी वरील **अर्जदार** यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.

मालमत्तेचे वर्णन

मौजा-कणी मिर्झापुर, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती येथील शेत क्र.२३८ क्षेत्रफळ २ हे ५९ आर आकार ५.११ पैसे भोगवट वर्ग-१ चतुसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - सरकारी ई क्लास पश्चिमेस - विलास गुल्हाणे यांचे शेत
उत्तरेस- समृध्दी खदान दक्षिणेस- सचिन बारबुध्दे यांचे शेत

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिस देण्यात येते की, त्यांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ०९.०७.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

पाहिजेत
हिदायत एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी अमरावती व्दारा संचालित
झकरिया उर्दू हायस्कुल नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती
(अनुदानित अल्पसंख्याक शाळा)
येथे खालील रिक्त पदावर नियुक्ती करण्याकरिता.

| पद | माध्यम | शैक्षणिक पात्रता | अनुदानाचा प्रकार | पद रिक्त होण्याचे कारण | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक (वर्ग ९ ते १० करिता) | उर्दू | B.Sc (Maths) B.ed. | अनुदानित | सेवानिवृत्ती मुळे | ०१ |

वरील तपशिला प्रमाणे इच्छुक अर्हता प्राप्त उमेदवाराने स्वखर्चाने सर्व मुळ कागदपत्र व अर्जासह दिनांक २०/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थेचे कार्यालय हिदायत एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी कोहिनुर कॉलनी, पॅराडाईस कॉलनी जवळ अमरावती येथे हजर राहावे.

सचिव
हिदायत एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी, अमरावती

Shri Shivaji Education Society, Amravati's
**Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya,**
Shivaji Nagar, Rural Institute, Area, Amravati- 444603
**WANTED**

Applications are invited for appointments of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :-

**Vacancies for Grant -in-aid Course**
(As per Regulation No. 2/2020, and its para -II, G.R. Dated 17/10/2022)

| Sr. No. | Subject | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 01 | Political Science | 02 |
| 02 | Sociology | 02 |
| 03 | Co-operation | 02 |
| 04 | Home Science | 04 |

**Eligibility** :- Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 ( University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No.संकिर्ण 2018/(185/18)/मशि-३, dt. 14.11.2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**N.B. :-** Eligible candidates should remain present in the college for the direct interview on **dated 10.07.2025 at 10.30 am to 01.30 pm.** alongwith application, original documents, xerox copies of documents at their own expenses.

**Shri Harshavardhan P. Deshmukh**
President
Shri Shivaji Education Society, Amravati

**Dr. Smita R. Deshmukh**
Principal
Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya, Amravati

पाहिजेत
स्व.संजय राठोड शिक्षण संस्था, गुंज, ता.महागांव, जि.यवतमाळ र.नं. ७७७/८४
(अल्पसंख्याक) व्दारा संचालित
श्री मनोहरराव नाईक उच्च माध्यमिक विद्यालय, गुंज, ता.महागांव, जि.यवतमाळ
येथे खालील उच्च माध्यमिक शिक्षक पद भरणे आहे.

| अ.क्र. | पात्रता | शिक्षण सेवक | पद संख्या | मानधन (दरमहा ) | संवर्ग | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस.सी. (भौतिकशास्त्र) बी.एड. | शिक्षण सेवक | ०१ | २०,०००/- | खुला | अनुदानित |

इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीस मंगळवार दि.१५/०७/२०२५ रोजी ठिक दुपारी ०१.०० वाजता श्री मनोहरराव नाईक उच्च माध्यमिक विद्यालय, गुंज, ता.महागांव, जि.यवतमाळ येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

अध्यक्ष सचिव

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ शुक्रवार, ४ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४


epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# दुबार पेरणीग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्यातून वगळल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातुर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव परिसरात नुकत्याच झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नदीकाठील शेतजमिनी खरडून गेल्याने सुपीक माती वाहून गेली असून, पिकासाठी पेरलेले बियाणे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले आहे. परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले आहे.**

## दुबार पेरणीग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्यातून वगळल्याचा आरोप
## सावरगाव परिसरातील शेतकऱ्यांची अवस्था हतबल, प्रशासनाकडे पंचनाम्याची मागणी



महसूल व कृषी विभागाकडून नुकसानीचे संयुक्त पंचनामे तातडीने सुरू करण्यात आले आहेत. मात्र या पंचनाम्यांमध्ये दुबार पेरणीग्रस्त शेतकऱ्यांना वगळण्यात आल्याचा आरोप स्थानिक शेतकरी करीत आहेत.

सावरगाव, पिंपळकुटा, झरंडी, मळसुर, खेट्री, शिरपूर, राहेर, पांगरताटी व उमरा या गावांतील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे पंचनाम्यात समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांची ही स्थिती लक्षात घेता प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून दुबार पेरणीग्रस्त शेतकऱ्यांनाही मदतीचा लाभ द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

'ढगफुटीसदृश पावसामुळे माझ्या संपूर्ण शेतातील सोयाबीनचे बियाणे वाहून गेले. शेतीची पुन्हा पेरणी करावी लागत आहे. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सर्वेक्षणात आम्हालाही समाविष्ट करावे.'
**प्रेमदास राठोड,** शेतकरी, सावरगाव

'अतिवृष्टीमुळे नुकत्याच पेरलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना भेटलो असता त्यांनी दुबार पेरणीचे पंचनामे होत नसल्याचे सांगितले. पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी.'
**गजानन तानकर,** शेतकरी, सावरगाव

**शेतकऱ्यांच्या स्वप्नावर फिरले पाणी! :** खरिप हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असताना ढगफुटीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरवले आहे. सोयाबीन, तूर, कपाशी यांसारख्या पिकांची पेरणी करून शेतकऱ्यांनी चांगल्या उत्पन्नाचे स्वप्न पाहिले होते. मात्र हे सर्व स्वप्न पावसाने भंग केले.

**दुबार पेरणीमुळे आर्थिक फटका :** शेतकऱ्यांनी विविध बँकांकडून कर्ज घेऊन पेरणी केली होती. मात्र पिके उगवण्यापूर्वीच अतिवृष्टीमुळे नुकसान होऊन दुबार पेरणीची वेळ आली आहे. यामुळे आर्थिक फटका बसून शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडले आहेत.

# अकोल्यात येत्या तीन महिन्यांत एमआरआय मशीन



## आ. साजिदखान पठाण यांच्या प्रश्नावर आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांचे आश्वासन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे गेली अनेक वर्षे एमआरआय मशीन उपलब्ध नसल्याने रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात आज विधीमंडळाच्या प्रश्नोत्तराच्या तासात पश्चिम अकोल्याचे आमदार साजिदखान पठाण यांनी संतप्त स्वरात सरकारला जाब विचारला.

'सतत विचारलेल्या प्रश्नांवर जर सरकारने पावले उचलली नाहीत तर आम्ही हे प्रश्न विचारावे तरी कशाला?' असा प्रश्न उपस्थित करत आ. पठाण यांनी आपल्या नाराजीचा स्पष्ट सूर दाखवला. त्यांनी यापूर्वीही याच विषयावर प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर आरोग्य शिक्षण मंत्री ना. हसन मुश्रीफ यांनी एमआरआय मशीन देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र चार महिन्यांनंतरही कुठलीही ठोस कारवाई झाली नसल्याने आ. पठाण यांनी सभागृहात संताप व्यक्त केला.

या मुद्द्यावर हस्तक्षेप करत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अर्थमंत्री डीपीसी (जिल्हास्तरीय नियोजन समिती) निधीतून यासाठी काही निधी राखीव ठेवण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले. यावर आरोग्यमंत्री हसन मुश्रीफ यांनी पुढील तीन महिन्यांत अकोल्यात एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्यात येईल, असे जाहीर करत पुढील अधिवेशनात या प्रश्नाची गरज भासणार नाही, अशी ग्वाही दिली.

# छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी व दुरदृष्टीचे लोकराजा होते - राजकुमार पडघान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील अडोळी ग्रामपंचायत येथे दि.२६ जून रोजी सकाळी ९:३० वाजता लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी उपसरपंच भगवान इढोळे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत सदस्य नारायण इढोळे, सुभाष पडघान, आदिशक्ती महीला सक्षमीकरण अभियानच्या अध्यक्षा केशरबाई खिल्लारे, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, रमेश पडघान, के.डी.जाधव, संजय इढोळे महाराज, रमेश इढोळे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान हे होते.ं

# सन - २०२५ च्या खरिप हंगामाचा अहवाल महसूल प्रशासनाला द्या

## बिगर सतबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते जगदिश कुमार इंगळे यांची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



अनुसूचित जाती जमाती च्या लोकांनी महसूल व वन भूमीवर शेतीसाठी अतिक्रमण करून त्यावर जीवनावश्यक जिंनसाची पेरणी करून परिवाराचा उदरनिर्वाह भगवितात दरवर्षी प्रमाणे सन २०२५ च्या खरीप हंगामात पेरणी केलेली असताना जिल्हा महसूल प्रशासन पेरणी केलेल्या जमिनीचे पंचनामे स्थळ निरीक्षण मौका पाहणी करून पिकांच्या नोंदी घेण्यासाठी टाळाटाळ करतात त्याचेच उदाहरण म्हणून यवतमाळ जिल्यातील मौजे कळंब तालुक्यातील नारसापुर गांधी नगर किनवट रुंझा राळेगाव तालुक्यातील सोयटी जळका सहित वाशिम जिल्ह्यातील मौजे कावठल शेलू सहित जिल्ह्यातील लोकांचा प्रतेक्ष जमिनीवर कब्जा असताना ग्राम महसूल अधिकारी नोंदी करत नाही वाशिम जिल्ह्यातील तर महसूल अधिकारी विरेंद्र जाधव यांनी तर सन २०२४च्या खरीप हंगामात पेरणी केलेले दलीत आदिवासींचे अर्जच खारीज केलें म्हणून सन २०२५ च्या खरीप हंगामात पेरणी केलेले जमिनींचे क्षेत्रफळ निश्चित करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार मंडळ निरीक्षक कर्तव्य आणि कामे नियम १९७० मधिल नियम १७ प्रमाणे पंचनामे स्थळ निरीक्षण प्रत्यक्ष मॉका पाहणी करण्याचे आदेश यवतमाळ वाशिम जिल्हा महसूल प्रशासनाला देण्यात यावे अशी मागणी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदिश कुमार इंगळे यांनी खासदार संजय देशमुख यांच्या कडे केली यावेळी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे वाशीम जिल्हा अध्यक्ष राजू इंगोले भारत सोळंके युवा नेते उमेश वाघ उपस्थित होते

# अकोला तालुक्यातील सरपंच आरक्षणाची बुधवारी सोडत

**अकोला :** सन २०२५ ते सन २०३० या पाच वर्षाच्या कालावधीत अकोला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी सरपंच पदाचे जातीनिहाय आरक्षण नव्याने निश्चित करावयाचे आहे. याकरिता जाहीर सोडत बुधवार दि. ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डी.बी.ए. हॉल, तहसील कार्यालय येथे आयोजित केली आहे.

अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग अंतर्गत महिलाकरिता व खुल्या प्रवर्गाअंतर्गत महिलाकरिता आरक्षणाची सोडतही आयोजित केली आहे.तरी सरपंच, तसेच महिला सरपंच पदाच्या सोडतीसाठी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आहे.

# मोहन शिरसाट यांच्या 'नाही फिरलो माघारी' या कवितासंग्रहाला विशाखा काव्य पुरस्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■



स्थानिक राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेतील शिक्षक मोहन शिरसाट यांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथील कवी कुसुमाग्रज अध्यासनच्या वतीने २०१८ मध्ये प्रकाशित ग्रंथाली प्रकाशनचा 'नाही फिरलो माघारी' या कवितासंग्रहाला विशाखा काव्य पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर संजीव कुमार सोनवणे यांच्या हस्ते हा पुरस्कार ३० जून २०२५ रोजी मुख्य सभागृहात प्रदान करण्यात आला आहे. यावेळी प्र कुलगुरू माननीय जोगेंद्रसिंह बीसेन तथा कुलसचिव दिलीप भरड आणि कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉक्टर दिलीप धोंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित कवींनी आपापली एक कविता सादर केली.यावेळी २०१८ ते २०२४ पर्यंत विशाखा काव्य पुरस्कार प्राप्त कवींना सन्मानित करण्यात आले. मोहन शिरसाट यांच्या 'नाही फिरलो माघारी'ला तृतीय विशाखा काव्य पुरस्कार रोख दहा हजार रुपये तथा सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कवी मोहन शिरसाट यांच्या या कवितासंग्रहाला यापूर्वी मध्य प्रदेश सरकार च्या मराठी साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच मुंबई विद्यापीठ बीए भाग एक ला कविता अभ्यासक्रमात लागलेली आहे. या कवितासंग्रास मुंबई, वर्धा, बडोदा, वेंगुर्ला, नाशिक, बीड इत्यादी येथील नामांकित संस्थेचे पुरस्कार मिळालेले आहेत. शिरसाठ यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२२ मध्ये प्राप्त झाला आहे. यापूर्वी त्यांनी 'वाशिम जिल्ह्याचा इतिहास' हा ग्रंथ संपादित केला. बालभारतीच्या पाठ्यपुस्तक निर्मिती सदस्य म्हणून ही चार वर्गांची पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये त्यांनी कार्य केले आहे.विशाखा पुरस्काराच्या निमित्ताने मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सरपंच पदासाठी आरक्षण जाहीर

**वाशिम :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ जून २०२५ रोजी नवीन अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या अधिसूचनेनुसार, सन २०२५ ते २०३० या कालावधीत होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत सरपंच पदाचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच महिलांसाठीचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.

या आरक्षण प्रक्रियेकरिता तहसील कार्यालय वाशिम येथे सोमवार, दिनांक ७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नवीन सभागृहात सार्वजनिक सभा आयोजित करण्यात आली आहे.

# सरपंचपदाची आरक्षण सोडत ८ जुलैला

**मानोरा :** ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने मानोरा तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत येत्या मंगळवार (दि. ८) रोजी काढण्यात येणार आहे. काही दिवसांपूर्वी ही आरक्षण सोडत काढण्यात आली होती मात्र न्यायालयीन प्रकरणामुळे जिल्ह्यात पुन्हा सरपंच पदाची आरक्षण सोडत काढण्यात येत आहे.आरक्षण सोडतीकरिता इच्छुकांनी उपस्थीत राहण्याचे आवाहन तहसीलदार, मानोरा यांनी केले आहे. सन २०२५-२०३० या दरम्यान सार्वत्रिक निवडणुकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्राम पंचायत सरपंच पदाकरिता आरक्षण सोडत नियंत्रण अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कारंजा यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम पंचायत निहाय दि.८ जुलै मंगळवार रोजी दुपारी १२ वाजता नविन सभागृह, तहसील कार्यालय येथे करण्यात येणार आहे.


Dnyanganga Shikshan Prasarak Sanstha Wanoja
**Smt.Salunkabai Raut Arts and Commerce College Wanoja**
Ta.Mangrulpir Dist. Washim. (M.S.) 444402
**By NAAC "B+" Grade CGPA 2.53**
Sant Gadge Baba Amravati University, Amravati Ref. No. SGBAU/8/C-1330/2025 Dt. 27/06/2025

**WANTED**

**For the Session 2025-26**

Applications are invited for appointments of Candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :-
**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**
(As Per Regulation No. 2/2020, and its para-11, G.R. Dated 17/10/2022)

| Sr. No | Subject/Course | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 01 | English | 02 |
| 02 | History | 02 |
| 03 | Economics | 02 |
| 04 | Commerce | 02 |

**Eligibility:** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण – 2018 / (185/18) मशि – 3, dt 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be fixed by Govt. in the said G.R. The Candidates are required to be present with all relative original documents on dt- 14.07.2025 at 11.00 a.m For the interview. TA & DA will be not paid to the candidates.

**President**
Dnyanganga shikshan Prasarak Sanstha Wanoja.Dist Washim

**Principal**
Smt.salunkabai Raut Arts & Commerce College Wanoja.Dist Washim


# एन आय सी अधिकारी सागर हवालदार यांच्या कार्याची केंद्र शासनाने घेतली दखल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्रातील जिल्हा सूचना विज्ञान केंद्र अधिकारी सागर हवालदार यांची नियुक्ती नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सूचना आणि विज्ञान केन्द्र मध्ये विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती झाली असल्याचे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.

सागर हवालदार यांची नियुक्ती त्यांनी वाशिम जिल्ह्यामध्ये या क्षेत्रात केलेल्या नाविन्यपूर्ण कामाची पावती होय. सागर हवालदार यांच्याच कार्यकाळामध्ये वाशिम जिल्हा २०१७ साली सातबारा ऑनलाइन अपलोड करण्यामध्ये राज्यात पहिला आला होता, त्या वेळी तत्कालीन पालकमंत्री संजय राठोड यांनी त्यांचा सत्कार केला होता. डाटा फीडिंग ऑनलाईन करणारे आदर्श अधिकारी म्हणून त्यांची जिल्ह्यामध्ये ओळख आहे. त्यांनी पोहरादेवी येथे केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हाधिकारी बूवनेश्वरी एस यांनी त्यांचा सत्कार केला आहे. तर २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. आणि पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते सागर हवालदार यांचा सत्कार झाला. त्यांच्या याच कामाची दखल केंद्र शासनाने घेतली असून या विभागाचे राष्ट्रीय स्तरावरील काम करण्यासाठी दिल्ली येथे सागर हवालदार यांची नियुक्ती झाली असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या सहकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.


## पाहिजेत

**ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था वनोजा व्दारा संचालित,**
**श्रीमती साळुंकाबाई राउत कनिष्ठ महाविद्यालय**
**वनोजा ता. मंगरूळपीर जि. वाशिम**

उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागाकरीता खालील विषयाची पदे घडयाळी तासीका तत्वावर शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करीता भरणे आहे.

**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभाग**

| अ. क्र. | विषय | शैक्षणिक पात्रता | श्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | एम. ए. मराठी बी.एड. | व्दितीय | ०१ |
| २ | इंग्रजी | एम. ए. इंग्रजी बी. एड. | व्दितीय | ०१ |
| ३ | पायाभूत अभ्यासक्रम | एम. बी. ए. | व्दितीय | ०१ |
| ४ | पिकशास्त्र | एम. एस. सी. ( ॲग्री ) | व्दितीय | ०१ |
| ५ | पर्यावरण | एम.एस.सी पर्यावरण शास्त्र विषयासह | व्दितीय | ०१ |
| ६ | शारीरिक शिक्षण | बी.पी.एड / एम.पी.एड | व्दितीय | ०१ |

**कनिष्ठ महाविद्यालय विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ईतिहास | एम.ए. इतिहास बी. एड. | व्दितीय | ०१ |
| २ | समाजशास्त्र | एम.ए. समाजशास्त्र बी.एड. | व्दितीय | ०१ |
| ३ | वणिज्य संघटन व व्यवस्थापन | एम. कॉम. बी. एड. | व्दितीय | ०१ |
| ४ | शारीरिक शिक्षण | बी.पी.एड / एम.पी.एड | व्दितीय | ०१ |

पात्रता धारक उमेदवाराने मुळ कागदपत्रासह सोमवार दिनांक १४/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वखर्चाने अर्जासह प्रत्यक्ष मुलाखती करीता महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**अध्यक्ष / प्राचार्य**
श्रीमती साळुंकाबाई राउत कनिष्ठ महाविद्यालय वनोजा



Dnyanganga Shikshan Prasarak Sanstha Wanoja
**Smt.Salunkabai Raut Arts and Commerce College Wanoja**
Ta.Mangrulpir Dist. Washim. (M.S.) 444402
**By NAAC "B+" Grade CGPA 2.53**

**WANTED**

**PG NON-GRANT COURSE**
For the Session 2025-26

Applications are invited for Lecturer on Contract Basis Vacancies for PG Non-Grant course/programme

| Sr. No | Subject/Course | Qualification | No.of. Post |
|---|---|---|---|
| 01 | M.A. Marathi | M.A. Marathi B+, SET/NET/Ph.D. | 4 |
| 02 | M.A. Political Science | M.A. Political Science B+, SET/NET/Ph.D. | 4 |
| 03 | M.Com | M.Com. B+, SET/NET/Ph.D. | 4 |
| 04 | Clerk | Graduate, MS-CIT, Typing | 1 |
| 05 | Peon | 12th | 1 |

The Candidates are required to be present with all relative original documents on dt- 14.07.2025 at 11.00 a.m For the interview. TA & DA will be not paid to the candidates.

**President**
Dnyanganga shikshan Prasarak Sanstha Wanoja.Dist Washim

**Principal**
Smt.salunkabai Raut Arts & Commerce College Wanoja.Dist Washim

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २१९ ■ शुक्रवार, ४ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# शहरातील पी वन पी टू पार्किंगला कपडा व्यापाऱ्यांसह इतरांचा तीव्र विरोध





**वर्धा जनमाध्यम :** दिवसेंदिवस वाहनांच्या सं होत असताना,रस्ते अ आहेत.यातच अरुंद रस्त वन पी टू पार्किंगचे निय असल्याने वाहतूक विभाग व्यापाऱ्यांचा दुजाभाव करी यावरुन कपडा व्यापाऱ्य व्यापारी या मोहिमेला ती दर्शवित आहेत.

शहरातील बाजारपेठत वाढते अतिक्रमण लक्षात घेऊन नगर पालिकेने वाहतूक विभागाची मदत घेऊन सर्व फुटपाथवरिल अतिक्रमण हटविले. त्यानंतर शहराच्या बाजारपेठेतील रस्त्याने मोकळा श्वास घेतला होता. आधी कुठेही वाहन पार्किंग केले जात असायचे, त्याकरिता वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संतोष शेगावकर यांनी बंद पडलेली पी वन पी टू मोहीम राबविण्याचे ठरविले.मोहीम सर्व बाजारपेठत सुरु करण्यासाठी व्यापारी वर्गाने सहमती दिलेली होती.

त्यानंतर वाहतूक विभागकाडून त्याची अंमलबजावणी करण्यात आली.दिनांक १ जुलै पासून कपडा लाईन, पत्रावळी चौक,अंबिका व एम जी रोड या रस्त्यावर पी वन पी टू सुरु करण्यात आले आहे.तर सुवर्ण बाजारपेठत कुठल्याही प्रकारचे नियम लावण्यात आलेले नाहीत.त्यामुळे वाहतूक विभाग दुजाभाव करीत असल्याचे अनेक व्यापाऱ्यांकडून बोलले जात आहेत.

### आधी पार्किंगची व्यवस्था करावी त्यानंतर मोहीम यशस्वी करावी

आधी सुध्दा ही मोहीम राबविण्यात आली होती, मात्र इतर कारणास्तव ती बंद पडण्यात आली होती.बाजारपेठत अनेक दुकाने आहेत.त्या ठिकाणी जवळपास दोनशेहून जास्त कामगार काम करीत आहेत. त्या कामगारांच्या दुचाकी नियमात ठेवल्या गेल्या तर ग्राहकांनी वाहन कुठे ठेवायचे हा प्रश्न उपस्थित होत आहे.शहरात नगर पालिकेच्या अनेक गल्ली मधील खाली जागा आहेत,त्या जागेवर वाहनतळाची नगर पालिकेने निर्मिती करावी,आणि त्यानंतर पी वन पी टू यशस्वी होईल.

**रोशन कठाळे,** व्यापारी

### सराफा बाजारात शिस्तबद्ध पद्धतीने वाहन लावण्यासाठी सक्ती केली जाणार

शहरातील सर्व बाजारपेठत पी वन पी टु सुरु करण्यात आले आहेत. फक्त सराफा बाजारपेठत कुठल्याही प्रकारची घटना घडू नये यासाठी नियम लावण्यात आलेले नाहीत.त्याकरिता सराफा बाजारपेठेत पिवळे पट्टे आखण्यात येणार आणि शिस्तबद्ध पद्धतीने वाहन लावण्यासाठी सक्ती केली जाणार.

**संतोष शेगावकर,** पोलीस निरीक्षक वाहतूक विभाग, वर्धा

# जिल्ह्यातील २६४ ग्रामपंचायतवर असणार महिला राज



**वर्धा जनमाध्यम :** सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक सूचनांना केंद्रस्थानी ठेवून गुरुवार ३ जुलै रोजी जिल्ह्यात ८ ठिकाणी सरपंचपदाची आरक्षण सोडत पार पडली. जिल्ह्यात ८ ठिकाणी शांततेत पार पडलेल्या या प्रक्रियेदरम्यान २६४ ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंचाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. आठही ठिकाणी पार पडलेल्या प्रक्रियेचे इतिवृत्त जिल्हा प्रशासनाच्या निवडणूक (ग्रा,पं) विभागाला प्राप्त झाल्यावर ते अंतिम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्याकडे सादर केले जाणार आहे.

ग्रामविकास विभागाच्या सूचना, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार ३ रोजी वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी, कारंजा, हिंगणघाट व समुद्रपूर या तालुक्यांच्या स्थळी तहसीलदार यांच्या उपस्थितीत विशेष सभा घेत आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडली. निश्चित करण्यात आलेले आरक्षण १३ जून २०२५ ते १२ जून २०३० या कालावधीकरिता लागू राहणार आहे. वर्धा तालुक्यातील ७६, देवळी तालुक्यातील ६३, सेलू ६२, हिंगणघाट ७६, समुद्रपूर ७१, आर्वी ६९, आष्टी ४१ तर कारंजा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतींच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यातील महिला सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

वर्धा तालुक्यात ग्रापंमध्ये ७६ पैकी ३९ महिला सरपंच, देवळी तालुक्यातील ६३ पैकी ३२ महिला सरपंच, सेलू ६२ पैकी ३२ महिला सरपंच, हिंगणघाट ७६ पैकी ३९ महिला, समुद्रपूर ७१ ग्रामपंचायतीत ३६, आर्वी ६९ पैकी ३५ महिला, आष्टी ४१ ग्रामपंचायतीत २१ महिला, तर कारंजा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतीत ३० महिला सरपंचपदाचे आरक्षण सोडत निघाली.



### उप प्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात

# वृक्षारोपण व रस्ता सुरक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** रोटरी क्लब गांधी सिटी व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सालोड येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण रस्ता सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्‌घाटन रोटरी क्लबच्या अध्यक्ष साधना बन्नोरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी डॉ. रोटरी क्लबच्या सचिव स्मिता व्यास, सहसचिव गजानन पडोळे, उमेश टावरी, कोषाध्यक्ष फरहत जाहिद, उप प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरिक्षक अनुराधा जाधव, अजय चोधरी, सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक राजु ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरात ५० वृक्षांची उपस्थित मान्यवराचे हस्ते लागवड करण्यात आली. कार्यक्रमाला रोटरी क्लबचे पदाधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगणघाट येथील शहालगंडी परिसरात दोन घरांना आग

### -सुदैवाने जीवितहानी नाही, मात्र मोठे नुकसान



**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील संत ज्ञानेश्वर वार्ड येथील शहालगंडी परिसरात बुधवार २ जुलै रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास शॉर्टसर्किटने आग लागून दोन मोठे नुकसान झाले.

संत ज्ञानेश्वर वार्ड परिसरातील किशोर कांबळे व सुनील बोटरे हे दोघे शेजारी राहतात. बुधवारी दोन्ही कुटुंब घरी नसताना शॉर्टसर्किटमुळे आग लागली. नागरिकांना रात्री आगीचे लोट दिसल्याने घटनास्थळी धाव घेतली. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले. घटनेची माहिती नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशमन दलाने घटनास्थळ गाठून आग आटोयात आणली. या आगीत दोन्ही घरातील जीवनावश्यक व अन्य साहित्यांची राखरांगोळी होऊन लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने दोन्ही कुटुंबीय घरी नसल्याने जीवितहानी टळली. अग्निशमन अधिकारी गौरव गाणार यांनी शॉर्टसर्किटमुळे आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यत केला.

# पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी एक वृक्ष लावणे गरजेचे

### -बालरोग तज्ज्ञ डॉ.संजय गाठे यांचे प्रतिपादन




**वर्धा जनमाध्यम :** पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या वाढदिवसानिमित एक तरी वृक्ष लावून त्यांचे संगोपन करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन

जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धाचे बालरोग तज्ज्ञ डॉ. संजय गाठे यांनी केले. कास्ट्राईब महासंघाचे राज्य महासचिव गजानन थुल यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या कार्यालयात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवाग्राम मेडिकल कॉलेज एचओडी डॉ. दिपक ठमके होते. प्रमुख पाहुणे म्हणून बालरोगतज्ज्ञ डॉ. संजय गाठे , पत्रकार जमीर शेख , जिल्हा प्रशिक्षण पथक वर्धाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा खोब्रागडे , जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.प्रशांत वाडीभस्मे , तालुका आरोग्य अधिकारी डॉ. माधुरी दिघेकर, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रविण धमाणे , वैद्यकीय अधिकारी डॉ. धनश्री थुल, आदित्य ढोक , कास्टाईब महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय तायडे उपस्थित होते. याप्रंसगी डॉ. संजय गाठे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कास्ट्राईब महासंघाचे राज्य कार्यालय सेवाग्राम रोड वर्धा येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गजानन थुल यांनी ५० वृक्ष लावण्याचा संकल्प करून त्यांची संगोपनाची जबाबदारी घेतली. उपस्थित मान्यवरांनी यावेळी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला रणधिर शिरपुरकर, अध्यक्ष कास्टाईब जिल्हा परिषद संघटना, कैलास सेलकर ,नलिनी नितोने, महेन्द्र फुलझेले, प्रशांत खरवडे, अनिता देशमुख, वैशाली शिरभाते,शशिकांत अरसड,राजेंद्र पाटील, सुनील वनकर,राजू थुल, रविन्द्र थुल, सुरज कांबळे, हर्षल अवचट,संतोष, रवि खैरकर, मनोज मुन, कांबळे, राकेश कुसनाके, सेवावृत्तीचे संघटना महाराष्ट्र राज्य सचिव थुल , शारदा झामरे, शुभांगी वरटकर,रामभाऊ हिंगवे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा सचिव प्रदीप लोखंडे यांनी केले. आभार जिल्हा कोषाध्यक्ष प्रदिप पाटील यांनी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संघटनेचे पदाधिकारी व सदस्य यांनी सहकार्य केले. प्रत्येक व्यक्तीला ऑक्सीजनची गरज आहे.ते ऑक्सीजन वृक्षापासून मिळते.सतत होत असलेल्या वृक्षतोडीमुळे पर्यावरण धोक्यात आले आहे.यासाठी संघटनेच्या माध्यमातून कार्यालय परिसरात व ईतर ठिकाणी ५० वृक्ष लावण्याचा संकल्प करून त्यांची संगोपनाची जबाबदारी आम्ही घेत आहो.असे गजनान थूल यांनी सांगितले.

### शरद पवार दंत रुग्णालयात रुग्णाला दिलासा

# तोंड उघडण्याचा त्रासावर केले टेन्स थेरपीद्वारे उपचार









**वर्धा जनमाध्यम -** केवळ १५ मिलीमीटर इतक्या आकारातच आपले तोंड उघडू शकणाऱ्या ४७ वर्षीय पुरुष रुग्णाच्या मौखिक व्याधीवर सावंगी मेघे येथील शरद पवार दंत रुग्णालयातील मुखआरोग्य व रेडिओलॉजी विभागात टेन्स थेरपीद्वारे नाविन्यपूर्ण उपचार करण्यात आले आणि त्याला खाण्यास, बोलण्यास आणि मौखिक स्वच्छता ठेवताना येणाऱ्या त्रासातून मुक्त केले.

पवनार येथील हा रुग्ण पूर्णपणे तोंड उघडू शकत नसल्याने त्याला अन्नपदार्थ ग्रहण करताना, संवाद साधताना आणि स्वतःचीच मौखिक स्वच्छता करताना त्रस्त झाला होता. त्यातच अनेकदा तोंडात कळ येऊन वेदनाही सहन कराव्या लागत होत्या. हा रुग्ण सावंगीच्या दंत रुग्णालयात विभागप्रमुख डॉ. सुवर्णा डांगोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ऋषिका छत्तानी यांनी तपासणी केली. रुग्णाला १५ मिलीमीटरपेक्षा अधिक जास्त तोंड उघडताना जबड्यात वेदना जाणवत होत्या.

रुग्णाची पूर्ण माहिती घेत डॉ. छत्तानी यांनी ट्रान्सक्यूटेनियस इलेक्ट्रिकल नर्व्ह स्टिम्युलेशन अर्थात टेन्स थेरपीद्वारे उपचार करण्याचा निर्णय घेतला. त्वचेवर लावलेल्या इलेक्ट्रोडद्वारे सौम्य विद्युत प्रवाह देऊन स्नायूंमधील वेदना कमी करण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया या रुग्णाच्या उपचारांसाठी वापरण्यात आली. स्नायू सैल करण्यासाठी व वेदनामुक्तीसाठी दिल्या जाणाऱ्या औषधोपचारामुळे रुग्णाला पोटदुखी, निद्रानाश, औषधाधीनता, यकृत व मूत्रपिंडावर ताण या सर्व बाबींना सामोरे जावे लागते. औषधविरहित टेन्स थेरपी उपचाराने या त्रासातून रुग्णाची सुटका केली. या प्रक्रियेत डॉ. विद्या लोहे आणि डॉ. आरती पंचभाई यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले. विशिष्ट कालावधीत पाच वेळा करण्यात आलेल्या या उपचारांनंतर रुग्णाच्या तोंडाचे उघडणे १५ मिमीवरून ४५ मिलीमीटरपर्यंत वाढले आणि कर्करोगपूर्व अवस्थेत असलेल्या या रुग्णाला आजारातून मुक्तता मिळाली.

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

# उद्योगासाठी १ कोटी पर्यंत अनुदान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या हाताला काम देण्यासोबतच त्यांचे उद्योजक होण्याचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अतिशय उपयुक्त ठरत आहे. या दोनही योजनेतून तब्बल १ कोटीपर्यंतच्या उद्योग, व्यवसायासाठी कर्ज प्रकरण मंजुर केले जातात.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उत्पादन स्वरुपाच्या प्रकल्पासाठी १ कोटी तर सेवा प्रकारच्या व्यवसायासाठी ५० लाखापर्यंत कर्ज प्रकरण मंजुर केले जाते. शहरी भागासाठी २५ टक्के व ग्रामीण भागासाठी ३५ टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे वय १८ वर्ष पूर्ण असावे. रुपये १० लाखापर्यंतच्या उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पासाठी व ५ लाखाच्या सेवा व कृषि पूर व्यवसाय उद्योगासाठी लाभार्थी किमान ८ वी पास असावा. सेवा उद्योग, कृषि पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई-माल वाहतूक व त्यावरील आधारीत व्यवसाय, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र तसेच कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल, ढाबा शाकाहारी, मासाहारी पदार्थ विक्री व्यवसाय, होम-स्टे क्लाऊड किचन, जलक्रिडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरीता बोट व्यवसाय इत्यादी नवीन व्यवसाय सुध्दा आता नव्याने योजनेच्या लाभाकरीता पात्र राहणार आहे.

अनुसूचित जाती, जमाती, महिला, अपंग, माजी सैनिक, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती व अल्पसंख्यांक लाभार्थ्यांस सेवा उद्योगासाठी शहरी भागास २५ टक्केच्या मर्यादित कमाल ५ लाख रुपये तर ग्रामीण भागासाठी ३५ टक्केच्या मर्यादित ७ लाख रुपयांचे अनुदान देय असणार आहे तर उत्पादन व्यवसायासाठी शहरी भागाकरीता २५ टक्केच्या मर्यादित १२ लाख ५० हजार व ग्रामीण भागाकरीता ३५ टक्केच्या मर्यादित १७ लाख ५० हजार रुपये अनुदान देय असणार आहे. उर्वरीत प्रवर्गासाठी सेवा उद्योगाकरीता शहरी भागासाठी १५ टक्केच्या मर्यादित ३ लाख रुपये व ग्रामीण भागाकरीता २५ टक्केच्या मर्यादित ५ लाख रुपये तर उत्पादन प्रकल्पासाठी शहरी भागाकरीता १५ टक्केच्या मर्यादित ७ लाख ५० हजार तर ग्रामीण भागाकरीता २५ टक्केच्या मर्यादित १२ लाख ५० हजार रुपये अनुदान देय असणार आहे.

या योजनेला जिल्ह्यात अतिशय चांगला प्रतिसाद मिळत असून योजनेंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४९० नवीन उद्योगांची निर्मिती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील बँकांच्या शाखांच्या माध्यमातून उद्योगाकरीता कर्ज देण्यात येत आहे. जिल्ह्यात मागील वर्षी ४९० लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला असून ३ कोटी ५० लाख रुपयाच्या शासकीय अनुदानासाठी लाभार्थी पात्र झाले आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यात ९६० होतकरु नवउद्योजकांना वित्तीय संस्थेच्या माध्यमातून लाभ देण्यात येणार आहे.

# समुद्रपूर तहसील कार्यालयात व्हिडिओ रेकॉर्डिंग मध्ये आरक्षण सोडत




**गिरड जनमाध्यम :** तालुक्यातील ७१ सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करण्यासाठी गुरुवारी दुपारी १२ वाजता तहसीलदार कपिल हाटकर यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नायब तहसीलदार संजय कातपाताळ, नायब तहसीलदार निवडणूक अजय झिले यांच्यासह तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रा,पं सदस्य यांच्या उपस्थितीत अनु. जातीकरिता ९, अनुसूचित जमाती १२, नागरिकांचा मागासप्रवर्ग १९ तर सर्वसाधारण करिता ३१ अशा ७१ ग्रापंची सोडत लॉट पद्धतीने (चिठ्ठ्या टाकून) राखून ठेवण्यात आल्या. यावेळी कोणताही गैरसमज होऊ नये यासाठी तहसीलदार हाटकर यांनी आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग केली आहे. यावेळी सरपंच संघटनेचे जिल्हा सचिव सचिन गावंडे, विधानसभा प्रमुख किशोर नेवल यांच्यासह तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रापं सदस्य उपस्थित होते.


# सफाई कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे

**वर्धा जनमाध्यम :** शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी नगरपालिकेकडे आहे. यासाठी टेंडर काढून स्वच्छतेचे कंत्राट कंपन्यांना दिले जाते. कंत्राटदार कंपन्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून शहराला स्वच्छ ठेवण्याचे काम करतात. मात्र, या कर्मचाऱ्यांचे तीन-तीन महिने वेतन होत नसल्याने तसेच त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून देत नसल्याने नाराज कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेकडे पाठ फिरविल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपासून नाराज असलेले घनकचरा कर्मचारी बुधवारपासून कामावर रुजू झाले तर घंटागाडीवरील चालक व त्यांचे सहकारी गुरुवार ३ जुलै पासून संपावर गेल्याची माहिती आहे.

या सफाई कर्मचाऱ्यांचे तीन-तीन महिने वेतन होत नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. यासोबतच हॅण्डलोज, सॅनिटायझर, हॅण्डवॉश या सुविधा पुरविल्या जात नसल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांवर आजारी पडण्याची वेळ आली आहे. कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन सुरू केल्यामुळे शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग दिसून येत होता. चौकाचौकात कचऱ्यांच्या ढिगाऱ्यांमुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामनाही करावा लागला. दरम्यान, घनकचरा कर्मचाऱ्यांनी १ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या. मागील अनेक वर्षांपासून घनकचरा कर्मचारी म्हणून काम करीत असून वेळेवर वेतन मिळत नसल्याने अनेक कर्मचारी सोडून गेले. तीन-तीन महिने वेतन होत नाही.

'महिला कर्मचाऱ्यांचा ५०० तर पुरुषाचा ६०० रुपये रोज सांगण्यात आला होता. मात्र, याउलट महिलेला ३०० तर पुरुषाला ३५० रुपये रोजी दिली जाते. दिवाळी बोनस, पगार वाढ, २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टची रोजीही दिली जात नाही. कर्मचाऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही करण्यात येत नाही. त्यामुळे अनेक नाराज सफाई कर्मचारी सोडून गेले. स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याला देण्यात यावे, पीएफ कार्ड सुरू करावे, कचरा उचलताना साप-विंचू चावणे, आजारी पडणे, काचा रुतणे यामुळे अधिकचा भूर्दंड कर्मचाऱ्यांनाच उचलावा लागतो तो खर्च देण्यात यावा, तसेच हॅण्ड लोज, हॅण्ड वॉश, सॅनिटायझर प्रत्येक महिन्याला देण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. दरम्यान, जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी अधिकाऱ्यांशी बोलून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले होते. कंत्राटदाराने थकीत ४ महिन्यांपैकी २ महिन्याचे वेतन ५ तारखेला देण्याचे आश्वासन दिल्याने ४० घनकचरा कर्मचारी बुधवारपासून कामावर रुजू झाले आहेत.

दोन महिन्यांपासून घंटागाडीवरील चालक व सहकाऱ्यांचे वेतन थकीत आहे. या नाराज कर्मचाऱ्यांनी आज गुरुवार ३ जुलै पासून संप पुकारला आहे. घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या संपामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.



# शेतक-यांची सरसकट कर्जमाफी करावी

## विजय वडेट्टीवारांची सरकारकडे मागणी



**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकी आधी शेतक-यांना आश्वासन द्यायची आणि सत्ता आल्यावर मात्र शेतक-यांना वा-यावर सोडायचे, ही शेतक-यांची फसवणूक आहे. सरकारने शेतक-यांची सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली. बळीराजाच्या विविध प्रश्नावर २९३ च्या प्रस्तावावर बोलताना काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली.

राज्यात अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतक-यांना निवडणुकी आधी कोरडवाहू पिकांसाठी १३ हजार ५००, बागायतीसाठी २७ हजार तर फळबागांसाठी ३६ हजार रुपये इतकी मदत आणि ३ हेक्टरपर्यंतची मर्यादा निश्चित होती. पण आता सत्ता आल्यावर मात्र निवडणुकीनंतर कोरडवाहूसाठी ८ हजार ५००, बागायतीसाठी १७ हजार आणि फळबागांसाठी २२ हजार इतकी घटवण्यात आली. इतकेच नाहीतर ३ हेक्टरची मर्यादा २ हेक्टर करण्यात आली. निवडणुकीत कर्जमाफी देउ असे महायुतीने आश्वासन दिले होते आता मात्र कर्जमाफीसाठी समिती नेमण्याची भाषा वापरली जाते. शेतक-यांना समिती नको तर कर्जमाफी करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. दरम्यान, सोयाबीन, कापसाला भाव मिळाला नाही. पीक लावताना जो खर्च झाला तो शेतक-यांचा निघत नाही. धानाचे पैसे अजून शेतक-यांना मिळाले नाही आम्ही सरकारला ओरडून सांगत आहोत पण सरकार मान्य करायला तयार नाही. पीकविमा कंपन्यांनी शेतक-यांची फसवणूक केली. शेतकरी पैसे भरतात पण त्यांना विमा मिळत नाही. पीकविमाच्या नावाखाली कोणी पैसे उचलले? शेतजमीन दाखवून कोणत्या अधिका-यांनी पैसे लाटले याची चौकशी व्हायला हवी, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**कृषिमंत्री सातत्याने शेतक-यांचा अपमान करतायेत**

शेतक-यांच्या शेतमालाला दीडपट भाव देउ, असे सांगितले जात होते. परंतु, आता सोयाबीन आणि धानाला हमीभाव मिळत नाही. राज्याचे कृषिमंत्री हे पदावर बसून सतत शेतक-यांचा अपमान करणारी विधाने करतात. कृषी खाते म्हणजे ओसाड गावची पाटीलकी आहे असे त्यांना वाटते. यावरून ते किती असंवेदनशील आहेत, हे स्पष्ट होते. शेतक-यांचा वारंवार अपमान करणा-या या कृषीमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा. त्यांना हवे ते मलईदार खाते द्यावे पण शेतक-यांच्या अपमान करणारे कृषिमंत्री नको, या शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी निशाणा साधला.

**सगळेच बळीराजाचा अपमान करतात**

सत्ताधारी मंत्री,आमदार सगळेच बळीराजाचा अपमान करत आहे. आम्ही शेतक-यांना पैसे दिले, मोदींनी सहा हजार रुपये दिली, ही उपकाराची भाषा बोलली जाते. एकीकडे सहा हजार रुपये दिले पण खताचे भाव किती वाढले, युरियाचे भाव काय आहेत? रासायनिक खतांची किंमत वाढली, पिकासाठी औषधांची किंमत वाढली म्हणजे एका खिशात टाकले आणि दुस-या खिशाला कात्री लावली. त्यात शेतमालाला भाव मिळत नाही मग शेतक-यांना पैसे दिले ही कसली भाषा आहे? असा सवाल विधिमंडळ नेते वडेट्टीवर यांनी उपस्थित केला.

**विरोधक हा शेतक-यांचा आवाज आहेत-** राज्यात विविध प्रकल्पांसाठी सरकार निधी देते, उद्योगपतींचे कर्ज सरकार माफ करते पण शेतक-यांना मदत करताना मात्र सरकारच्या हाताला लकवा मारतो का? अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. शक्तिपीठ महामार्गाला विरोधक विरोध करतात, असा आरोप करतात पण शेतक-यांना शक्तिपीठ महामार्ग नको, त्यांची सुपीक जमीन या महामार्गात जाणार आहे. विरोधक हा शेतक-यांचा आवाज आहे. त्यामुळे आम्ही विरोध करत आहोत अस वडेट्टीवर यांनी स्पष्ट केले.

## विधानसभेत शेतक-यांच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्रीच नाहीत

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज चौथा दिवस आहे. मागील ४ दिवसांत विधिमंडळात भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतक-यांविरोधात केलेल्या एका वादग्रस्त विधानाचे तीव्र पडसाद उमटले. विधानसभेत शेतक-यांच्या मुद्यावर चर्चा सुरु असतांनाच कृषीमंत्रीच नसल्याचे विरोधकांनी म्हटले आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी सरकार २० हजार कोटी मंजूर करतात पण शेतकरी कर्जमाफी साठी पैसे नाहीत का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यातील शेतक-यांची अवस्था बिकट आहे. नांगराला बैल जुंपण्याचा खर्च परवडत नाही म्हणून लातूरमधील एका ६५ वर्षीय अंबादास पवार या शेतक-याने बैलांऐवजी स्वतःला नांगराला जुंपलं. त्यामुळे सर्व कामकाज बाजूला ठेवून शेतक-यांच्या प्रश्नावर चर्चा करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. अध्यक्षांनी स्थगन प्रस्ताव फेटाळल्या-मुळे विरोधक आक्रमक झाले, शेतकरी प्रश्नावर सरकार असंवेदनशील आहे, चर्चा टाळत असल्याने सरकारचा निषेध करत विरोधकांनी सभागृहाचा बहिष्कार केला.

## पोलिस स्टेशनमध्ये स्वतंत्र अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट स्थापन-मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** युवकांमधील अंमली पदार्थांच्या व्यवसनाधिनतेला रोखण्यासाठ पोलिस स्टेशनमध्ये स्वतंत्र अमली पदार्थ प्रतिबंधक युनिट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. अमली पदार्थ आढळल्यास टेस्टिंगपासून पुढील कायदेशीर कारवाईपर्यंतची यंत्रणा उभी करण्यात आली आहे. पोलीसांकडून शाळा-क ?लेज परिसरात विशेष लक्ष देण्यात येत असून मुंबईत २००० हून अधिक पानटप-यांवर कारवाई करत त्यांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेतील लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितले अंमली पदार्थासंदर्भात विधानपरिषद सदस्य भाई जगताप यांनी नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षेवधीत विरोधी पक्षेनेते अंबादास दानवे, सदस्य शिवाजीराव गर्जे, संजय केनेकर, सतेज पाटील आणि संजय खोडके यांनीही उपप्रश्न विचारले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण आखण्यात आले असून, त्याविरोधातली लढाई आता अधिक आक्रमक आणि सर्वसमावेशक झाली आहे. यामध्ये पोलीस कर्मचा-यांच्या सहभागाच्या प्रकरणांवर शासनाने कठोर भूमिका घेतली असून आता सेवेतून निलंबनाऐवजी थेट बडतर्फ करण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या कारवाईत दोन इंडोनेशियन नागरिकांकडून २१ कोटी रुपयांचा हायड्रो गांजा जप्त करण्यात आला. त्याचबरोबर, वसई परिसरात बंद पडलेल्या केमिकल कारखान्यांतून सिंथेटिक ड्रग्जची निर्मिती होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा ठिकाणी कारवाई करण्यात आली नाही. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सोशल मीडियावरून ड्रग्ज विक्रीवर सायबर पोलिसांची नजर असून येथून ड्रग्जची विक्री सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सायबर विभागाने १५ मार्केटप्लेस निष्प्रभ केले. संबंधित गुन्हेगारांवर कारवाई झाली आहे. त्याचबरोबर २५० कोटींच्या एमडी ड्रग प्रकरणात इंटरपोलच्या माध्यमातून परदेशातील आरोपींना अटक केली आहे. या लढ्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर समन्वयाने काम सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. एनडीपीएस कायद्याच्या बरोबरीने 'मकोका' अंतर्गतही कारवाई करता यावी, यासाठी विधिमंडळात सुधारणा सादर केली जात आहे. यामुळे वारंवार गुन्हे करणा-यांना कठोर शिक्षा होईल. त्याचबरोबर, परदेशातून गुजरात व जेएनपीटी पोर्टमार्गे येणा-या मालाच्या तपासणीसाठी स्कॅनरची यंत्रणा उभी केली असून, यादृच्छिक तपासणीही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

अमली पदार्थविरोधी मोहीम ही केवळ पोलीस किंवा गृहमंत्रालयाचा विषय नाही, तर 'व्होल ऑफ गव्हर्नमेंट' अप्रोचची याला गरज आहे,' असं सांगत मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधित विभागांना सहकार्याचे आवाहन केले. त्याचबरोबर, ओटीटी प्लॅटफ ?र्मवर अमली पदार्थांचे उदात्तीकरण थांबवायला हवे. यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यामार्फत ओटीटी प्लॅटफ ?र्मशी किंवा अशा प्रकारच्या वेब सिरीज दाखविण्या-या चॅनेल्सशी सपर्क साधून जाणिव जागृतीच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## राज्यात वाळू वाहतुकीसाठी 24 तास परवानगी-महसूलमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात वाळू वाहतुकीसाठी २४ तास परवानगी देण्यात आली असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता कोणत्याही वेळेस करता येणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत नियम ४६ अंतर्गत निवेदन सादर करताना दिली.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, 'सध्या राज्यात सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन अधिकृतपणे करता येते. मात्र, या काळात साठवलेली वाळू रात्री वाहून नेता येत नसल्यामुळे वैध बांधकाम प्रकल्पांना वेळेवर वाळू उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. काही शहरांमध्ये दिवसा वाहतुकीचे प्रमाण जास्त असल्याने वाळूच्या वाहतुकीस मर्यादा आहेत. शिवाय, विविध प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी वाळूची मागणी झपाट्याने वाढत आहे."राज्याबाहेरून येणा-या वाळूस झिरो रॉयल्टी पासच्या माध्यमातून २४ तास वाहतुकीस परवानगी दिली जाते.

मात्र, राज्यातील वाळूची वाहतूक सायंकाळी ६ नंतर बंद असल्यामुळे उपलब्ध वाळूचा पूर्ण वापर होउ शकत नाही,' असेही त्यांनी नमूद केले. शासनाने वाहतुकीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत. 'महाखनीज' पोर्टलवरून वाळू वाहतुकीसाठी आवश्यक असलेला ई-परवाना (eTP) आता २४ तास उपलब्ध आहे. सायंकाळी ६ नंतर वाहतूक करण्यास परवानगी देण्यासाठी काही अटी लागू करण्यात आल्या आहेत. उत्खनन केलेल्या वाळूचे स्वतंत्र जिओ-फेन्सिंग करणे, वाहतूक स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, वाळू वाहतूक करणा-या सर्व वाहनांना जीपीएस डिव्हाइस बसविणे या उपाययोजनांमुळे राज्यातील वाळू वाहतूक अधिक नियंत्रित, पारदर्शक आणि सुलभ होईल, असा विश्वास महसूलमंत्री श्री. बावनकुळे यांनी व्यक्त केला.

## धर्मादाय रुग्णालयांसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजना बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व धर्मादाय (चॅरिटेबल) रुग्णालयांनी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजना लागू करणे आता बंधनकारक असून, याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रिअल टाइम सनियंत्रण करणारी यंत्रणा विकसित करण्यात येत आहे, अशी माहिती विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. सदस्य सना मलिक यांनी याबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी सदस्य अतुल भातखळकर, राहुल कुल, अजय चौधरी यांनी चर्चेत सहभाग घेतला. राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालयांनी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी १० टक्के खाटा मोफत आणि १० खाटा सवलतीने राखीव ठेवणे बंधनकारक आहे. तसेच निर्धन रुग्ण निधी (आयपीएफ) मध्ये सर्वसाधारण रुग्णांकडून स्थूल बिलाच्या दोन रक्कम जमा करण्याची सक्ती आहे. धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवक नियुक्तकरण्यात आले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अधिनस्त धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली असून, रुग्ण तक्रारींचे निराकरण करण्यासाठी देखरेख समित्यांची नियुक्तीही करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## पुढील दोन वर्षात 'एसटी'चा चेहरामोहरा बदलण्याचा संकल्प- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परिवहन (एसटी) महामंडळाकडे सध्या १४५०० बसेस असून त्या जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक वर्षी ५००० याप्रमाणे पुढील पाच वर्षात



महामंडळ मालकीच्या २५००० बसेस खरेदी करण्यात येतील. यात ५,१५० इलेक्ट्रिक बस लवकरच दाखल होणार आहेत. त्याचबरोबर, महामंडळाकडे असलेले ८४० बसडेपो हे बसपोर्ट मध्ये रुपांतरित केले जातील. यासाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून पुढील दोन वर्षात एसटीचा चेहरामोहरा बदलेल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत सांगितले. विधान परिषद सदस्य अनिल परब, शशिकांत शिंदे, सदाभाउ खोत आदी सदस्यांनी अर्धा तास चर्चेच्या सूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन संदर्भात चर्चा उपस्थित केली. त्यास श्री.सरनाईक यांनी उत्तर दिले. एसटी महामंडळाचे आधुनिकीकरण करताना बसेस, डेपो स्वच्छता आणि प्रवाशांसाठी सुविधांकडे अधिक लक्ष देण्यात येणार आहे. प्रत्येक डेपोमध्ये ई-टायलेट, ड्रायव्हर तसेच कंडक्टरसाठी युनिफार्म धुण्याची आणि गरम पाण्याची सोय अशा विविध सुविधा देण्यात येतील, असे सांगून मंत्री श्री.सरनाईक म्हणाले की यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही निविदा प्रक्रिया पूर्ण पारदर्शक आणि स्पर्धात्मक असेल, अशी माहितीही त्यांनी दिली. गुजरातच्या 'बस पोर्ट' संकल्पनेचा दाखला देत, महाराष्ट्रात शहरी आणि ग्रामीण भागात एसटीचा समांतर विकास होईल. एसटी महामंडळ सध्या डिझेलसाठी ३३ हजार कोटी रुपये वर्षाला खर्च करत असल्याचे सांगून ते म्हणाले की, सीएसआर च्या माध्यमातून सर्व बस डेपोमधून ई-टीयलेट सुविधा तसेच प्रसाधन गृहांच्या सुविधा दिली जाईल, असे श्री.सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

## वर्धा जिल्ह्यातील 100 खाटांचे महिला रूग्णालयाचे काम प्राधान्याने पूर्ण करावे

### गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर



**मुंबई/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यात १०० खाटांचे महिला रुग्णालय प्रस्तावित असून रुग्णालय बांधकामातील तांत्रिक बाबींची पूर्तता करून हे काम प्राधान्याने पूर्ण करावे, असे निर्देश गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. मंत्रालयात वर्धा जिल्ह्यात प्रस्तावित १०० खाटांचे महिला रुग्णालय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालयात ५० खाटांच्या क्रिटिकल केअर ब्लॉकच्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर, उपसचिव शि.म.धुळे, अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, अवर सचिव दीपाली घोरपडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले, जिल्ह्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्याच्या दृष्टीने क्रिटिकल केअर युनिटची आवश्यकता आहेत. कार्यारंभ आदेश देउन वेळेत काम पूर्ण करावे.

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'महाप्रित'च्या विविध प्रकल्पांची आढावा बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा फुले नविकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) या उपकंपनीने भविष्यातील आव्हानांचा विचार करून दीर्घकाळ टिकणा-या प्रकल्पांना प्राधान्य देउन ते पूर्ण करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत असलेल्या महात्मा फुले नविकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित)च्या विविध प्रकल्पांचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश कुमार आदी उपस्थित होते. आजच्या बैठकीत ठाणे समूह विकास प्रकल्प, साफटवेअर तंत्रज्ञान आणि डेटा सेंटर प्रकल्प, भिवंडी महापालिकेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांसाठीचा रुफ टॉप सोलर प्रकल्प, एनटीपीसी ग्रीन सोबत सोलर/हायब्रिड प्रकल्प राबविणे, एनटीपीसी ग्रीन, एनआयआरएल, सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया -एसईसीआय यांच्या संयुक्त भागीदाराने उभारण्यात येत असलेले सौर ऊर्जा प्रकल्प, डिस्ट्रिक्ट कुलिंग सिस्टीम प्रकल्प, नागपूरमधील राष्ट्रीय कर्करोग संस्थेच्या आवारात सोलर प्रकल्प उभारणे, पुणे महापालिकेचे एकात्मिक कमांड आणि कंट्रोल सेंटर उभारणे, महालक्ष्मी मंदिर व परिसराचा पुनर्विकास इत्यादी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या विविध प्रकल्पांच्या प्रगतीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले. झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प वेगात पूर्ण करावेत. सर्वच क्षेत्रांमध्ये प्रकल्प राबवण्याऐवजी विशिष्ट क्षेत्रात तज्ज्ञता (एक्स्पर्टीज) मिळवून त्या ठराविक क्षेत्रातच काम करावे, असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

## ग्रामविकासातून राज्याचा विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना प्रभावीपणे राबविणार

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामविकासातून राज्याचा विकास होणार असून यासाठी मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना प्रभावीपणे राबविणार असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ही विकासस्पर्धा सुरु करण्यात आली असून ती गावांच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देणारी ठरणार आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे लोकमत समूहातर्फे आयोजित सर्वोत्कृष्ट सरपंच पुरस्कार सोहळ्यात ग्रामविकास मंत्री श्री. गोरे बोलत होते. यावेळी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, आणि लोकमतचे मुख्य संपादक आणि माजी मंत्री राजेंद्र दर्डा उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या १३ सरपंचांना २५ लाख रुपयांचा निधी गावाच्या विकासासाठी देण्याचे जाहीर करण्यात आले. श्री. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावाचा विकास महत्वाचा आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना

**ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे**

प्रभावीपणे राबवणा-या ग्रामपंचायतींसाठी मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना सप्टेंबर पासून राज्यभर राबविण्यात येणार आहे. तालुकास्तरावर २५ लाख, जिल्हास्तरावर ५० लाख, विभागस्तरावर १ कोटी तर राज्यात सर्वोत्तम ठरलेल्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. ही विकासाची स्पर्धा असून यातून ग्रामविकास साधता येणार आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सरपंचांचे कौतुक करताना सांगितले की, ग्रामस्तरावरील प्रश्न सोडवणे हे गुंतागुंतीचे असते. प्रतिकूल परिस्थितीतही या सरपंचांनी गावासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. भविष्यात आणखी चांगले काम करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करावा व त्याचे योग्य व्यवस्थापन करावे. नियोजनबद्ध विकास आराखड्यामुळे यश मिळते. राज्यातील शेतक-यांना सुरक्षित आणि आश्वासित करण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, देशाचा विकास होण्यासाठी ग्रामीण भाग पूर्णपणे सक्षम होणे आवश्यक आहे. गावात वीज, पाणी, शाळा, रस्ते यासारख्या मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी सरपंच कार्य करत करीत असतात यासाठी त्यांचे विशेष अभिनंदन.

## अधिवेशनातून

### सारथी, महाज्योती, बार्टी, आर्टी संस्थांसाठी खर्चाचे समतोल नियोजन व समान धोरण राबविणार-अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या सारथी, महाज्योती, बार्टी, आर्टी आदी संस्थांमार्फत चालवण्यात येणा-या विविध अभ्यासक्रमांवर सरकार दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. या खर्चाचे समतोल नियोजन तसेच समान धोरण राबविणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, २०१८ ते २०२५ दरम्यान या योजनांतून ३ लाख विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. यामध्ये ३,००० विद्यार्थ्यांनी पीएचडीसाठी निधी घेतला असून त्यांच्यावर एकूण खर्च २८० कोटी झाला आहे, तर उर्वरित ९९१ विद्यार्थ्यांवर ४७० कोटी खर्च झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, एका विद्यार्थ्यावर पीएचडीसाठी ५ वर्षांत साधारण ३० लाख खर्च होतो. यात फी, घरभाडे, छात्रवृत्ती, आकस्मिक खर्च यांचा समावेश असतो. फक्त गुणवत्ताधारक पात्र विद्यार्थ्यांनाच पीएचडीसाठी निवडले जाईल. यासाठी मेरिटच्या आधारे ७५ ते १०० विद्यार्थी निवडण्याचा विचार सुरू आहे. अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नसला तरी प्राथमिक चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी स्पष्ट केले की, सारथी, महाज्योती, बार्टी आणि आर्टी या सर्व संस्थांसाठी समान धोरण ठेवले जाईल. कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही, पैशांचा विनियोग काटेकोरपणे केला जाईल. जे कोर्सेस नोकरीसाठी, स्टार्टअपसाठी किंवा स्वावलंबनासाठी उपयुक्त आहेत, अशा कोर्सेसना अधिक प्राधान्य दिले जाईल. या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संबंधित मंत्री आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत असून, त्यांचा अहवाल प्राप्त होताच पुढील निर्णय घेतले जातील, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### शासकीय रुग्णालयांमध्ये सिटीस्कॅन आणि एमआरआय मशीन खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्वसामान्य गरीब रुग्णास आरोग्याच्या अत्यावश्यक व दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल. नियोजन समितीच्या निधीतून राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सिटीस्कॅन, एमआरआय मशीन खरेदी करण्यासाठी राज्यस्तरावरून नियमावली करून देण्यात येईल. या नुसार सिटीस्कॅन, एमआरआय मशीन खरेदी करण्यासाठी ज्या जिल्ह्यांचा प्रस्ताव प्राप्त होईल त्यास मान्यता दिली जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, सिटीस्कॅन, एमआरआय मशीन खरेदीसाठी जिल्हा नियोजन समितीचा काही निधी राखीव ठेवण्यात येईल. राज्यात सिटीस्कॅन आणि एमआरआय मशीन अभावी रुग्णांवरील उपचारास बाधा निर्माण होणार नाही याची दक्षताही घेतली जाईल. सदस्य संजय पोतनीस यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री अमित देशमुख, निलेश राणे, नाना पटोले, साजिदखान पठाण आणि अजय चौधरी यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला. राज्यातील आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विषयक सुविधा अधिक बळकट करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडील खरेदी शासन नियमानुसारच करण्यात येत असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयांनी पाठवलेल्या यंत्र सामग्री व अन्य आरोग्य विषयक सुविधांच्या खरेदीच्या प्रस्तावाची वरिष्ठ स्तरावर तपासणी करण्यात येउन त्यानंतर ई निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करण्यात येते. मंत्री श्री. म्हणाले, वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जावर भर देण्यात येत आहे. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आवश्यक प्राध्यापक, कर्मचारी व तांत्रिक पदांची भरती केली जाणार आहे.

### शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न-शिक्षण मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यु-डायस (UDISE) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेउन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम ९२ अन्वये अर्धातास चर्चेला उत्तर देतं मंत्री भुसे बोलत होते. मंत्री श्री. भुसे म्हणाले की, अनेक विद्यार्थी दहावी नंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकार्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते 'ड्रापआउट' म्हणून नोंदविले जातात. राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे. सध्या राज्यात ८६% विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५% आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले. मंत्री श्री.भुसे म्हणाले की, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत ९ हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत. मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

### यूपीएससी, एमपीएससीसाठी विद्यार्थ्यांना बार्टीकडून अर्थसहाय्य

**मुंबई/प्रतिनिधी ::** राज्यातील अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) युपीएससी आणि एमपीएससी परीक्षांसाठी विशेष अर्थसहाय्य योजना जाहीर केली आहे. सन २०२४ - २५ मध्ये होणा-या विविध स्पर्धा परीक्षांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना एकरकमी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी १० हजार रुपयांचे एकरकमी अर्थसहाय्य दिले जाणार आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२५ होती. तसेच जाहिरातीसह दिलेला अर्ज भरून ४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत टपालाद्वारे 'बार्टी', पुणे कार्यालयात पाठविणे बंधनकारक आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ साठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवारांना ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. अर्जाची प्रत बार्टीच्या वेबसाईटवरून डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह upscbartischeme@barti.in या ई-मेलवर पाठवावी. भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ साठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवारांनाही ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. अर्ज व आवश्यक कागदपत्रांची स्व-साक्षांकित प्रत स्कॅन करून १५ जुलै, २०२५ पूर्वी bartiupscforestengg@gmail.com या ई-मेलवर पाठवणे आवश्यक आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे, असे आवाहन बार्टीकडून करण्यात आली आहे. या योजनांबाबत अधिक माहिती बार्टीच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे.

### जुनी वाहने एचएसआरपी पाटीसाठी अंतिम मुदत 15 ऑगस्ट 2025

**मुंबई/प्रतिनिधी :** शासनाने १ एप्रिल, २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविणे बंधनकारक केले आहे. याअंतर्गत अशा वाहनांना यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, वाहनधारकांकडून अल्प प्रतिसाद मिळाल्याने ही अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे, असे सह परिवहन आयुक्त(संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या http://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाउन एचएसआरपी पाटीसाठी वेळ घेणे आवश्यक आहे. ही वेळ १५ ऑगस्ट २०२५ पूर्वी घेतल्यास संबंधित वाहनावर कोणतीही कारवाई होणार नाही.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# डिजिटल क्रांती; परिवर्तनाचा दूत

गेल्या १० वर्षांत भारतामध्ये डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवेसह अनेक क्षेत्रांत ऐतिहासिक बदल झालेले आपल्याला पाहायला मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना राहिली नाही, तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांच्या हाती काही ना काही नव्या वस्तू लागल्याचे दिसत आहे. भारतात डिजिटल क्रांती होईल का? असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता.चलनातील नाणे, रोख रक्कम नसतील तर व्यवहार कसे होणार याबाबत १० वर्षांपूर्वी कोणाला प्रश्न विचारला असता, ते उत्तर नकारात्मक आले असते. त्याचे कारण मोठ्या संख्येने असलेल्या अर्धशिक्षित लोकांना हा डिजिटल व्यवहार जमणार कसा अशी सार्वत्रिक भावना होती. आज आपण बाजारात गेलो तर भाजीवाल्यांपासून चहाच्या टपरीवर गुगल पे, फोन पेने पैसे देतो. दुकानात स्कॅनर ठेवलेला असतो, त्यामुळे १० रुपयांचा कटिंग चहा प्यायल्यानंतरही खिशातील सुट्टे पैसे काढण्याची गरज उरत नाही.यूपीआयद्वारे चहावाल्यालाही पैसे पोहोचतात, ही साधी गोष्ट सर्वसामान्य नागरिकांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे मोबाईल, इंटरनेट कनेक्शन या गोष्टी तो घरातून बाहेर पडताना ध्यानात ठेवताना दिसतो. खऱ्या अर्थाने डिजिटल व्यवहाराचा चेहरा बदलण्यात युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसचा (यूपीआय) मोठा वाटा आहे. दैनंदिन व्यवहाराचे यूपीआय हे प्रमुख माध्यम बनले आहे. मार्च २०२५मध्ये केवळ एका महिन्यात यूपीआयच्या माध्यमातून २५ लाख कोटी रुपयांचे १८ हजार दशलक्ष व्यवहार झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. आज भारतात ४६०दशलक्षहून अधिक नागरिक आणि ६५ दशलक्षहून अधिक व्यापारी यूपीआयचा वापर करत आहेत.प्रत्येक भारतीयांसाठी पुरावा म्हणून ओळख असलेल्या आधार कार्डची डिजिटल ओळखसुद्धा अधिक विश्वासार्ह ठरली आहे. बँकांमधील ई-केवायसी सेवा सुटसुटीत झाली आहे.भारतात १९९० च्या दशकाच्या अखेरीस प्रथमच मोबाइल फोन आले, तेव्हा ते फक्त श्रीमंतांसाठीचे यंत्र आहे अशी त्याची प्रतिमा तयार झाली होती. मात्र, पुढील काही दिवसांत भारत नावाच्या मोठ्या बाजारपेठेने मोबाइल यंत्रांची किंमत तर खाली आणली, पण ही बाजारपेठ काबीज करण्याच्या स्पर्धेने ही सेवा सर्वसामान्य भारतीयांना परवडेल इतकी खाली आणून ठेवण्याचा सरकारकडून प्रयत्न झाला. आता तर ग्राहक मिळविण्यासाठी ती सेवा मोफत दिली जात आहे आणि ती मोबाईल सेवा घेण्यासाठी भारतीय ग्राहकांच्या उड्या पडत आहेत. जगातील खरे बदल हे तंत्रज्ञानाने घडवून आणले आहेत, असे म्हणतात, ते खरे आहे, याची प्रचिती मोबाइल फोनच्या क्रांतीमुळे दिसून आली आहे. देश स्वातंत्र्य झाल्यापासून भारतात रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत होते. त्यासाठी रिझर्व्ह बँकेला प्रचंड खर्च सहन करावा लागत होता. रोख वितरित करणे, ती सांभाळणे, ती सतत बदलत राहणे, खराब नोटांची विल्हेवाट लावणे हा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कामाच्या दृष्टीने मोठा उपद्व्याप होता आणि आजही तो आहे. रोखीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाने धुमाकूळ घातला होता, हे अनेक आर्थिक घोटाळ्यांच्या प्रकरणानंतर उघडकीस आले होते. त्यामुळे डिजिटल पेंमेटमुळे घोटाळ्यांना आळा बसण्यास सुरुवात झाली. तसेच डिजिटल व्यवहार वाढल्याने वाचणारी रक्कम रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला दरवर्षी लाभांश रूपात दिली जाते, हा अप्रत्यक्ष फायदा आता दिसू लागला आहे.डिजिटल व्यवहारांमुळे पारदर्शी व्यवहार वाढीला प्रोत्साहन मिळाले आहे. डिजिटल माध्यमातून होणाऱ्या व्यवहारातून सरकार जी सबसिडी देते, ती थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांची बचत होत असते. काळे व्यवहार करण्याला प्रोत्साहन देणाऱ्या ५०० रुपयांच्या नोटा जोपर्यंत व्यवहारात आहेत तोपर्यंत डिजिटल व्यवहारांना अपेक्षित गती मिळणार नाही, हे ओळखून आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या नोटा व्यवहारातून काढून टाकण्याची मागणी सातत्याने केली आहे. केंद्र सरकारने या मागणीकडे गांभीर्याने पाहिले तर पुढील काळात लवकरच भारतातही डिजिटल युगाचा आविष्कार पाहण्यास मिळेल, अशी आशा करायला हरकत नाही.केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' या कार्यक्रमाला दहा वर्षे पूर्ण झाली आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल क्रांती ही केवळ एक प्रशासन योजना राहिली नाही, तर ती 'लोकांची चळवळ' बनली आहे, असे मत मांडले. २०१४मध्ये भारतात सुमारे २५ कोटी इंटरनेट कनेक्शन होते, जे आज ९७ कोटींहून अधिक झाले आहे.दहा वर्षांपूर्वी इंटरनेटचा वापर मर्यादित होता, डिजिटल साक्षरता कमी होती आणि सरकारी सेवांमध्ये ऑनलाइन प्रवेश दुर्मीळ होता. भारतासारखा विशाल आणि भाषा, प्रांत रचनेमुळे विविधतेने नटलेल्या देशात खरोखर डिजिटल होऊ शकेल का याबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. आज, या प्रश्नाचे उत्तर केवळ डेटा आणि डॅशबोर्डमध्येच नाही तर १४० कोटी भारतीयांच्या जीवनात प्रत्यक्षात उतरलेले पाहायला मिळत आहे.बनारसी विणकरांपासून ते नागालँडमधील बांबू कारागिरांपर्यंत, विक्रेते आता मध्यस्थाशिवाय डिजिटल व्यासपीठामुळे देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. मोदी यांच्या नेतृत्वामुळे गेल्या १० वर्षांत डिजिटल क्रांतीला जो वेग मिळाला, त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. गेल्या ११ वर्षांत भारताने डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवा आणि अनेक क्षेत्रात ऐतिहासिक बदल पाहिले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना ठरली नाही तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील नवीन झेप ग्रामीण भागात बदलाचा पाचा रोवणारी ठरली. या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांना काही ना काही हाती लागले. त्यांना काहीतरी गवसले.

दोन ठाकरे बंधूंचा ५ जुलैला निघणारा मोर्चा हिंदी सक्तीच्या आध्यादेशाच्या सरकारच्या माघारीनंतर तूर्त तरी स्थगित झाला आहे; मात्र विजयी मेळावा हे दोन्ही पक्ष घेऊ शकतात, असे आता सांगितले जाऊ लागले आहे.

# मोर्चामिलन की मनोमिलन?

उद्धव-राज यांच्या एकत्र येण्याच्या नव्या राजकारणामुळे महाराष्ट्रात सुरू असलेल्या नव्या चर्चा विशेषत: कोकणच्या राजकारणाला काय दिशा देणार, याकडे आता सर्वांच्या नजरा आहेत. यात मुख्य भाग हा मुंबई महापालिका निवडणुकीचा आहे. शिवसेना आणि मुंबई महापालिका हे समीकरण गेल्या ३० वर्षांचे आहे. त्यामुळे आता होणारी निवडणूक आणि दोन ठाकरेंचे मनोमिलन हा विषय मराठी माणसांच्या जिव्हाळ्याचा ठरला आहे.

दोन ठाकरे बंधूंचा ५ जुलैला निघणारा मोर्चा हिंदी सक्तीच्या आध्यादेशाच्या सरकारच्या माघारीनंतर तूर्त तरी स्थगित झाला आहे; मात्र विजयी मेळावा हे दोन्ही पक्ष घेऊ शकतात, असे आता सांगितले जाऊ लागले आहे. खरं तर, या दोन ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा गेली ४ महिने सुरू आहे. या युतीमध्ये विघ्नांची मालिकाही दिवसागणिक वाढत होती; मात्र आता मोर्चाच्या निमित्ताने एकत्र आलेले ठाकरे बंधू एक होण्याची शक्यता वाढल्याचे सांगितले जात आहे. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या नेत्यांनी राज ठाकरेंच्या दरबारात हजेरी लावल्यानंतर ठाकरे बंधूंची युती फिसकटेल असा एक विचार प्रवाह पुढे आला होता.

दुसऱ्या बाजूला भाजपनेही राज यांना साद घातली होती. सहाजिकच एकही खासदार अथवा आमदार नसलेल्या मनसेची 'राज'दरबारात किंमत वाढत गेली. हाच मुद्दा ठाकरे बंधूंच्या युतीच्या काहीसा मुळावर आल्याचे सांगितले जाऊ लागले; मात्र मोर्चाच्या निमित्ताने झालेले मनोमिलन या चर्चांना पूर्णविराम देणारे ठरले. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचा एकत्रित मोर्चा होण्यापूर्वी सरकारने माघार घेतली. या माघारीमुळे मोर्चातील



एकीचा आविष्कार होणे थांबले असले, तरी विजयी मेळाव्याच्या निमित्ताने दोन्ही पक्ष एकत्र येणार आहेत आणि त्यातूनच मुंबई महापालिकेचे रणशिंग फुंकले जाईल असे आजचे वातावरण आहे.

दुसऱ्या बाजूला ठाण्यात सत्तारूढ महायुतीतील भाजप आणि शिंदेची शिवसेना मोठा भाऊ कोण, अशी चर्चा रंगताना दिसत आहे. हे दोन पक्ष सध्या एकत्र असले, तरी महापालिका निवडणुकीत त्यांच्या एकीवर प्रश्नचिन्ह आहे. अशा स्थितीत ठाकरे बंधूंची यूती ठाण्याच्या राजकारणातही मोठा प्रभाव दाखवण्याची शक्यता आहे. एकंदरीत कोकणात ही युती झाली, तर महायुतीला मोठे आव्हान उभे राहू शकणार आहे. मनसे आणि उद्धव सेनेची एकत्र मोर्चेबांधणी ही कोकणात तरी नव्या राजकीय समीकरणांची पायाभरणी करू शकते, हा राजकीय जाणकारांचा कयास आहे.

दोन ठाकरे बंधूंचा मोर्चा आता ५ जुलैला विजयी मेळाव्यात परावर्तित होणार आहे. ५ आकडा हा ठाकरे बंधूंना शुभ ठरून त्यांचे मनोमिलन होईल की आणखी काही, हे नजीकचा काळ ठरवेल; मात्र सध्या तरी मनसेसैनिक आणि शिवसैनिक हे वेगवेगळ्या आंदोलनाच्या रूपाने एकत्र येताना दिसत आहेत. खरं तर, मनोमिलनाच्या चर्चा सुरू झाल्या तेव्हाच राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यांतील दोन्ही पक्षांचे पदाधिकारी एकत्र आंदोलने करू लागले होते. ठाण्यात मनसेचे माजी आमदार राजू पाटील आणि ठाकरे शिवसेनेचे दीपेश म्हात्रे यांनी एकत्र आंदोलन करून या मनोमिलनाला साद दिली होती. मुंबईतही आदित्य ठाकरे आणि अमित यांच्यातही साद-प्रतिसाद दिला गेला होता. आता मोर्चाच्या निमित्ताने बंद झालेल्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या आहेत. या सर्व पक्षांचे मुख्य टार्गेट हे मुंबई महापालिका आहे. आंदोलनासाठी झालेले हस्तांदोलन मुंबई महापालिकेपर्यंत टिकणार का, याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

राज-उद्धव एकत्र आले, तर महापालिका निवडणुकांमध्ये नवा रागरंग पाहायला मिळेल, असे सांगितले जात आहे. एका बाजूला महाविकास आघाडी शीण झालेली आहे, तर दुसऱ्या बाजूला महायुती बळकट झालेली आहे. यात महाविकास आघाडीला मनसे फॅक्टरची मदत झाली, तर निवडणुका तुल्यबळ होतील, असा सार्वत्रिक अंदाज आहे; मात्र हे सर्व होण्यासाठी आंदोलन ते हस्तांदोलन आणि मोर्चामिलन ते मनोमिलन ही प्रक्रिया होणे बाकी आहे.

**शशिकांत सावंत**




**झाडांना, वनस्पतींना संगीत ऐकवा..**
**झाडांना, वनस्पतींना मंत्र ऐकवा..**
**म्हणजे,**
**झाडे, वनस्पती, भरभरून वाढतील आणि उत्तम पीक देतील..**
**ही वनस्पती विज्ञानातील नवी भोंदूगिरी आहे!!**

एक साधी गोष्ट यामध्ये विसरली जाते.समजा झाडांना आपण मंत्र पुटपुटून 'ऐकवले' तर झाडांना कान असतात का? असा साधा प्रश्न या मंत्रवाल्यांना आणि मंत्रवाल्या राजकारण्यांना पडत नाही. कारण ते विज्ञानातले 'ढ' लोक आहेत! वनस्पतींना मंत्र ऐकवल्यानंतर त्या मंत्रांचा अर्थ कळण्यासाठी त्यांना मेंदू हवा. 'वनस्पतींना मेंदू असतो' हे या मंत्रावाल्यांच्या मेंदूतून निघालेली अफलातून बिनडोक कल्पना आहे.

वास्तवात कुठल्याही गोष्टीचा अर्थ लावायचा म्हटले तर मानवाला जसा मेंदू आहे तसे मेंदूचे सर्व भाग वनस्पतीमध्ये असायला हवेत. पण कोणत्याही वनस्पतीमध्ये मेंदू तर सोडाच पण मज्जासंस्था किंवा नर्व्हस सिस्टीम देखील नसते. त्यामुळे तुम्ही मंत्र म्हणा.. आरडाओरडा करा.. नाहीतर कुठलेही गाणे ऐकवा.. संगीत ऐकवा.. ते त्या वनस्पतींना कसे कळेल?

मंत्रवाल्यांच्या धर्मातील लोकांनाच संस्कृतचा अर्थ मेंदू असून कळत नाही तिथे वनस्पतींची काय बात.वनस्पतींना जाणीव असतात असा दावा केला जातो. वास्तवात हा दावा दिशाभूलचा आहे. बॅक्स्टर नावाच्या एका कथित संशोधकाने याची सुरुवात केली होती. त्यानंतर, २००६ मध्ये, ई.डी. ब्रेनर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'ट्रेंड्स इन प्लांट सायन्स' या मुख्य प्रवाहातील जर्नलमध्ये 'प्लांट न्यूरोबायोलॉजी: एन इंटिग्रेटेड व्ह्यू ऑफ प्लांट सिग्नलिंग' या शीर्षकाचा एक वादग्रस्त लेख प्रकाशित केला. तेव्हापासून, 'वनस्पती विचार करतात आणि अनुभवतात' ही अवास्तव कल्पना एक लहान कॉटेज उद्योग बनली आहे, जी पॉडकास्ट, यूट्यूब व्हिडिओ आणि यासारख्या गोष्टींद्वारे सामान्य लोकांच्या चर्चेत पसरली आहे आणि अंधश्रद्धा निर्माण करत बसली आहे!

वनस्पती सक्रिय वर्तन दाखवत नाहीत. वनस्पतींमधील विद्युत सिग्नल आणि प्राण्यांच्या मज्जासंस्थेमधील विद्युत सिग्नल यांच्यात लक्षणीय फरक कार्यात्मक दृष्ट्या आहे. (वनस्पतींमध्ये Ca 2+ सिग्नलिंग आणि ऑस्मोटिक नियंत्रण यांचा समावेश असतो.) वनस्पतीमध्ये विद्युत निर्माण होते कारण त्यांच्या पेशी मध्ये हायड्रोजन प्लस हे रसायन काम करते आणि मानवामध्ये हेच काम सोडियम प्लस हे रसायन काम करते. दोन्हींमध्ये असलेला हा फरक एवढाच नाही तर या विद्युत चेतनेमुळे जे बदल घडतात ते वनस्पतीमध्ये केवळ रासायनिक बदलांमुळे घडतात तर मानवामध्ये मेंदू व नर्व्हस सिस्टीम असते त्यामुळे घडतात. म्हणूनच मानवाला भाषा आणि परिस्थिती यांचे आकलन होते. ज्याला कॉग्निशन असे म्हणतात. असे कॉग्निशन मेंदू नसल्यामुळे वनस्पतींमध्ये होत नाही. म्हणूनच वनस्पतींना संगीत ऐकवले तरी त्याचा अर्थ त्यांना काही कळणार नाही आणि मंत्र पुटपुटले तरी ते शब्द त्यांना समजणार नाहीत. मानवात एखादी भाषा शिकायला शाळेला जावे लागते किंवा सतत भाषेच्या संपर्कात राहावे लागते. वनस्पती अशी भाषा शिकत नाहीत. त्यामुळे त्यांना मंत्राचे सामर्थ्य वगैरे कळणे शक्य नाही. याशिवाय जेव्हा वनस्पतींमध्ये व प्राण्यांमध्ये ऊर्जा निर्माण होते तेव्हा त्या ऊर्जांची मोजणी देखील केली तर ती भिन्न येते. ज्याला नर्नस्ट प्लांक ईक्वेशन म्हणतात.

जर एखाद्या माहितीचे रूपांतर अर्थामध्ये करावयाचे असेल तर त्यासाठी विशिष्ट यंत्रणा लागते जी मानवाच्या शरीरात असते.ॲक्शन पोटेन्शियल आणि कॅल्शियम एलेवेशन नावाची रासायनिक यंत्रणा ही माहिती चे रूपांतर या यंत्रणेच्या आधार घेऊन अर्थामध्ये करते. जे वनस्पतींमध्ये नसते. थोडक्यात वनस्पती मधील जैव विद्युत रासायनिक बदल हे कुठलीही कृती किंवा आवाज 'समजून घेण्यास' अक्षम ठरतात.

वनस्पतींना वेदना जाणवतात किंवा त्या आनंदी होतात या निव्वळ कवी कल्पना आहेत. कारण वेदना किंवा भावना निर्माण होण्यासाठी भावनेची मेंदूतील केंद्रे ही आवश्यक असतात. वनस्पतींमध्ये जेव्हा एखाद्या गोष्टींनी हालचाल होते उदाहरणार्थ, लाजाळूचे झाड, तेव्हा त्यामध्ये ॲक्शन पोटेन्शियल आणि व्हेरिएशन पोटेन्शियल नावाची यंत्रणा काम करत असते आणि वनस्पती मधील फ्लोएम नावाचे जाळे हे काम करते. प्राण्यांमध्ये असलेले मज्जासंस्थेचे जाळे आणि मेंदू हे वनस्पती मध्ये नसल्यामुळे वेदना, जाणीवा ,या क्रिया घडत नाहीत.

'वनस्पती मज्जातंतूशास्त्री' नावाची नवीन जमात बुद्धिमत्ता, आकलनशक्ती आणि अगदी भावना यासारखे शब्द वाटेल तसे वापरतात, वनस्पती आणि प्राण्यांमधील कथित समानता सतत अधोरेखित करतात. परंतु अशा शब्दांचे विशिष्ट अर्थ असतात - विशेषतः वैज्ञानिक संदर्भात - आणि ते प्राण्यांसाठी वापरलेले अर्थ वनस्पतींना लागू होत नाहीत.

काही वेळा हे मंत्र वाले असा दावा करतात की वनस्पतींचा मेंदू हा वनस्पतींच्या मुळात असतो पण असे कुठेही सिद्ध झालेले नाही. समजा वनस्पतींना सर्व काही समजते असे जर असते तर सर्व वनस्पतींमध्ये विचारांची देवाण-घेवाण झाली असती आणि सर्वांनी एकत्र येऊन हेतूपूर्वक एखादे काम उरकले असते. पण तसे काही दिसत नाही.

वनस्पतींच्या वर्तनामध्ये हार्मोन्स आणि पर्यावरणीय रिसेप्टर्सद्वारे अंतर्गत आणि बाह्य सिग्नलिंगचा समावेश असतो. परंतु या यंत्रणा प्राण्यांच्या न्यूरॉन्स, सायनॅप्सेस आणि तत्सम गोष्टींशी साधर्म्यपूर्ण नाहीत.

वनस्पती जाणीवेबद्दलच्या मंत्रयुक्त अशा संशयास्पद कल्पना या वैज्ञानिक शाखेला हानी पोहोचवू शकतात. वनस्पती जाणीवेची ही अवास्तव कल्पना केवळ सामान्य लोकांची दिशाभूल करत नाही, तर तरुण, महत्त्वाकांक्षी वनस्पती जीवशास्त्रज्ञांमध्ये वनस्पती विज्ञानाबद्दल चुकीचे विचार निर्माण करू शकते. वनस्पती जाणीवेची ही भन्नाट कल्पना वैज्ञानिक संशोधन नियमनावर परिणाम करू शकते . आणि म्हणूनच अशी कल्पनारम्यता थांबवणे आवश्यक आहे.

हल्ली धार्मिक लोकांना विज्ञानाची मदत घेण्याची उबळ आलेली आहे. कारण वैज्ञानिक परिभाषेत सांगितले की लोकांना ते पटते. त्याचबरोबर राजकारण्यांना धर्माचा वापर करून धर्मातील अनेक कल्पना वैज्ञानिक कशा आहेत हे सांगण्याची घाणेरडी सवय लागलेली आहे. यातून त्यांना सांस्कृतिक वर्चस्व आणि सत्ता ताब्यात ठेवणे हे उद्दिष्ट साध्य करायचे असते आणि अर्थातच हे अत्यंत गलिच्छ राजकारण आहे. यामुळे राष्ट्राचे तर नुकसान होतेच आहे शिवाय सामान्य माणूस भ्रमित होऊन विचित्र वागू लागला आहे. हा देश वेड्यांची धर्मशाळा बनवायला आत्ताच्या राजकारण्यांना आणि धार्मिक वर्चस्ववाद्यांना आता फार काळ लागणार नाही हे मात्र खरे!!

**-डॉ. प्रदीप पाटील**
सांगली

# हिंदीच्या सक्तीला स्थगिती, पण...

चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या विरोधात उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह विरोधी पक्षांनी कडाडून विरोध केल्यामुळे हिंदी सक्तीच्या संदर्भात सरकारने काढलेल्या दोन्ही सरकारी आदेशांना स्थगिती दिल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असली तरी, राज्यातल्या सरकारी शाळांच्या अस्तित्व आणि घसरलेल्या शैक्षणिक दर्जाची समस्या मात्र कायमच आहे. आम्ही जाहीर केलेल्या मुंबईतल्या मोर्चामुळे सरकारे हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केल्याचा दावा शिवसेनेच्या ठाकरे गटाचे अध्यक्ष-माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला असला तरी, प्रत्यक्षात मात्र सरकारच्या या नव्या निर्णयामुळे राज्यातला घसरलेला प्राथमिक शिक्षणाचा दर्जा मात्र सुधारणार नाही. हिंदीच्या सक्तीला विरोध करणाऱ्या ठाकरे यांच्या सरकारने त्रिभाषा शिक्षणाचे धोरणाच्या अहवालाला मंजुरी दिली होती. पण आता तेच उध्दव ठाकरे आम्ही तस परिपत्रक काढले नव्हते. मुंबईसह राज्यातल्या महापालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे सारे मराठी भाषेचे अभिमानी राजकीय पक्ष एकवटले आणि त्यांच्या सत्तेच्या राजकारणाचा भाग होता आणि आहे. गेल्या २० वर्षात राज्यातल्या हजारो जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळा बंद पडल्या. राज्याच्या ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पीक फोफावले. इंग्रजीशिवाय नव्या जगाची आव्हाने स्वीकारताच येणार नाही, असे समर्थन करणाऱ्या याच राजकीय पक्षांच्या नेत्यानी हिंदी सक्तीला विरोध केला. पण यांची

मुले मात्र इंग्रजी माध्यमाच्या महागड्या शाळेतच शिकतात. राज्यातल्या दुर्गम, ग्रामीण आणि गरीब कुटुंबातल्या मुलांना इंग्रजी माध्यमाचे महागडे शिक्षण परवडणारे नसल्याने त्यांच्या मुलांना जिल्हा परिषदांच्या महापालिका, नगरपालिकांच्या शाळांशिवाय अन्य पर्याय नाही. पण, दुर्दैवाने राज्यातल्या विशेषतः दुर्गद भागातल्या सरकारी प्राथमिक शाळांची सुरु असलेली ससेहोलपट, दुरवस्था मात्र संपायला तयार नाही. पुरेशा विद्यार्थ्याअभावी गेल्या १० वर्षात राज्यातल्या हजारो सरकारी प्राथमिक शाळा बंद पडल्या तर हजारो प्राथमिक शाळांच्या इमारती गळक्या, पडझड झालेल्या आहेत आणि अशा जीवघेण्या अवस्थेतच अशा धोकादायक शाळांच्या इमारतीत हजारो विद्यार्थी शिकतही आहेत. शेकडो शाळांच्या पहली ते चौथी इयत्तेपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी फक्त एकच शिक्षक तर अनेक शाळात पुरेसे शिक्षकही नाहीत. सरकारी शाळात पुरेशा शैक्षणिक सुविधाही नाहीत. अशा प्रतिकूल परिस्थितीतही काही जिद्दी आणि निष्ठावान शिक्षकांनी लोकसहभागातून शाळांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबरोबरच नव्या खोल्याही बांधल्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देणाऱ्या शेकडो शाळाही या जिल्हा परिषदांच्या सरकारी शाळांच्या ससेहोलपटीच्या स्थितीत नावारुपाला आल्या आणि येत आहेत. अशा गुणी शिक्षकांना पाठबळ देण्याऐवजी प्रशासनाकडून त्यांनाच त्रास देण्याचे उद्योगही काही ठिकाणी झाले. हिंदीची सक्ती रद्द केल्याने शैक्षणिक सुधारणा होणार नाहीत तर राज्यातल्या सरकारची शाळांची ही दुर्दशा थांबवण्यासाठी सरकारने तातडीने नियोजनबध्द आराखडा अंमलात आणायला हवा. मराठी शाळा टिकल्या, जगल्या, वाचल्या तरच अभिजात मराठीचा वारसा जपता येईल, पुढे नेता येईल, इतकेच !

**श्रीहरी**

# मराठी मुलांवर हिंदी भाषेची सक्ती अयोग्यच...

नुकतेच आपल्या राज्यातील शालेय शिक्षणात हिंदी विषय सक्तीचा करण्याचा प्रस्तावावरुन सध्या राज्याच्या राजकारणात आणि समाजमनात एक नवीन वादाचा धुराळा उठलेला आहे. केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण धोरणानुसार हिंदी विषय द्वितीय भाषा म्हणून सक्तीचा करण्याच्या प्रयत्नावरून शिवसेना उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी अस्तित्वावर व अस्मितेवर गदा आणण्याचा आरोप करत महायुती सरकारला धारेवर धरले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सर्व शाळांच्या मुख्यध्यापकांना थेट पत्र पाठवून विद्यार्थ्यांवर हिंदी विषयाची सक्ती करू नये, अशी सक्त सूचना दिली आहे. मराठी मुलांवर हिंदी लादण्याचा हा प्रकार म्हणजे भाषिक व सांस्कृतिक दडपशाही असल्याचा कडवट सूर त्यांनी आळवला आहे.

तामिळनाडूसह इतर काही राज्यांनी यापूर्वीच केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राला विरोध केला आहे. हिंदी सक्तीच्या मुद्दयाला एक प्रकारे राजकीय केंद्र व प्रादेशिक स्वायत्तता यातील संघर्षाचे स्वरूप प्राप्त होत आहे.हिंदीसह इंग्रजी आणि मातृभाषा या तिन्ही भाषांचे महत्व टिकवून ठेवले पाहिजे. मात्र अनेक अभ्यासकांना, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे मुलांच्या मातृभाषेतच अधिक परिणामकारक वाटते. काही भाषा शास्त्रज्ञांच्या मतानुसार मराठी मातृभाषा असलेल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मराठीतच व्हावे, ही मागणी निश्चितच अनावश्यक वाटत नाही. मराठीची अस्मिता, मराठीचा सन्मान कायम ठेवून हिंदी शिकवण्याचा पर्याय खुला ठेवावा, पण सक्ती न करता ऐच्छिक ठेवावी, असा त्यांनी माध्यम मार्ग सुचवला आहे.सत्ताधारी भाजपला उत्तर भारतीय मतदारांची मने दुखवायची नसल्यामुळे मराठी अस्मिता व हिंदीचा दबाव यातील समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी ही केवळ भाषा नाही तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि बौद्धिक ओळखीचा मूळ गाभा आहे. अशावेळी राज्यात हिंदी भाषेची सक्ती केली तर तो फक्त शिक्षणातील निर्णय राहात नाही तर तो एक सांस्कृतिक व राजकीय हस्तक्षेप म्हणून पाहिला जातो. हिंदी शिकली पाहिजे, पण त्याचा मार्ग आकर्षणाचा असावा, सक्तीचा नव्हे.

**मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

# यवतमाळ शहरात मोटारसायकल चोरी प्रकरण उघडकीस

## ८ मोटार सायकलींसह दोन आरोपी गजाआड

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - शहरात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली असून, दोन आरोपींच्या ताब्यातून तब्बल आठ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. एकूण ४ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ जुलै रोजी यवतमाळ उपविभागीय पथकाने खाजगी वाहनाने गस्त सुरू असताना मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. मुखबिराकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेख सोहेल शेख मेहबूब (वय २७, रा. सचालखे ले-आऊट, मेमन कॉलनी, यवतमाळ) हा गेल्या काही दिवसांपासून यवतमाळ शहर व परिसरातून मोटारसायकल चोरी करून विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. त्याच्याकडून विना नंबर प्लेटची मोटारसायकल ताब्यात घेण्यात आली. तपासादरम्यान त्याने आणखी मोटारसायकली चोरी केल्याचे कबूल केले.

त्यानंतर, फारुख खान उर्फ शाहरुख शमशेर खान (वय ३२, रा. अकबर नगर, सुन्नी मस्जिद जवळ, अमरावती) याला देखील मेमन कॉलनी परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या कडूनही विना नंबरची पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, ती मोटारसायकल वडगाव ग्रामपंचायत येथून चोरी केल्याचे उघड झाले. याशिवाय त्याने नेर येथून देखील स्प्लेंडर मोटारसायकल चोरी केल्याचे तपासात स्पष्ट झाले. जप्त केलेल्या आठ मोटारसायकल्सची एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ४ लाख २० हजार रुपये इतकी आहे. सदर कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक मा. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक मा. पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. यामध्ये पो.उप.नि. गजानन राजमल्लू, स.फौ. सै. साजिद, पो.ह.वा. रुपेश पाली, पो.ह.वा. योगेश डगवार, पो.ह.वा. प्रशांत हेडाव, पो.ह.वा. कविश पाळेकर, पो.शि. सुनिल पैठणे, आकाश सूर्यवंशी, पो.शि. देवेंद्र होले, पो.शि. सोहेल मिर्झा, पो.शि. दिगंबर पिलावन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# महागांव येथे शासकिय आदिवासी इंग्रजी आश्रम शाळा होणार

आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र शासन

> महागांव तालुक्यातील बहुतांश माझे आदिवासी विध्यार्थी हे शिक्षणापासून वंचित होते. आता त्यांना आपल्याच महागांव तालुक्यात शिक्षण घेण्यास इंग्रजी माध्यमाची आश्रम शाळा होणार आहे. विधार्थी हा समाजाचा केंद्रबिंदू असून आदिवासी समाजाचे उज्वल भविष्य आहे. **- अँड सुनील ढाले**

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - महाराष्ट्र राज्यातील डोंगराळ व अतिदुर्गम भागातील आदिवासीमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने शासनाने सन 1972-73 पासून आश्रम शाळा योजना सुरु केली या योजनेतर्गत सध्या शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या 497 शाळा सुरु आहेत.

परंतु अमरावती विभागाअतर्गत पुसद आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा, बोरिवन ता. उमरखेड जि यवतमाळ हि आश्रम शाळा अपूर्ण विध्यार्थी संख्यामुळे बंद करण्यात आली होती मात्र आस्थापना कार्यरत आहे आदिवासी मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने महागाव येथे सुरु करण्याचा निर्णय हा शासनाने घेतला आहे सदर शाळा हि इंग्रजी माध्यमातून सुरु होणार पुसद प्रकल्पामध्ये महागांव असा एकमेव आदिवासी बहुल तालुका आहे जिथे आदिवासी वसतिगृह, आश्रमशाळा नव्हती पण आता मात्र शाळा होणार यासाठी शासनाने हिरवी झेंडी दिली आहे यासाठी मा.आदिवासी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आदिवासी विकास विभाग पुसद, विविध आदिवासी सामाजिक संघटना,आदिवासी सामाजिक कार्यकर्ते यांचा मोठा वाटा आहे. आता बहुप्रतीक्षेनंतर आता महागाव आदिवासी बांधवांकडून राज्यंत्री इंद्रनील नाईक व विविध समाजिक संघटनांचे पदाधिकाऱ्यांचे मनपूर्वक अभिनंदन केल्या जात आहे.

> आदिवासी राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांचे संघटनांच्या वतीने आभार

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुकांचे जल्लोषात स्वागत

जनमाध्यम प्रतिनिधी




पुसद - वंदनीय गुरुमाऊली राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कुलदैवत पंढरीचा पांडुरंग होय त्यामुळे बालपणापासूनच त्यांना विठ्ठल भक्तीची ओढ होती व अत्यवस्थ अवस्थेत सोडून त्यांनी पंढरपूर ची वारी आयुष्यभर केली दरवर्षी लाखो वारकऱ्यांना आपल्या भजनांनी मंत्रमुग्ध केले अंतिम भजन पंढरपूरला गाऊन खंजिरी ठेवली ती पुन्हा हाती घेतली नाही सर्व गुरुदेव भक्तांनी दर्शनासह महाराजांचे साहित्य व आयुर्वेदिक औषधी घ्याव्या असे प्रतिपादन मुख्य आयोजक व व्यवस्थापक सुशील महाराज वणवे यांनी केले.

दरवर्षी गुरुकुंज मोझरी येथून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुकासह गावोगावी त्यांच्या विचारांचा प्रचार,प्रसार, ध्यान, सामुदायिक प्रार्थना, भजन, भाषण, प्रवचन, किर्तन करत पंढरपूर येथे जात असते. पुसद नगरीत त्यांची व्यवस्था मधुकर आजमीरे व प्राचार्य डॉ. संजय गुमळे यांच्या कडे असते. यावर्षी सुद्धा मधुकर आजमिरे, डॉ. संजय गुमळे, प्रा. प्रकाश लामने यांच्या निवासस्थानी मान्यवरांच्या व शेकडो गुरुदेव भक्तांच्या उपस्थितीत चरण पादुका दर्शन सोहळा पार पडला. यावेळी सुशील महाराज वणवे सह पुजारी एकनाथ महाराज गावंडे, राजेंद्र महाराज कठाडे, जिवन महाराज मेटकर, कृष्णा बोराडे, गणेश जवंजाळ, प्रमोद देशमुख, गणेश घाटोळ, सुधाकर जाधव, अमोल बारंगे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रा. नंदकुमार खैरे लिखित पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चरण पादुका पालखी सोबत आलेल्या गुरुदेव प्रेमींनी रसाळ भजने सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून प्रा. शरद राऊत यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुका पुसद नगरीत येणे अहोभाग्य असल्याचे सांगितले. यावेळी राष्ट्रिय किर्तनकार भिमराव महाराज,डॉ.राजेंद्र जाजु, प्राचार्य रविंद्र महल्ले, भैय्यासाहेब पदावार, विनय व्यवहारे, नंदकुमार पंडित, ज्ञानेश्वर तावलोडे,माजी केंद्रप्रमुख निवृत्तीनाथ बैस्कार, ग्रामगीताचार्य किसन गरडे, शिवशंकर नागरे,यशवंत देशमुख, ज्ञानेश्वर इंगोले, बाबासाहेब वाघमारे, मनोहर बनस्कर, सुरेश कदम, अशोक भगत महाराज, शिव लिंग पटवे, रमेश सारंगे, पुंडलीक भालेराव, यशवंत भगत, अनिल अस्वार, श्यामराव देशमाने, ग्रामगीताचार्य नारायण कवतकर, हालमोंडे महाराजांसह असंख्य पुरुष व महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सेवाधिकारी गणेश धर्माळे यांनी तर आभारप्रदर्शन गुरुदेव सेवा मंडळ शाखा पुसद अध्यक्ष प्रा. प्रकाश लामने यांनी मानले.

# यवतमाळ नगरपरिषदेत कोट्यवधींचा घोटाळा

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ नगर परिषद अंतर्गत हायमास्ट व एलईडी लाईट बसवण्याच्या कामात तब्बल 1 कोटी 78 लाख 90 हजार 564 रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप यवतमाळचे काँग्रेस आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी विधानसभेत केला आहे. कामाचा अनुभव नसलेल्या ठेकेदाराला नियमबाह्य निविदा देऊन, नगर परिषदेतील अभियंता व पुरवठादार यांनी संगनमताने हा आर्थिक भ्रष्टाचार केल्याचा आरोप त्यांनी केला.

शहरात 42 सोलर हायमास्ट बसवण्यासाठी 3 कोटी 14 लाख 07 हजार 764 रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकृत तांत्रिक मंजुरी शिवायच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यामुळे सोलर हायमास्टसह एलईडी लाईट बसवण्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले असून, सुमारे 1.78 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. तसेच, दलित व अल्पसंख्यांक वस्तीतील विकास कामातही मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली असून, नगर परिषदेतील सफाई कामगारांच्या किमान वेतन व ईपीएफच्या बाबतीतही नगर प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. सफाई मजुरांचे आर्थिक शोषण होत असून, अधिकारी व ठेकेदार मात्र मालामाल होत असल्याचा गंभीर आरोप आमदार मांगुळकर यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अभियंता व ठेकेदारांवर त्वरित कडक कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी विधानसभेत केली.

> आ. मांगुळकर यांचा गंभीर आरोप, सोलर हायमास्ट कामात १.७८ कोटींचा घ्रष्टाचार

# पोलीस स्टेशन खंडाळाचे ठाणेदाराविरुद्ध दोन महिलांचे भरपावसात आमरण उपोषण

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - तालुक्यातील पो.स्टे. खंडाळा येथील ठाणेदार देविदास पाटील यांनी कोणताही गुन्हा दाखल नसतांना जबरदस्तीने अनिताबाई बन्सी कांबळे या महिलेस मोटार सायकलवर हाताला धरून बसवुन पुसदच्या तहसिल कार्यालयात पोलिसाला आणावयास सांगितले याबाबत या महिलेने वरिष्ठांशी अनेक तक्रारी करून सुद्धा ठाणेदार देविदास पाटील यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने सदर महिला पुसद येथील उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयासमोर दिनांक १ जुलै पासून आमरण उपोषणास बसली आहे तसेच मिराबाई बबन कान्हेकर वय ५४ वर्ष राहणार देवठाणा ही महिला सुद्धा आपल्या मालकीच्या प्लॉट संदर्भात ठाणेदार देविदास पाटील यांनी आपल्या तक्रारीवर कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने दिनांक २ जुलैपासुन उपविभागीय पोलीसअधिकारी पुसद यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसली आहे.

अनिताबाई बन्सी कांबळे वय ६८ वर्ष राहणार देवठाणा तालुका पुसद, हीने दिनांक १६ जून २०२५ ला एस.पी. कार्यालय यवतमाळ यांच्या कार्यालयात व अगोदर एस.पी. यांना प्रत्यक्ष भेटून शेती पेरण्याकरीता पोलीस संरक्षण मिळण्याबाबत अर्ज दिला होता. त्यानंतर खंडाळा पोलीस स्टेशन यांना जाऊन भेटा असे पोलिस अधिक्षक यांच्या म्हणण्यानुसार सदर महिला खंडाळा पो.स्टे. ला शेती पेरण्यासाठी संरक्षणाच्या बाबतीत अर्ज अनेकदा घेऊन गेली. तसेच तिच्या सासुच्या व पतीच्या नावाने आजही ७/१२ मालकीचा असतांना व तसा न्यायालयाकडून देखील न्याय मिळलेला आहे. या करीता वारंवार पोलीस संरक्षणाच्या मागणीसाठी खंडाळा पोलीस स्टेशनला जात होती. तेव्हा तिला कुठल्याही प्रकारचे संरक्षणही दिले नाही व तिचा अर्ज देखील ठाणेदार देविदास पाटील यांनी घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे सदर महिलेने उपविभागीय पोलिस अधिकारी पुसद यांना दि. २६/०६/२०२५ ला अर्ज देवून चौकशी करून कारवाई करण्याबाबतचा अर्ज दिला होता. व एस.पी.ला अर्ज ई मेल व्दारे पाठविलेला होता. त्यामुळे सदर महिलेवर चिडून ठाणेदार देविदास पाटील यांनी उलट कारवाई केली.ठाणेदार देविदास पाटील यांनी सदर महिलेवर चिडून तुमच्यावरच आता कारवाई करतो व जास्त तुम्ही माजले, तुम्ही हरामखोर आहेत, बदमाश आहात, तुमचे शेतीचा काहीही अधिकार नसतांना त्या शेतात तुम्ही गेल्यास तुमच्यावर खोटा गुन्हा नोंदवितो व आजही तुमच्यावर थेट कारवाई करून तहसिल कार्यालयात मी पाठवितो असे म्हणत पोलीसांना बोलावून सांगितले की, हिच्यावर १०७ तहसिल ची कार्यवाही करा. ठाणेदार देविदास पाटील यांनी अनिता बाई कांबळे हीस पोलीस स्टेशनला ११.०० वाजे पासुन ते ३.००वाजे पर्यंत बिना पाण्याचे व बाथरूमला जाऊ न देता बसवुन ठेवले. तसेच गैरअर्जदार यांनी सांगितले की, या बाईला मोटार सायकलवर बसवुन शिपायास सांगा की, हिला फरफटत तहसिल कार्यालयावर घेऊन जा. तेव्हा सदर महिला जोरजोराने ओरडत होते की, माझा पोलीस संरक्षणाचा अर्ज तरी घ्या. यावरून कसाबसा अर्ज स्विकारला. याबाबत अनिता बाई कांबळे हिने वारंवार तक्रारी करून सुद्धा देविदास पाटील यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात न आल्याने अनिता बाई कांबळे या दिनांक ०१.०७.२०२५ पासुन तहसिल कार्यालय पुसद समोर आमरण उपोषणास बसलेल्या आहेत.

## • वेचक

### वृत्तपत्र वितरक युवकांना डॉ. नीरज वाघमारे मित्रपरिवार, यवतमाळ यांच्याकडून रेनकोट वाटप



यवतमाळ - पावसाळ्याच्या दिवसांत पहाटेपासून वृत्तपत्रांचे वाटप करणाऱ्या युवकांना पावसामुळे होणारा त्रास लक्षात घेता, डॉ. नीरज वाघमारे व मित्रपरिवार, यवतमाळ यांच्या वतीने रेनकोटचे वाटप करण्यात आले. वृत्तपत्र वितरक हे कोणत्याही ऋतूमध्ये नियमितपणे जनतेपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम करतात. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत सामाजिक उत्तरदायित्व म्हणून हे रेनकोट वाटप करण्यात आले. यावेळी डॉ.वाघमारे यांनी सांगितले की, "ही केवळ एक छोटी मदत असून समाजासाठी काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला सन्मानित करणे हीच खरी सेवा आहे." कार्यक्रमात अनेक वृत्तपत्र वितरक युवक उपस्थित होते. त्यांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

### "एक पेड माँ के नाम" राष्ट्रीय हरित सेनेचा उपक्रम



राळेगाव - न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय राळेगाव येथे दिनांक 3 जुलै रोजी राष्ट्रीय हरित सेनेच्या माध्यमातून एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील इको क्लब च्या माध्यमातून "एक पेड माँ के नाम" या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटावे यासाठी शाळेमध्ये प्रत्यक्ष विद्यार्थी व आई यांच्या माध्यमातून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विजय कावरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे , पर्यवेक्षक सुचित बेहेरे, हरित सेना प्रमुख, गोपाल बुरले तसेच शाळेतील विद्यार्थिनी कु. अक्षरा विशाल आत्राम व आई सौ अश्विनी विशाल आत्राम यांच्याहस्ते शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक राजेश काळे, विनोद चिरडे, नितीन जुनूनकर तसेच शिपाई सुरज पवार व हरित सेनेचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका यावेळी उपस्थित होते.

### चोरांबा येथे वणबीज टोबणीअभियानाला सुरुवात, वनहक्क समितीचा पुढाकार



घाटंजी : 2 जुलै रोजी तालुक्यातील गाव चोरांबा येथे सामूहिक वनहक्क समितीचे अध्यक्ष बंडू गणपत तोडसाम व सचिव सौ. कांचन वाल्मिक उरकुडे ज्योती विजय रंधये (सरपंच) यांच्या उपस्थितीत वणबीज टोबनी अभियान आज राबविण्यात आले. वणबीज टोबनी करीता भेट व बी. एफ.टी. तसेच स्वयंसेवक यांच्या उपस्थित तसेच सि. एफ. आर. एम. सी.समिती सदस्य ग्रामपंचायत सदस्य व सन्माननीय पदाधिकारी कृषी सखी, पशु सखी, अंगणवाडी सेविका यांच्या सहभागाने सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रात वणबीज टोबनी करण्यात आले.वणबीज टोबनी करीता खालील वणबिजांचा समावेश करण्यात आला. करंज, बहावा, बेल, चिंच, निंबोळी, मोहटोळं व जांभूळ इत्यादी वणबीजचा समावेश करण्यात येऊन या अभियानमध्ये वणबीज टोबनीचे महत्व समजावून सांगण्यात आले. वणबीज ची ओळख करून देण्यात आली.या वनबीज टोबनी अभियानामध्ये उपस्थित असलेल्या नागरिकांनी हे वणबीज उगवल्यानंतर याचे संगोपन करण्याचा निर्णय सामूहिक वनहक्क समितीने हाती घेतला आहे, असे सी. एफ. आर. एम. सी. समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी या वनबीज टोबनी अभियानमध्ये सर्वांना सांगितले. वरील अभियानात सहभागी अभिलाषा, विनोद, रोशना, संतोष, सारंग, स्वप्नील हे फेलो उपस्थित होते.

### सहकार वर्षनिमित्त नेर येथे निबंध स्पर्धेचे आयोजन

यवतमाळ - सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, नेर व नेर अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी मर्यादित नेरच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षनिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्याचे घोषित केलेले आहे. त्याअनुषंगाने सहकार विभागामार्फत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी ५ जुलै रोजी अंतरराष्ट्रीय सहकार दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. तसेच दि.६ जुलै रोजी केंद्र शासनामध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापनेला ४ वर्ष पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने दि. ६ जुलै हा दिवस चौथा स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

# धारेगाव येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

## स्थानिक गुन्हे शाखा व महागाव पोलीस प्रशासनाची संयुक्त कार्यवाही

जनमाध्यम प्रतिनिधी




महागाव : तालुक्यातील धारेगाव शिवारात सुरु असलेल्या फिरत्या जुगारावर स्थानिक गुन्हे शाखा आणि महागाव पोलिसांच्या पथकाने संयुक्त कार्यवाही करून जुगार खेळणाऱ्या ६ जुगरींना अटक केली आहे. हि कार्यवाही काल सायंकाळी ५ च्या सुमारास करण्यात आली आहे.

अविनाश ओंकार घुमनर, देवानंद दत्ता दाडे, बंडू साहेबराव लोखंडे, व्ही. चव्हाण, राहुल नंदकुमार वानखेडे, भिकाजी राघोजी पटमोरे अशी जुगारी आरोपितांची नावे आहेत. महागाव पोलीस स्टेशन हद्दीतील धारेगाव शिवारात अवैध पणे एका बादशाह फिरता जुगार सुरु असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली त्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि महागाव पोलिसांनी संयुक्तपणे जुगारावर धाड टाकली. त्यातील काही जुगारींनी पोलिसांच्या हातावर तुरी देत पळ काढला. तर ६ जुगारींना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली. त्यावेळी घटनास्थळावरून जुगारींकडून २६ हजार रोख तीन दुचाक्या आणि काही मोबाइल असा एकूण २ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखा आणि महागाव पोलिसांनी जप्त केला. हि कार्यवाही महागाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे, स्थागुशाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, मुन्ना आडे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पांडगळे, राजेश जाधव यांनी केली आहे.

# शिक्षकाच्या मागणीसाठी कोपरा शाळेला ठोकले कुलूप, हनुमान मंदीरात भरविली शाळा

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव : तालुक्यातील कोपरा पुनर्वसन क्रमांक १ मध्ये शिक्षकाच्या मागणीकरिता बुधवारी सरपंच आणि शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेला कुलूप ठोकले. यामुळे शिक्षण विभागाच्या कार्यप्रणालीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कोपरा पुनर्वसन क्रमांक १ हे बेंबळा धरणग्रस्तांना पुनर्वसन केलेले गाव जेथे सरकार या लोकांना मदत करण्या करिता विविध कार्यक्रम राबवत असून येथे मात्र जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक मराठी शाळेत शिक्षक उपलब्ध नसून गेल्या दोन-तीन वर्षांपासून शिक्षक मिळावा, अशी मागणी ग्रामपंचायत आणि पालकांकडून केली जात आहे.

या ठिकाणी एक शिक्षिका कार्यरत होती. मात्र, ती गेल्या काही महिन्यांपासून प्रदीर्घ आजारी रजेवर आहे. त्यांच्या जागेवर इतर शिक्षकांची नियुक्तीच झाली नाही.

यामुळे शिक्षक मिळावा, अशी मागणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती.

एक वर्षांपासून मागणी केल्यानंतरही शिक्षक मिळाला नाही. यामुळे बुधवारी सरपंच अर्चना रंगारी यांनी शाळेच्या प्रवेशद्वाराला कुलूप ठोकले. शाळेला शिक्षक मिळावा, अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

# ग्रामपंचायत काकडदातीमध्ये १ लाख ८० हजार रुपयाची अफरातफर बाबत संतोष पारध यांचे उपोषण सुरू

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - जवळच असलेले ग्रामपंचायत काकडदाती ग्रामपंचायतमध्ये सन 2017 ते 2020 या कालावधीत झालेल्या अपहार प्रकरणी चौकशी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कोष्टवार यांनी केली असता 1 लाख 80 हजार 704 रुपयाचा गैर व्यवहार उघडकीस येऊन सुद्धा तत्कालीन संबंधित ग्राम सचिव मस्के यांच्यावर आज दिनांक 30 जून 2025 पर्यंत कुठलीही कारवाई झाली नसल्यामुळे अखेर व्यतीत होऊन समाजसेवक व माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष बुगाजी पारध हे 30 जून 2025 पासून काकडदाती ग्रामपंचायत कार्यालय समोर कार्यालयीन वेळेत 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत बेमुदत उपोषणाला बसत असल्याचे एका लेखी पत्रकाद्वारे त्यांनी कळवले आहे.

यबाबत प्राप्त माहिती अशी की ग्रामपंचायत काकडदाती येथील तत्कालीन ग्राम सचिव मस्के यांच्या कार्यकाळात म्हणजेच सन 2017 ते 2020 या काळात विविध ग्रामपंचायतच्या तथाकथित कामांना दाखवून ज्या मजुरांनी कामगारांनी काम न करता या कामांना लागणारे सामान न घेता मनमानी पद्धतीने नागरिकांचे व सामान घेतलेल्या दुकानाशी कुठलेच व्यवहार न करता परस्पर स्व मनाने या बाबीच्या सर्व नोंदी ग्रामपंचायत नमुना क्रमांक 5 (कॅशबुक नक्कल) मध्ये नोंदी करून ग्रामपंचायतचा निधी खर्च केल्याचे प्रताप दाखविला यावर विस्तार अधिकारी तत्कालीन कोष्टवार यांनी दिनांक 22/9/ 2021 ला या संपूर्ण प्रकरणाचे चौकशी करून यात असा अभिप्राय दिला की 1 लाख 80. 704 रुपयाचा खर्च केल्याचे निष्पन्न केले व ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 57 (2) व ग्रामनिधी अभिरक्षा व गुंतवणूक नियम 1959 नियम 02 प्रमाणे पंचायतीला प्राप्त झालेल्या सर्व रक्कम कोणत्याही परिस्थितीत 07 दिवसापेक्षा अधिक नाही अशा मुदतीत संबंधित सचिवाने प्रथम बचत खात्यात जमा करणे आवश्यक आहे असे असतांना ही वसुलीच्या रक्मा बँकेत जमा न करता परस्पर खर्च केल्याचे निदर्शनास येते वरिल बाबतीत अनिमित्तता झाल्याचे दिसून येते हा चौकशी अहवाल दिला जेव्हा की ग्रामपंचायत अधिनियम 1958 नुसार हा प्रकार अपहारात मोडत असताना आपल्या कर्मचाऱ्याला वाचविण्याच्या उद्देशाने 1.80.704 रुपयांचा अपहार करून सुद्धा या बाबीला अनियमितताच्या श्रेणीमध्ये वळवण्याचा प्रकार विस्तार अधिकारी यांनी केला या अपहार प्रकरणाचा 4 वर्षापासून वरिष्ठ अधिकाऱ्याकडे मागेवा घेऊन सुद्धा ज्यात सबळ पुरावे असताना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यवतमाळ यांना पत्रव्यवहार व समक्ष भेटी देऊन सुद्धा या भ्रष्टाचारावर म्हणजेच अपहाराबाबत कारवाई न झाल्यामुळे नाईलाजास्तव 30 जून 2025 पासून संतोष पारध हे ग्रामपंचायत काकडदाती समोर 11 ते 5 या कार्यालयीन वेळेत बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा आरटीआय कार्यकर्ते संतोष बुगाजी पारध हे भ्रष्टाचाराबाबत गेल्या चार दिवसापासून उपोषणाला बसले आहे परंतु अद्याप पर्यंत प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही.

# तेरवी न करता वृद्धाश्रम आणि गौरक्षण येथे दान

## रत्नपारखी परिवाराचा स्तुत्य उपक्रम



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - दिग्रस येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक केतन रत्नपारखी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांची तेरवी दि. 28 जून रोजी होती. ही तेरवी न करता तेरवीच्या खर्चात गौरक्षण आणि वृद्धाश्रमात केतनच्या नावाने दान देऊन रत्नपारखी परिवाराने स्तुत्य उपक्रम राबविला.

नेहमी गोरगरीब, दुखी- कष्टी, रुग्ण, वृद्ध व रंजल्या गांजल्याच्या सेवेत तत्पर असलेले माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते स्व. केतन रत्नपारखी यांचा वारसा पुढे चालवत त्यांच्या परिवाराने त्यांच्या तेरवीचा नेम टाळून दोला महाराज वृद्धाश्रम, उमरी पठार येथील वृद्धाश्रमात वृद्धांना अन्नदान केले. गौसेवक म्हणूनही स्व. केतन रत्नपारखी यांची ख्याती होती. त्यांची गो सेवा पुढे चालावी यासाठी गौरक्षण येथे सुद्धा गोमातेला ढेप, चारा दान केले. यावेळी केतनच्या परिवारातील सर्व सदस्य तसेच आप्तेष्ट मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गावी जा...बसमधून सीडबॉल फेकत!

## वृक्षारोपणासाठी कृषीदूतांचा प्रवाशांना संदेश; १० हजार सीडबॉलची निर्मिती करून पुढाकार, स्व.आर.जी.देशमुख कृषी महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



**तिवसा/वार्ताहर**
पर्यावरणाला जपण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन अतिशय महत्वाचे असून ही बाब लक्षात घेता येणाऱ्या काळात वृक्षारोपण व्हावे,याकरिता तिवसा येथील स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालयाच्या सातव्या सत्राच्या कृषी दुतांनी तब्बल १० हजार सीडबॉलची निर्मिती करून वृक्षारोपणाला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.हे सीड बॉल बनवून बस ने प्रवास करणाऱ्या लोकांना 'गावी जा..पण बस मधून सिडबॉल फेकून जा,' असा संदेश कृषी दूतांनी देऊन नागरिकांच्या हस्ते ठिकठिकाणी फेकून वृक्षारोपणाचा एक सुंदर उपक्रम कृषीदूतांनी तिवसा तालुक्यात राबवला. या उपक्रमामध्ये तिवसा तालुक्यातील विविध गावातील नागरिकांचा मोठा संख्येने सहभाग होता.या उपक्रमा मध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जवळपास १०००० सीड बॉलची निर्मिती केली. या सीड बॉल च्या निर्मिती करीता माती, शेण, कंपोस्ट आणि उपरोक्त वृक्ष प्रजाती (जसे, कडूनिंब, चिंच, जांभूळ) इत्यादींचा उपयोग करून सीड बॉलची निर्मिती करण्यात आली. हे सीड बॉल विद्यार्थ्यांनी विविध स्थळ जसे बसस्टॉप जेथून नागरिक प्रवास करतांना अशा नागरिकांना पाच पाच सीड बॉल देऊन त्यांना सीड बॉल फेकून वृक्षारोपण कसा प्रकारे होऊ शकते,याबद्दलचे महत्त्व स्पष्ट केले. अशाप्रकारे गावातील नागरिक ही या उपक्रमामध्ये सहभागी झाले. या उपक्रमामुळे किमान ५०ऽ जरी बिया जमिनीत रुजल्या तरीही या विद्यार्थ्यांनी राबवलेला उपक्रम निसर्गासाठी वरदान ठरणार आहे,हे मात्र निश्चित! सदर उपक्रम महाविद्यालयातील प्राचार्य अरुण डहाके तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. सावंत राठी सहायक प्रा. मनोज लुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी वैष्णवी बेहरे, प्राची नांदेकर, पूर्वा ठवकर, समीर जीभकाटे, तुषार रेवतकर यांनी परिश्रम घेतले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३६ वा वर्धापन दिन

**अमरावती/का.प्र.**
स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मुक्त विद्यापीठ केंद्रातर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३६ वा वर्धापन दिन केंद्राचे समन्वयक डॉ.नितीन चांगोले यांच्या अध्यक्षतेत आणि ज्येष्ठ पत्रकार आणि पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ.कुमार बोबडे यांच्या हस्ते साजरा करण्यात आला.



श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय हे मुक्त विद्यापीठाची स्वतंत्र इमारत असणारे एकमेव महाविद्यालय असून या इमारतीत आयोजित या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ.सुभाष गावंडे, डॉ.उमेश कडू, डॉ.किशोर साबळे, डॉ.राजेश मिरगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वर्धापन दिन सोहळयात महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, शिक्षणमहर्षी डॉ. डॉ.पंजाबराव देशमुख आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांना आदरांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाला मुक्त विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे सदस्य विवेक जाधव, डॉ.सुलभा जवंजाळ, डॉ.स्वाती चौधरी, डॉ.कुंदन भुयार, अभियंता चंद्रशेखर मिरगे, डॉ.नकुल धरमकर, प्रा.येवतीकर, प्रा.प्रतिक करंडे, प्रा.लड्ढा, प्रा.मावंदे, प्रा.संजय मुसळंदे, प्रा.अजिंक्य देशमुख, प्रा.रुपेश फसाटे, राधेश्याम पिंजरकर, मयूर कपूर आदी उपस्थित होते.

## युवा संवाद दौरा



**अमरावती**-राज्यभरातील युवा कार्यक्रमाबाबत ध्येय, उद्दिष्ट व कार्यक्रम अंबलबजावणी करण्याकरिता राज्याच्या युवा धोरणाची निर्मिती करण्यात येते महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्याच्या नवीन युवा धोरणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्यात युवा धोरण, २०१२ च्या आधारे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी एक नवीन समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये अमरावतीचे सुपुत्र तथा भारत सरकार क्रीडा व युवक कल्याण विभागाचे राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा अंतराष्ट्रीय सार्क संघटनेचे युवा दूत डॉ. मनीष शंकरराव गवई यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून ते आगामी ७ जुलै पासून युवा संवाद दौरा करणार असून या दौऱ्या दरम्यान ते राज्यातील युवकांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी युवकांशी संवाद साधणार आहेत.

## दर्यापूर तालुक्यात न्यूमॅटीक प्लॅन्टरने कपाशीच्या पेरणीला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**
कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपुर तर्फे राबविण्यात येत असलेल्या कापूस सघन लागवड प्रकल्पाअंतर्गत दर्यापूर तालुक्यात कपाशीच्या उत्पादनावर नियोजनपूर्वक लागवडी संदर्भात शेतकऱ्यांना विविध कार्यशाळांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आल्याने तेथील शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड न्यूमॅटीक प्लॅन्टरने पेरणीला प्रारंभ केला आहे. हे आधुनिक तंत्रज्ञान असून प्लॅन्टरने लागवड केल्यास दोन रोपातील १५ से.मी. हे अंतर आणि दोन ओळीतील अंतर ९० से.मी. तंतोतंत पाळल्या जाते. प्लॅन्टरने बियाणाची नासाडी टाळल्या जात असून शेतकऱ्याचा बियाणावरील खर्चात बचत होते. त्याबरोबरच या यंत्राने पेरणी केल्यास पेरणी लवकर होत असल्याने यंत्राने मजुरावरील खर्च कमी होवूनही शेतकऱ्याची मोठी बचत होते असे प्रतिपादन केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे वरिष्ठ कीटक शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे पीक उत्पादक विभागप्रमुख डॉ. अर्जुन तायडे यांनी केले.तसेच या यंत्राचा वापर करून शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड करावी असे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के.पी. सिंह व सघन लागवड प्रकल्पाचे संयोजक डॉ. हर्षद ठाकुर यांनी केले आहे.प्रकल्पाला राबविण्याकरिता प्रकल्पाच्या डॉ. विशाखा पोहरे, राहुल जगताप, उमेश तायडे, विशाल राऊत, महेंद्र सेंगर, ऋषिकेश शिंदे, अश्विनी रंगे, निशा राठोड व विशाखा रानोटकर यांचे योगदान लाभत आहे.

## विजेच्या झटक्याने दोन मेंढ्या ठार; पाच जखमी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
येथील ज्ञानेश्वर यमगर यांच्या मालकीच्या दहा मेंढ्या घेऊन त्याचा गडी चराई करीता गावाजवळच स्मशानभूमी मधून जात असताना पाऊस पडत होता. त्यातच मोठा गडगडाट झाल्याने
वीज कोसळून पडली. यामध्ये ज्ञानेश्वर यमगर यांच्या दोन मेंढ्या दगावल्या असुन पाच जखमी झाल्या आहेत. यामध्ये यमगर यांचे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले.

याबाबत ज्ञानेश्वर यमगर यांनी तलाठ्याकडे धाव घेतली तलाठ्यांनी घटनास्थळी येऊन



मृत व जखमी मेंढ्याचा पंचनामा केला. जखमी मेंढ्यामध्ये पुन्हा तिन मेंढ्या वाचणार की नाही याचा पण भरवसा नाही. ही घटना दि.२ जुलै सायंकाळी साडेचार च्या सुमारास घडली तरी शासनाने संबंधित शेतकऱ्यांला नुकसान भरपाई द्यावी.

## दाजीसाहेबांच्या कार्याला पुढे नेण्यासाठी सहकार्य करा-डॉ.देशमुख

**अमरावती/का.प्र.**
दाजी साहेबांच्या विचारांचा व कार्याचा वसा समर्पित भावनेने जोपासणारे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या कार्यकाळामध्ये तपोवन संस्था वेगाने समाजाभिमुख झाली आहे. समाजाला आणि प्रत्येकाला प्रेरणा देणाऱ्या या संस्थेचा ७७ वा वर्धापन दिन म्हणजे मानवतावादाच्या निर्मितीचा प्रवास आहे. त्या कार्याला पुढे नेण्यासाठी समाजाने सहकार्य करण्याची गरज असल्याचे आवाहन माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केले

ते विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनच्या ७७ व्या वर्धापन दिनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदर्शन गांग डॉ. गोविंद कासट उपस्थित होते. त्यांच्या सेवेत विचारपिठावर नियमक समितीचे सदस्य विवेक मराठे अश्विन आळशी भिमराव ठवरे विद्याताई देसाई सचिव सहदेव गोळे उपसचिव ऋषिकेश देशपांडे उपाध्यक्ष योगेश करडे इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व पाहुण्यांनी शांतीकुंज या दाजी साहेबांच्या कुटीमध्ये त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहिली. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत सत्कार करण्यात आले. ज्यामध्ये डॉ. सुनील देशमुख यांना शाल स्मृतिचिन्ह पुष्पगुच्छ देऊन प्राचार्य डॉ. सुभाष गवई, विवेक मराठे, अश्विन आळशी यांनी सत्कार केला. सुदर्शन गांग



यांचा सत्कार विवेक मराठे ऋषिकेश देशपांडे यांनी केला तर डॉ. गोविंद कासट यांचा सत्कार अश्विन आळशी योगेश करडे यांनी केला. याप्रसंगी गिरजा व्यवहारे, शांताबाई वनारे, भीमराव उत्तरे, संतोष गुल्हाने, उत्तम पांढरे, सुधाकर भोयर यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल स्मृतचिन्ह पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तपोवन संस्थेतर्फे संचालित महामना मार्ग विद्यालयाच्या दहाव्या वर्गाचा शंभर टक्के निकाल लागल्याबद्दल त्यांच्यात गुणवत्ता यादीत आलेल्या सहा विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आदिवासी मुलांच्या शैक्षणिक संगोपन केंद्रातील विद्यार्थी सागर करोते,लोचन मावस्कर, प्रथमेश जामूनकर, कल्याणी नायकोजी, यश तेलगोटे, विधि वंजारी यांचा स्मृतिचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक उपसचिव ऋषिकेश देशपांडे संचालन माधुरी शास्त्री यांनी तर आभार मुख्याध्यापिका सदाशिवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंतर्गत व्यवस्थापक निवृत्ती वेलकर, भास्कर शेटे, पांढरे, संतोष, पियुष, सागर, देविदास सपकाळ, विजय इंगळे, गणेश टेकाम आदींनी परिश्रम घेतले.

## खाजगी रुग्णालयातही मिळणार शासकीय योजनांचा लाभ

**अमरावती**-शहरातील सर्व खाजगी रुग्णालयांसाठी आता प्रत्येक इच्छुक पात्र मल्टि स्पेशिअलिटी/ सुपर स्पेशिअलिटी/ सिंगल स्पेशिअलिटी (बालरोग, नेत्ररोग रुग्णालय, ऑर्थोपेडिक्स, ओंकोलॉजी, बर्न, नेफ्रोलॉजि रुग्णालय, ईएनटी, बालरोग शस्त्रक्रिया) रुग्णालयांना आता एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनामध्ये अंगीकृत केले जावू शकते. सदर योजनेच्या निकषासाठी WWW.JEEVANDAYEE.GOV.IN या संकेत स्थळावर योजनेची संपूर्ण माहिती दिलेली असून, या संकेत स्थळा मार्फत आपल्या रुग्णालयाचे योजनेत अंगीकरण करण्याकरिता ऑनलाईन फॉर्म भरणे अपेक्षित आहे. अधिक माहितीसाठी आणि मदतीसाठी व जिल्हा शल्यचिकित्सक तथा सदस्य सचिव एमज्योफुजआ योजना व आयु भाप्रमंजआ. योजना, अमरावती व वैद्यकिय आरोग्य अधिकारी महानगरपालिका अमरावती व जिल्हा समन्वयक एमज्योफुजआ योजना व आयु भाप्रमंजआ. योजना, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा. (८२७५०९५८०२) तसेच सद्य स्थितीत जिल्ह्यामध्ये एकूण ३८ पैकी १८ शासकीय व २० खाजगी रुग्णालये अंगीकृत आहेत, जिल्हा व शहर निहाय एकत्रीत जनगणने नुसार आणखी ४२ खाजगी रुग्णालय अंगीकृत करणे अपेक्षित आहेत, तरी जास्तीत जास्त अमरावती शहरातील खाजगी रुग्णालयांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## ग्रामीण रुग्णालयाच्या प्रभारी अधिक्षकांची होणार चौकशी

**अंजनगाव सुजा/वार्ताहर**
जिल्हा उप ग्रामिण रुग्णालय अंजनगाव सुर्जी येथील वैद्यकिय अधिक्षक डॉ. अमोल नालट यांचे सेवावर्ग रद्द करुन त्यांच्या जागी डॉ. अक्षय रेखाते किंवा इतर कोणतेही वैद्यकिय अधिकारी यांच्याकडे अंजनगाव सुर्जी येथील वैद्यकीय अधिक्षकांचे कारभार देण्याबाबतची तक्रार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकाऱ्यांनी केली असता, जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्रभारी वैद्यकिय अधिकारी यांची चौकशी करुन अहवाल सादर करण्यास चौकशी समीती नियुक्त केली



आहे.

जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारी वरुन जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या आदेशानुसार सदर प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी अहवाल सादर करण्यासाठी खालील प्रमाणे चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यानुसार सात दिवसाच्या आत अहवाल सादर करावयाचा आहे त्याकरीता डॉ. मंगेश मेंढे, विशेष कार्य अधिकारी, विसंसेरु. यांची अध्यक्ष तर सदस्य म्हणुन डॉ. संदिप हेडाऊ, निवासी वैद्य.अधी.

> अधीक्षक डॉ.अमोल नालट यांच्या रुग्णालयात भ्रष्टाचार, अनियमितता आणि मनमानी झाल्याची पुराव्यासह तक्रार करण्यात आली आहे. जर कारवाई झाली नाही तर आंदोलन केले जाईल ज्यासाठी संबंधित वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतील.
>
> **विठ्ठल खाडे**
> रा.कॉंग्रेस पक्ष तालुका कार्याध्यक्ष अंजनगाव सुर्जी

डॉ. माने, वैद्य यांचे त्रिसदस्य समीती नियुक्त करण्यात आली. रास्ट्रवादी कॉं पार्टीचे कार्याध्यक्ष विठ्ठल खाडे यांनी केलेल्या तक्रारीत अधीक्षक सरकारी तिजोरीला आपल्या वडिलांची संपत्ती मानून, सरकारशी विश्वासघात करून आणि भ्रष्टाचार पसरवून गरीब रुग्णांना उपचार सुविधांपासून वंचित ठेवत आहे.प्रभारी अधीक्षक अमोल नलाट हे रुग्णांशी असभ्य भाषा वापरत आहेत. त्याच माध्यमातुन त्री सदस्यीय समितीने अंजनगाव सर्जरीला भेट दिली आणि तक्रारीच्या आधारे ग्रामीण रुग्णालयात दिवसभर चौकशी केली आणि तक्रारदार विठ्ठल खाडे, अधीक्षक डॉ. अमोल नालाट आणि रुग्णालयाची चौकशी केली. यावेळी चालक आणि कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवण्यात आले.

> रुग्णालयात तैनात असलेल्या अनेक कर्मचारी, अधीक्षक डॉ. अमोल नालट यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती. ज्याची चौकशी करण्यात आली आहे आणि तक्रारदार डॉ.अमोल नलट, चालक, महिला कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. ज्याचा अहवाल तयार करून कारवाई केली जाईल.
>
> **डॉ. मंगेश मेंढे,**
> शल्यचिकित्सक चौकशी समिती अमरावती

---

## संक्षिप्त



### रॅली काढून अंगणवाडीत शालेय उत्सव साजरा

**शिराळा**-अंगणवाडी केंद्र क्रमांक ५१९ मध्ये शाळेत नविन येणाऱ्या मुलाना आनंद येवो या उद्देशाने रॅली चे आयोजन अंगणवाडी सेविका व नजमुन्नीसा उर्फ नजमा काजी यांनी केले होते. सदस्य कृषी उत्पन्न बाजार समितीत सदस्य मिलिंद तायडे चे स्वागत नजमा काजी यांनी केले. पत्रकार डी आर भाऊ वानखडे यांचे स्वागत मदतनीस उषा शिरसाठ यांनी केले.सर्व मुलांच्या हाती फुगे देवुन रॅली काढण्यात आली. यावेळी पालक बालक मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन वर्षा प्रविण थोटे, हर्षा मोहोड यांनी केल.कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी मदतनीस उषा शिरसाठ यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांचे आभार नजमा काजी ने मानले.यावेळी वाहेद मुल्ला मतीन मुल्ला काशीफ मुल्ला, समीना बानो नजमा बी ई उपस्थित होते.



### जि.प शाळेत कृषी दिन

**तिवसा**-महाराष्ट्र कृषिदिन निमित्ताने डेहणी गावातील जिल्हा परिषद शाळेत एक विशेष जागरूकता व कृषीशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील विद्यार्थ्यांनी केले.कार्यक्रमाचे नेतृत्व महाविद्यालयाचे प्राचार्य लुंगे यांनी केले. प्रमुख सावन राठी यांचे विशेष सहकार्य लाभले. देवांग मेटी, तनय मानमोडे, आचल लिलारवे, पल्लवी मेहतरे आणि अर्पित माकोडे या विद्यार्थ्यांनी माहितीपूर्ण सत्रांचे संचालन केले.प्राचार्य सावन राठी यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या अनुभवातून शिकण्याची संधी देणे हीच खरी शिक्षणाची दिशा असल्याचे सांगितले.



### वाठोडा खुर्द गावात कृषी दिन साजरा

**तिवसा**-वाठोडा (खु) कृषी दिनाच्या निमित्ताने स्व. राजाभाऊ गणेश देशमुख कृषी विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे केले.सरपंच दुर्गा लोंढे,माजी सरपंच रेखा आमले,कृषी सहाय्यक रवी गुडदे ,जिल्हा परिषद शाळेचे प्राचार्य वनिता खोब्रागडे,उपसरपंच तुषार धुमनखडे ,पोखरा प्रकल्प स्वयंसेवक अंकिता निवल तसेच शिक्षक वृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.'शेतकऱ्याचा सन्मान, कृषी दिनाचा मुख्य आधार' हे ब्रीद जपत हा कार्यक्रम अतिशय यशस्वीरीत्या पार पडला.कार्यक्रमाला कॉलेजचे विद्यार्थी सर्वेश सोळंके,सुशील वैद्य,सर्वेश विरुळकर,भूषरा शेख,नयना खडसे,खुशी दरांगे,झैद खान करण परतेकी,मयुरेश अकोलकर उपस्थित होते. कार्यक्रम प्रा.सावन राठी ,प्राचार्य अरुण डहाके,मनोज लुंगे ,गिरीश मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



### २ ट्रक निळे खोके जप्त

**अमरावती**- आयुक्त यांचे आदेशान्वये झोन क्रमांक ३ दस्तूरनगर अंतर्गत चपराशीपुरा, कॅम्प, कॉर्नर सुंदरलाल चौक, वडाली परिसर, सर्किट हाऊस रोड, युनिव्हरर्सिटी रोड या भागाचे अनधिकृत निळे गटई खोके धारकांचे २ ट्रक खोके जप्ती मध्ये घेऊन समाज कल्याण विभाग कार्यालयामध्ये जमा करण्यात आले. सदर कारवाईदरम्यान श्याम चावरे अतिक्रमण पथक प्रमुख, श्री तायडे समाज कल्याण संबंधित अधिकारी, शाहिबाज लिपिक तसेच अतिक्रमण कर्मचारी उपस्थित होते.

# विठ्ठल, वारी आणि वारकरी...

*वारीच्या काळात वारकरी सगळे भेद सोडून, सामाजिक जीवनाला न बघता देवाला परमसत्य समजून त्याच्या भक्तीमध्ये लीन होऊन जातात. त्या देव पांडुरंगाला पुजतात. त्याच्या भक्तीमध्ये गीत, अभंग गातात आणि एकासमोर वाकून नमन करतात. कारण ‘सगळे ब्रह्म आहेत’ असा त्यांच्या विश्वास असतो. ‘एक तरी वारी अनुभवावी’ अशा या वारीचा अनुभव आयुष्यात एकदा तरी घेतला पाहिजे.*

**या** वर्षीची वारी ही अलौकिक योगाची सांगड आहे. कारण इ.स. १२७५ ते इ. स. १२९६ असे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचे २१ वर्षांचे लौकिक आयुष्य आहे. म्हणजे हे वर्ष त्यांचे ७५० वे जन्मोत्सवी वर्ष आहे. संत नामदेव महाराज यांचा इ.स. १२७० ते इ.स.१३५० हा कालावधी असून संत नामदेव महाराज यांनादेखील विठ्ठलाशी एकरूप झाल्याला ६७५ वर्षे पूर्ण होत आहेत आणि इ. स. १६०८ ते इ. स. १६५० असे जगद्गुरू संत तुकारामांचे लौकिक आयुष्य आहे. या वर्षी संत तुकारामांच्या वैकुंठ गमनाला ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे वारकरी संप्रदायाचा पाया ज्यांनी रचला त्यांचे स्मरण करून त्याचप्रमाणे जीवन जगण्याची सुरुवात करण्याचे हे वर्ष आहे.

वारकरी संप्रदायात पाच ‘व’ महत्त्वाचे आहेत. पहिला ‘व’ म्हणजे ‘वाचन’. वाचनामुळे ज्ञानप्राप्ती होते आणि प्रत्येक वारकऱ्याने श्री ज्ञानेश्वरी व हरिपाठाचे नित्य वाचन करणे आवश्यक आहे. दुसरा ’व’ म्हणजे ‘व्रत’. वारकरी संप्रदायात दोन व्रतांना प्राधान्य आहे. एक व्रत म्हणजे तिसरा ‘व’ म्हणजे ’विठ्ठल’, ज्याला विठोबा, पांडुरंग किंवा पंढरीनाथ म्हणूनही ओळखले जाते, हे वारकरी संप्रदायाचे (भागवत धर्माचे) प्रमुख दैवत आहे. चौथा ’व’ म्हणजे ‘वारी’. वारी दोन प्रकारची असते. एक देवाची वारी व दुसरी संतांची वारी. दर महिन्याच्या पहिल्या एकादशीला, शुद्ध एकादशीला पंढरपूरला जाणे आणि देवाचे दर्शन घेणे ही देवाची वारी आणि संतांची वारी म्हणजे दुसऱ्या एकादशीला संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज किंवा कोणत्याही संतांच्या समाधी मंदिरात जाऊन त्यांचे दर्शन घेणे. ही वारी जे करतात त्यांना महिन्याचे वारकरी असे म्हणतात. त्याचबरोबर चैत्र वारी, माघ वारी, कार्तिकी वारी व आषाढी वारी या वर्षातील प्रमुख चार वाऱ्या. यातील महावारी म्हणजे ‘आषाढी वारी’. या वारीची उपासना जो करतो तो वारकरी.

विठ्ठलाला पंढरीनाथ, पांडुरंग, पंढरीराया, विठाई, विठोबा, विठुमाऊली, विठ्ठल गुरुराव, पांडुरंग, हरी इ. नावे भक्तांनी दिलेली आढळतात. आज प्रचलित नाव म्हणजे ‘पांडुरंग’ आणि ‘श्रीविठ्ठल’. बरेच लोक ‘विठ्ठल’ हा शब्द ‘विष्णू’ या शब्दाचा अपभ्रंश आहे असे म्हणतात. कानडी शिलालेखातही जे ‘विठ्ठरस’, ‘विट्ट’ असे शब्द आले आहेत ते ‘विष्णू’ शब्दाची व्याप्ती सांगणारेच आहेत. संत तुकोबारायांनी ‘विठोबा’ शब्दाची उत्पत्ती आपल्या एका अभंगात अत्यंत सोप्या भाषेत केली आहे. ‘वि’ म्हणजे ज्ञान, ‘ठोबा’ म्हणजे आकार – ज्ञानाचा आकार किंवा ज्ञानाची मूर्ती म्हणजे विठोबा किंवा ‘वि’ म्हणजे गरूड आणि ‘ठोबा’ म्हणजे आसन. अर्थात गरुड ज्याचे आसन आहे तो विष्णू. तोच कटीवर कर ठेवूनी विटेवरी उभा आहे. श्रीकृष्ण, श्रीविष्णू आणि श्रीविठोबा हे एकच आहेत.

‘वारी’ म्हणजे देवाला विशिष्ट दिवशी भेटावयास जाणे. वारीची परंपरा कधीपासून सुरू झाली हे सांगता येत नाही, पण संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडील व विठ्ठलपंत कुलकर्णी हेसुद्धा वारकरी होते. ते पंढरीची वारी करीत असत. या वारीचा मूळ पाया हा भक्ती आहे. उपवास, तप, पूजा, आरती हे कर्मकांड करणे म्हणजे भक्ती इतका मर्यादित अर्थ नाही, तर ‘जयांचे माझी नीती दिसे’. संत ज्ञानेश्वर महाराज नीती असल्याशिवाय




भक्ती पूर्ण होत नाही असे म्हणतात, तर ‘भक्ती तों कठीण शूळावरील पोळी। निवडे तो बळी विरळा शूर। जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत। पायाविण भिंत तांतडीची, कामावलें तरि पाका ओज घडे। रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे। तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस जागृतीचा।’ संत तुकाराम महाराज सांगतात, आपल्या प्रत्येक कृतीवर, विचारावर विवेकाचा अंकुश पाहिजे. वैयक्तिक जीवन जगताना समाजाबरोबर आपण निसर्गाचा घटक आहोत याचे भान असणे खरे भक्तिमय जीवन आहे. अगदी साधं उदाहरण म्हणजे जी व्यक्ती दैनंदिन आयुष्यात पाणी व अन्न जपून वापरते, वाया घालवत नाही ही एक प्रकारची भक्ती आहे. काहीही केले आणि परमेश्वराचे नाव घेतले की, भक्ती झाली आणि परमेश्वरावर आपली जबाबदारी दिली म्हणजे आपला उद्धार होतो हे खरे नाही.

स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील एक प्रसंग आहे ज्या वेळी स्वामीजींना पैसा, नोकरी हवी होती त्या वेळी त्यांना रामकृष्ण परमहंस यांना आपली अडचण सांगितली. रामकृष्ण परमहंस तेव्हा स्वामीजींना म्हणाले की, तुला जे हवे आहे ते तू कालीमातेकडे माग. तुला ते मिळेल. यावर स्वामीजी ज्या वेळी देवीला भेटून परत आले तेव्हा रामकृष्णांनी विचारले, ‘‘काय काय मागितले?’’ त्यावर विवेकानंद म्हणाले, ‘‘ज्या वेळी मी देवीकडे पाहिले तेव्हा माझ्या मनामध्ये या शूद्र इच्छा शिल्लकच राहिल्या नाहीत.’’ इतका त्याग करण्याची ज्याची तयारी आहे त्याला भक्ती म्हणतात. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत चोखामेळा महाराज, संत सावता महाराज, संत एकनाथ महाराज यांसारख्या अनेक संतांनी परमेश्वराची खरी भक्ती केली आहे. वारीची जशी सगळ्यांना ओढ लागलेली असते तशी भगवंतांनासुद्धा या वारीची ओढ लागलेली असते. श्रीमदभगवद्गीता ही श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली, पण ज्ञानेश्वरांनी ‘ज्ञानेश्वरी’ ही जनसामान्यांच्या उद्धारासाठी सांगितलेली आहे. देवांचा जन्म हा व्यक्ती उद्धारासाठी होतो, तर संतांचा जन्म हा जनसामान्यांच्या उद्धारासाठी होतो. म्हणून देवांनासुद्धा संतांच्या सहवासाची व भेटीची ओढ लागलेली असते याची अनेक उदाहरणे आणि दाखले आपल्याला संत चरित्रामध्ये पाहावयास मिळतात. जशी ‘ज्ञानेश्वरी’ जितक्या वेळा वाचू, तितक्या वेळा वेगवेगळ्या प्रकारे भावते, अर्थ लागतो तशीच पंढरीची वारीसुद्धा अनुभवते.

वारीची सुरुवात ज्या दिवशी होते त्या दिवसाला ‘प्रस्थान’ हा शब्द आहे. ‘प्रस्थान’ या शब्दाचा अर्थ निघणे किंवा सुरुवात करणे असा आहे, तर दुसरा अर्थ, ज्या ठिकाणी प्रकर्षाने स्थिर राहिले जाते, त्याला प्रस्थान असे म्हणतात. वारी शिस्त, नम्रता, संयम, भक्ती आणि सेवा या मूल्यांचे संवर्धन करते. वारी हा एक आध्यात्मिक अनुभव आहे. वारीतील शिकवण म्हणजे ईश्वर सर्वत्र आहे, प्रत्येक जीवात परमेश्वर आहे, वारी म्हणजे संत संगतीची अनुभूती. वारीचे फळ म्हणजे मन स्थिर होते, अहंकाराचा नाश होतो, जन्मोजन्मीचा फेरा चुकतो अर्थात मोक्षाची प्राप्ती होते. ही वारी करणारा म्हणजे वारकरी (माऊली).

‘वारकरी’ शब्दात ‘वारी’ म्हणजे यात्रा आणि ‘करी’ म्हणजे कार्य करणारी व्यक्ती, म्हणजे यात्रा करत जाणारे भाविक. वारकरी हा एक प्रकारचा संप्रदाय आहे. या संप्रदायाचा आद्य प्रवर्तक भक्त पुंडलिक समजला जातो. वारीसह संतांची पादुका घेऊन जाण्याची परंपरा संत तुकाराम महाराजांचे सर्वात लहान अपत्य नारायण महाराजांनी १६८५ मध्ये सुरू केली होती. वारकरी गळ्यात तुळशीमाळ घालतात आणि त्याच्याने सतत जप करत असतात. कारण ती माळ त्यांना देव पांडुरंगाचे विस्मरण होऊ देत नाही आणि तुळशीमाळ घातली नाही तर वारी पूर्ण होत नाही असे मानले जाते. वारीच्या काळात वारकरी सगळे भेद सोडून, सामाजिक जीवनाला न बघता देवाला परमसत्य समजून त्याच्या भक्तीमध्ये लीन होऊन जातात. त्या देव पांडुरंगाला पुजतात. त्याच्या भक्तीमध्ये गीत, अभंग गातात आणि एकासमोर वाकून नमन करतात. कारण ‘सगळे ब्रह्म आहेत’ असा त्यांच्या विश्वास असतो. ‘एक तरी वारी अनुभवावी’ अशा या वारीचा अनुभव आयुष्यात एकदा तरी घेतला पाहिजे.

**● डॉ.सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ**



## उपवास आणि परिणाम

**धा**र्मिक किंवा तंदुरुस्तीच्या कारणांसाठी वेगवेगळ्या प्रकारे उपवास केले जातात. केवळ पाणी पिऊन उपवास करण्याचा; तसेच ‘इंटरमिटंट फास्टिंग’चा प्रकार सोशल मीडियावर सध्या लोकप्रिय आहे. या पद्धतीत अनेक नकारात्मक परिणाम होऊ शकतात; त्यामुळे केवळ वैद्यकीय देखरेखीखालीच असे उपवास करावे, असे शास्त्रज्ञांनी अधोरेखित केले आहे.

‘मोलेक्युलर मेटाबॉलिझम’ या विज्ञानपत्रिकेत उपवासाबद्दलचे काही शास्त्रीय निकष मांडले आहेत. या शास्त्रज्ञांनी १० दिवसांच्या कालावधीसाठी केवळ पाणी पिऊन उपवास करणाऱ्या २० जणांच्या गटाचा अभ्यास केला. त्यांचे वजन सरासरी ७.७ टक्क्यांनी उतरले. मात्र, त्यांना डोकेदुखी, निद्रानाश, रक्तदाबाचे उतरते प्रमाण असे साइड इफेक्ट जाणवले. उपवासामुळे शरीरांतर्गत दाह, तणाव निर्माण झाला, हृदय व अभिसरणासंबंधी गुंतागुंतीची अवस्था निर्माण झाली. आधीच हे त्रास असलेल्यांबाबत त्रासाची शक्यता वाढली. सिडनी विद्यापीठातील शास्त्रज्ञ लुइगी फॉन्टाना यांच्या मते उपवासाने दाह कमी झाला पाहिजे. इथे उलटच घडले; कारण दीर्घकालीन उपवासामुळे रक्तातील काही प्रथिने संख्यात्मक दृष्टीने वाढतात. यांना ‘प्रो-इंफ्लमेटरी’ - म्हणजे दाह निर्माण करणारी प्रथिने असे म्हणतात. यांच्यामुळे हृदरोग आणि अभिसरणविषयक समस्या असणाऱ्या व्यक्तींच्या जीवाला धोका उत्पन्न होतो. केवळ पाणी पिऊन केलेल्या उपवासामुळे रक्तद्रवातील इतर प्रथिनांवर परिणाम होतो. उपवास करणाऱ्या व्यक्तींच्या रक्तात, सी-रिक्टिव्ह प्रथिन (सीआरपी), इंटरल्युकीन-८ (आयएल-८) ही प्रथिने खूप मोठ्या प्रमाणात वाढली. यामुळे स्नायू आणि अस्थिनाश करणाऱ्या प्रथिनांवर विपरित परिणाम झाला; शिवाय ‘अमिलॉइड बीटा’ प्रथिनही वाढीस लागले. या प्रथिनाचा स्मृतिभ्रंशाशी (अल्झायमर) थेट संबंध आहे. उपाशी राहण्याच्या स्थितीला अनुकूलन म्हणून शरीरांतर्गत दाह होत असावा; पण या व्यक्तींना पुन्हा अन्न दिल्यानंतरही हृदयाशी संबंधित असणारे चयापचय सुधारले नाही. वजन कमी करण्यासाठी केवळ अन्नसेवन, ऊर्जाभरण बंद करणे हा उपाय नाही. त्यासाठी आपली तब्येत, जनुके, जीवनशैली आणि सवयीही लक्षात घेणे गरजेचे आहे.

**● डॉ.नंदिनी विनय देशमुख**

## मोबाईल ॲपद्वारे ई-मतदान

**लो**कशाहीमध्ये मतदानाला खूप महत्त्व आहे.अनेकवेळा मतदारांना विशेषतः वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला, तेथील स्थलांतरित मतदार अशा व्यक्तींना इच्छा असूनही प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावत येत नाही. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरते. त्यावर उपाय म्हणून मतदान केंद्रावर जाऊन मतदान करू न शकणाऱ्या मतदारांसाठी देशात प्रथमच ई-व्होटिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आणि हा मान बिहार राज्याने मिळवला आहे. बिहारच्या पाटणा, नालंदा, बक्सर, रोहतास, पूर्व चंपारण या जिल्ह्यांमधील नुकत्याच पार पडलेल्या नगरपंचायतींच्या निवडणुकीत प्रायोगिक तत्वावर मोबाईल द्वारे ई-व्होटिंग पद्धतीने मतदान करण्यात आले आणि अंदाजे ५० हजार मतदारांनी या सुविधेचा लाभ घेतल्याचे सांगण्यात आले.ही नवीन ई-वोटिंग प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान, चेहरा ओळख प्रणाली आणि डिजिटल सुरक्षा यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांवर आधारित असल्यामुळे मतदान प्रक्रिया अत्यंत सुरक्षित आणि पारदर्शक मानली जाते.

**● प्रदीप मोरे**

# वारीची वाट : एक भावविश्व जागवणारा अनुभव

**पा**वसाळ्याच्या सरींत भिजलेलं एक पहाटचं क्षण. कानावर टाळमृदंगाचा गजर, ओठांवर ‘माऊली माऊली’, आणि मनात एकच ओढ विठोबाच्या पायी पोहोचण्याची. आज वारीची सुरुवात. घराच्या उंबरठ्यापलीकडचं जग सोडून, आत्म्याच्या आत खोल शिरणारी यात्रा चालू होणार आहे. चंद्रप्रकाशात टपोऱ्या डोळ्यांनी पांडुरंगाच्या दर्शनाचे स्वप्न पाहणारे हजारो पाय चालायला निघालेत पंढरीच्या वाटेवर, पण खरं तर स्वतःच्या अंतःकरणाच्या दिशेने.

आकाशात अजून काळोखच आहे, पण एका चैतन्याचा प्रकाश मनात पाझरतोय. पंढरपूरची वाट धरायची आस आहे. विठोबाच्या दर्शनासाठी हजारो वारकरी आपली झोळी, टाळ, मृदुंग घेऊन तयार झालेत. पावसाळ्याच्या सरींत भिजलेलं आल्हाददायक पहाटेचं क्षण आणि कानावर येणारा टाळमृदंगाचा गजर. सारं वातावरण भारावून टाकणारे.

वारी म्हणजे केवळ चालणेच नव्हे तर वारी म्हणजे संपूर्ण जीवनसंस्कार. वारी म्हणजे चालत चालत पांडुरंगाच्या भेटीच्या आशाने केलेली अंतःकरणाची तपश्चर्या. मातीच्या सुगंधात, आणि ’ज्ञानोबा माऊली तुकाराम’ च्या गजरांत एक अनामिक शक्ती ओसंडून वाहते. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान, त्यांच्या भजनातली एकाग्रता आणि त्यांच्या साधेपणातली शुद्धता हे सगळं पाहून अंगावर रोमांच उभं राहतात.

अनेक वृद्ध आजी



आजोबांच्या पावलांना बघा. वयाची मर्यादा नाही, पाठीवर झोळी, हातात टाळ, डोळ्यात भक्तिभाव. ते म्हणतात, ’ विठ्ठलाची वारी म्हणजे माझं औषध आहे. तो असतो ना आपल्या सोबत मग थकवा जाणवतच नाही.’ हे वाक्य कानात घोळत राहतं. खरंच, पंढरपूरची वारी ही एक चालत-बोलत विद्यापीठचं आहे. श्रद्धा, संयम, शिस्त, सामाजिक समता आणि सामूहिक शक्ती यांचं मुतीमंत उदाहरण.

पंढरपूरच्या वाटेवर गावा-गावातून आलेले दिंडीचे ओघ. प्रत्येक दिंडीत वेगळी रंगत, वेगळी शैली. कुठे फुगडी, कुठे संत गजर, कुठे पावसात चिंब भिजलेली झोकदार लेझीम. पण सगळ्यांमध्ये एकच भावना ’माझा विठोबा, माझी वारी’.

वारीचा प्रत्येक टप्पा म्हणजे नव्या अनुभवाचे गाठोडे उलगडण्यासारखं आहे वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी गावकऱ्यांची ओढ, एखादी गोष्ट कीर्तनातून सांगणारा पांडुरंग भक्त, आणि मग होणारा श्रवणीय गजर म्हणजे ’राम कृष्ण हरी.’ अशावेळी झोप यावी की ध्यान लागावं, हेच कळेनासं होतं.

पावसाळ्याच्या वाऱ्यांत, उघड्यावर झोपणं, कधी चिखलातून चालणं, कधी उपाशी रात्रष्ठ पण त्यावर कुरकुर नाही. कारण वारकरी मनातून श्री पांडुरंगाला हृदयाच्या कप्प्यात ठेवून चाललेला असतो. त्याचं असतं एकच ध्येय आणि ते ध्येय स्पष्ट असतं, आणि ते म्हणजे पंढरपूर!

सातत्याने चालत आलेल्या त्या पावलांना आता थांबावसं वाटतं नाही, उलट वाटतं, ही तर सुरुवात आहे एक नव्या जगण्याची. वारी म्हणजे सामूहिक साधना आहे. ज्यात गरीब-श्रीमंत, शेतकरी-वकील, बाई-पुरुष, आजी-आजोबा, चिमुकले सगळे एक समान असतात. वारी मनातला अहंकार झुगारते, वारी देहभान विसरवते आणि निखळ भावनेने पांडुरंगापर्यंत घेऊन जाते. वारी म्हणजे फक्त पांडुरंगापर्यंत पोहोचणं नाही तर वारी म्हणजे स्वतःकडून स्वतःपर्यंत पोहोचणं असतं.

**● श्रीपाद टेंबे**
**मोबाईल ९१५८०८८०४२**


# ....गोष्ट एका जागतिक कीर्तीच्या ध्येयवेड्या गुरुजींची

**ही** गोष्ट आहे कधीकाळी गलिच्छ राजकारणाचा बळी ठरलेल्या व वाळवंट म्हणून ज्या जिल्हा परिषद शाळेकडे पाहिल जाते तिथे नंदनवन फुलविणाऱ्या श्री. दत्तात्रय वारे या जागतिक कीर्तीच्या ध्येयवेड्या गुरुजींची. अशा या महान व्यक्तिमत्त्वाचा माझा परिचय व त्यांच्या समवेत कार्य करण्याची संधी मला माजी शिक्षण राज्यमंत्री आ. बच्चू कडू यांचा मुळे आली. चेह-यावरती प्रचंड आशावाद, मात्र गलिच्छ राजकारणा मुळे पदरी पडलेली निराशा. अशा ही परिस्थितीमध्ये आपल्या मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे याकरिता जिवाची पराकाष्ठा करणारे, अतिशय सामान्य आणि सालस व्यक्तिमत्व.एका बाजूला जिल्हा परिषद शाळा म्हटल की, पडक्या भिंती बोटावर मोजता येतील इतकी पटसंख्या मात्र या सर्व बाबीला अपवाद ठरतात ते वारे गुरुजी. या माणसाने आपल्या कल्पतेने जिल्हा परिषद वाबळेवाडी व जालिंदरनगर या शाळेचा खासगी शाळेला सुद्धा लाजवेल असा कायापालट केला आहे.

एका बाजूला पाल्यांना खासगी शाळेमध्ये प्रवेश मिळावा म्हणून पालक वर्गा मध्ये स्पर्धा लागलेली असते.मात्र वाबळेवाडी मध्ये ४००० हजार विद्यार्थी प्रतीक्षा यादी मध्ये असतात. येथील शिक्षक आणि विद्यार्थी संपूर्ण अभ्यासक्रम तीस टक्के वेळेमध्ये पूर्ण करतात. उरलेल्या वेळेमध्ये आपल्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांना विकसित करण्या मध्ये घालवितात. आपले विद्यार्थी हे जागतिक स्तरावरिल स्पर्धे मध्ये यशस्वी व्हावे याकरिता जागतिक स्तरावरील जे काही मानांकन आहे याचे तंतोतंत पालन वारे गुरुजी हे शाळमध्ये करतात. म्हणून आज वारे गुरुजी यांच्या दोन्ही शाळेची गणना ही जागतिक स्तरावरील शाळे मध्ये केली जाते. येथील विद्यार्थी जागतिक स्तरावरील इंग्रजी, जापनीज सारख्या व विविध देशी भाषा बोलतात इतकच काय तर एकदा या परिसरातील स्थानिक कंपनी मध्ये जापनीज प्रतिनिधीमंडळ आले असता प्रतिनिधी समवेत जापनीज भाषेमध्ये बोलण्याची अडचण निर्माण झाली तेव्हा या विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी जापनीज भाषे मध्ये संवाद साधला.



आज राज्यातील जिल्हा परिषद शाळेचे भयाण चित्र आपल्याला दिसत त्यामध्ये स्थानिक जनतेचे शाळेकडे झालेले दुर्लक्ष हे सुद्धा एक मोठ कारण आहे. मात्र जालिंदरनगर आणि वाबडेवाडी ची जनता याला अपवाद ठरतात. वारे गुरुजी यांचे गलिच्छ राजकारणा मुळे जेव्हा बळी घेण्यात आला तेव्हा रात्री २ वाजता तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या उपस्थितीमध्ये वाबळेवाडी मध्ये ग्रामसभा घेऊन वारे गुरुजींचे आणि शाळेचं संरक्षण करण्याकरिता सर्व गाव एकवटले व स्थानिक आमदाराला गावबंदीच केली. शिक्षणाविषयी इतकी तळमळता गावकऱ्यांमध्ये केवळ एका माणसामुळे निर्माण झाली, ते म्हणजे वारे गुरुजी. या माणसाने या गावावरती काय जादू केली? काय माहिती पण गावामध्ये होणारे तमाशे बंद झाले.गावातील गणपती नवरात्र मध्ये होणारा खर्च लोकांनी शाळा विकास कार्या मध्ये खर्च केला. कोणी शाळेला जमिनी दिल्या तर गावातील आबालवृद्ध पाड्यावर न बसता शाळेमध्ये जाऊन सेवा देतात. गावातील सुशिक्षित तरुण तरुणी वेळेतील वेळ काळून विषय मित्र म्हणून शाळेमध्ये सेवा देतात. एक शिक्षक केवळ विद्यार्थी घडवत नसतो तर गावाचे भविष्यासोबत गावाचा भूगोल घडवित असतो. आपल्यावर झालेले चुकीचे आरोप जोपर्यंत दूर होत नाही तो पर्यंत चप्पल न घालण्याचा ‘प्रण’ करतो आणि संपूर्ण राज्यात वाबडेवाडी पॅटर्न राबविण्या करिता संपूर्ण राज्य पिंजून काढतो. गेल्या वर्षी वारे गुरुजींवरती झालेल्या सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात आली ही कारवाई केवळ आणि केवळ राजकीय स्वार्थापोटीच करण्यात आली हे सिद्ध झाले मात्र राजकीय द्वेष हा काही सुटत नसतो. आणि पुन्हा एकदा वारे गुरुजी यांची बदली पुणे जिल्हातील खेड तालुक्यातील जालिंदरनगर या माळराणावरील तीन खोल्या असणाऱ्या शाळे मध्ये करण्यात आली. कधीकाळी




ही जालिंदरनगरची शाळा ही बंद पडण्याच्या यादी मध्ये सर्वाच्चस्थानी होती. पटसंख्या ५ मात्र ध्येयवेडा वारे गुरुजी यांनी एका वर्षात या शाळेची पटसंख्या नेली १३० वर नेली. स्वतः च्या पगारातून व लोक सहभागा मधून तीन खोल्या असणारी माळरानावरील या शाळेचे नंदनवन केले. मुलांन चांगले शिक्षण मिळावे म्हणून पालक गावातून शहरा कडे जातात मात्र इथे उलट परिस्थित आहे. शहरातील लोक जालिंदरनगर ला येऊन मुलांना जिल्हा परिषद शाळेला टाकतात. इस्त्रो सारखी संस्था या शाळे समवेत शैक्षणिक करार करते व विद्यार्थी उपग्रहाचे शिक्षण घेतात. हा कायापालट केवळ एक ध्येयवेळा माणूस च करू शकतो. वारे गुरुजी एक विचार नेहमी व्यक्त करतात,‘आपण जेव्हा आपल्या शाळेची तुलना करतो तेव्हा आपल्या डोक्यामध्ये आपल्या आजू बाजूची शाळा असते. मात्र असा संकुचित विचार न करता जागतिक स्तरावर आपली शाळा कुठे आहे याचा विचार आपण करावा’ स्पर्धा करायची तर जागतिक स्तरावर करावी ज्यामुळे आपण कुठे आहोत याची जाणीव होते.जालिंदरनगर येथील शाळेने जागतिक पातळीवरिल इंग्लड स्थित T4 education या संस्थे मार्फत घेतल्या जाणाऱ्या ‘वर्ल्ड बेस्ट स्कूल प्राइज’ स्पर्धमध्ये सहभाग घेतला आणि संस्थेने केलेल्या सर्वेक्षण मधून जालिंदरनगर चां शाळेने टॉप १० मध्ये आपले स्थान निश्चित केले. दत्तात्रय वारे गुरुजी सारख्या ध्येयवेडया माणसाने आपल्या कार्यकर्तृत्वामुळे मराठी शाळेला टॉप १० मध्ये नेवून मजल मारली आहे. मात्र हा प्रवास अजून संपलेला नाही.आपल्या मराठी शाळेला जागतिक स्तरावर क्रमांक एक ची करण्या करिता तुमचा आमचा वोटिंग ची गरज आहे. तेव्हा आपण सर्वांनी https://vote.worldWestschool.org/publicvote25/entry/2649 लिंकवरती जावून वोटिंग करावे आणि आपल्या मराठी शाळेला जागतिक स्तरावर क्रमांक एकची शाळा करण्या करिता सहकार्य करावे. हा लेख प्रपंच करण्यामागे वारे गुरुजी यांचे कार्य सर्वांन पर्यंत पोहचवून एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेची शाळा वाबळेवाडी आणि जालिंधरनगर प्रमाणे जागतिक दर्जाच्या निर्माण व्हावी. मराठी शाळेमध्ये पालकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा आणि गोरगरीब विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सुद्धा जागतिक दर्जाचे शिक्षण यावे हा आहे.

**● मयुर चौधरी, अमरावती**
**मो.७७९८०६०५००**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

# नऊ वर्षाच्या चिमुरड्याचा सावत्र वडिलांकडून खून



- चिचोना फार्मजवळ बोरीत आढळला मृतदेह
- आईची 'सुखरूप परतावा' ही प्रार्थना ठरली खोटी
- तिनशे रुपयांत मित्रांची मदत घेऊन केली निघृण हत्या

■ प्रतिनिधी | अकोट ■

स्थानिक राजस्थान चौक, अकोट येथील नऊ वर्षांचा दर्शन वैभव पळसकर बेपत्ता झाल्याची तक्रार काल दुपारी झाली होती. परंतु आज सकाळी चिचोना फार्म येथील गोमुखाजवळ एका बोरीमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला असून, ही हत्या त्याच्याच सावत्र पित्याने केल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे.



काल दुपारी ३ वाजल्यापासून दर्शन बेपत्ता असल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सहाय्यक पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट शहराचे ठाणेदार अमोल माळवे, ग्रामीण ठाणेदार किशोर जुनघरे आणि डीबी टीमसह सुमारे ६० पोलीस कर्मचाऱ्यांनी रात्रभर शोधमोहीम राबवली.

स्थानिक ग्रामस्थांनीही मदत केल्यानंतर आज सकाळी चिचोना फार्मजवळील गोमुखाजवळ दर्शनचा मृतदेह बोरीमध्ये सापडला. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, आईने विश्वासाने शाळेत सोडण्यासाठी दर्शनला त्याच्या सावत्र वडिलांकडे दिले होते. मात्र त्यानेच शाळेत नेण्याच्या बहाण्याने दर्शनला बेपत्ता करून त्याचा खून केला. या अमानुष कृत्यामुळे अकोट शहरात संतापाची लाट उसळली आहे. नऊ वर्षाच्या चिमुकल्याच्या अशा क्रूर हत्येने नागरिक सुन्न झाले आहेत. समाजात हळहळ व्यक्त होत आहे.

**दोघांना अटक; पोलिसांकडून कसून चौकशी :** या प्रकरणात पोलिसांनी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हिरापूर येथील आकाश साहेबराव कान्हेरकर आणि गौरव वसंतराव गायगोले यांना अटक केली आहे. केवळ तिनशे रुपयांच्या बदल्यात ही मदत घेतल्याची माहिती समोर आली आहे.

उपविभागीय अधिकारी अनमोल मित्तल यांनी स्वतः तपासाची जबाबदारी घेत रात्रीपासून काम सुरू केले होते. पोलीस सूत्रांनुसार, लवकरच चार्जशीट सादर करण्यात येणार असून, भारतीय न्याय संहितेनुसार कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवण्याची मागणी :** या हृदयद्रावक घटनेनंतर सर्वपक्षीय संघटनांनी आज (४ जुलै) सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी व सहाय्यक पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांना निवेदन देऊन हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा व आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी केली आहे.


# थैलीसेमिया नियंत्रणासाठी मानक कार्यप्रणाली तयार करावी

## आ. रणधीर सावरकर यांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

थैलीसेमिया सारख्या दुर्धर आणि अनुवांशिक आजारावर प्रभावी उपचार, नियंत्रण आणि प्रतिबंधासाठी एकसंध मानक कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदार रणधीर सावरकर यांनी विधीमंडळात तारांकित प्रश्नाद्वारे केली. या गंभीर आजारावर नियंत्रण ठेवून भावी पिढ्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस उपक्रम हाती घेतले जावेत, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रश्नावर उत्तर देताना सार्वजनिक आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रात सुमारे १२,००० थैलीसेमिया रुग्ण असून त्यांच्या उपचारासाठी ठोस कार्यपद्धती तयार करण्यात आलेली आहे.



राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये थैलीसेमिया रुग्णांची प्राधान्याने तपासणी करून त्यांना आवश्यक चाचण्या – जसे की एमआरआय, सोनोग्राफी, 2D इको, सीबीसी, एलएफटी, केएफटी, सिरम फेरिटिन आणि एचपीएलसी चाचणी मोफत करण्यात येते.

रुग्णांना गरजेनुसार मोफत रक्त संक्रमण सेवा आणि शरीरातील लोह कमी करण्यासाठी ध्देह णर्प्टूदह गोळ्याही मोफत पुरवण्यात येतात. तसेच राज्य आरोग्य संस्था (PHI), नागपूर यांच्या मार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात असून, जिल्हा आणि तालुकास्तरावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांना याबाबत कार्यशाळांद्वारे मार्गदर्शन केले जात आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ARSH, Sickle Cell, RBSK आणि ICTC योजनांतर्गत कार्यरत असलेल्या १०० समुपदेशकांना PHI नागपूरच्या माध्यमातून थैलीसेमिया संबंधी विशेष प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ही कार्यप्रणाली राबवून थैलीसेमिया मुक्त महाराष्ट्राच्या दिशेने राज्य सरकार महत्त्वाचे पाऊल उचलत असल्याचे चित्र या चर्चेवरून स्पष्ट झाले आहे.

# सुधारित मोटार वाहन कर १ जुलैपासून लागू

**अकोला :** महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम २०२५ अंतर्गत कलम ५(२) वगळता उर्वरित सर्व तरतुदी १ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विविध प्रकारच्या वाहनांवरील कर वाढविण्यात आला असून, सर्व वाहनधारक व वाहतूक संघटनांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

सीएनजी आणि एलपीजीवर चालणाऱ्या खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांवर वाहनाच्या किमतीनुसार एक टक्क्याने कर वाढविण्यात आला आहे. त्यामुळे १० लाख रु.पर्यंतच्या वाहनावरील आधीचा ७ टक्के कर आता ८ टक्के झाला आहे.

त्याचप्रमाणे, २० लाख रुपयांपर्यंतच्या वाहनावरील कर ८ टक्क्यांवरून ९ टक्के करण्यात आला आहे. २० लाखांहून अधिक किंमतीच्या वाहनांवर आता १० टक्के कर आकारण्यात येणार आहे. हा दर पूर्वी ९ टक्के होता. बॅटरीवर चालणा-या वाहनाची किंमत ३० लाख रु.पेक्षा अधिक असेल तर ६ टक्के दराने कर आकारला जाणार आहे. बांधकाम क्षेत्रासाठी वापरली जाणारी वाहने बांधकाम क्षेत्रासाठी वापरली जाणारी मोटार वाहने जसे की क्रेन्स, खनित्रे, प्रोजेक्टर्स, कॉम्प्रेसर यावरील सध्याचा कर वाहनाच्या वजनावर आधारित होता. आता त्याऐवजी वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के इतका एकरकमी कर आकारण्यात येणार आहे.

# दिव्यांगाचा घर कोसळला : कुटुंबाचा संसार उघड्यावर

## खेट्री तलाठ्यांचा प्रताप, पंचनामा करण्यास टाळाटाळ



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील खेट्री येथे २५ आणि २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दिव्यांग अब्दुल फय्यूम याचे मातीचे घर कोसळून त्याचे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. मात्र, घटनेला आठवडाभर उलटूनही तलाठ्याकडून कोणतीही पाहणी किंवा पंचनामा करण्यात आलेला नाही.

दिव्यांग फय्यूम आपल्या पत्नी व दोन चिमुरड्यांसह मातीच्या घरात राहत होता. अतिवृष्टीमुळे घर पूर्णतः जमीनदोस्त झाले असून घरातील अन्नधान्य, वस्त्र, व गृहउपयोगी सामानाचे मोठे नुकसान झाले आहे.

### आर्थिक व्यवहार करून निवडक पंचनामे!

खेट्री, खेट्री टाकळी व चतारी या परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे खाजगी व्यक्ती आणि दलालांमार्फत आर्थिक व्यवहार करून केल्याच्या तक्रारी तहसीलदारांकडे दाखल झाल्या आहेत. मात्र दिव्यांगाच्या घराचा पंचनामा मुद्दाम दुर्लक्षित करण्यात आला आहे.

### तलाठ्यांचा कारभार खाजगी व्यक्तीकडे!

गावात तलाठी स्वतः हजर राहत नसून त्यांनी एका खाजगी व्यक्तीला कामकाजासाठी नियुक्त केले आहे. त्यामुळे तलाठ्यांचा कारभार या खाजगी व्यक्तीच्या घरी सुरू असून, विविध शासकीय कामांसाठी ग्रामस्थांकडून पैशांची मागणी होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या प्रकारांमुळे तलाठ्यांविरोधात कारवाईची मागणी दिव्यांग अब्दुल फय्यूम यांच्यासह ग्रामस्थांकडून होत आहे.

अशा वेळी तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत देणे आवश्यक असताना तलाठ्यांनी पाहणीस येणे टाळले आहे.

दिव्यांग व्यक्तीच्या आरोपानुसार, त्यांनी वारंवार तलाठ्यांशी संपर्क साधला असता, तलाठ्यांनी प्रत्यक्ष येण्याऐवजी 'कोणाच्याही हातून फोटो पाठवा, पंचनामा झालाच समजा' असे उत्तर दिले. त्यामुळे हे कुटुंब सध्या मदतीपासून वंचित राहिले आहे.

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०३८/२०२४ प्रोसेस नं. १००७३/२०२५
चौ.ता. २८/०७/२०२५ दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. लक्ष्मीबाई गुणवंतराव आठवले रा. आकृती नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला २. सागर गुणवंतराव आठवले रा. न्यू भीम नगर, राधा कृष्ण टॉकिज जवळ, अकोला, ता. जि. अकोला. ३. सुजाता गुणवंतराव आठवले रा. आकृती नगर, मलकापूर, अकोला, ता. जि. अकोला ४. स्मिता चंद्रकांत सिरसाट रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गुणवंत ग्यानुजी आठवले
**पत्ता :-** रा. आकृती नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गुणवंत ग्यानुजी आठवले यांचे दि. २७/०७/२०२१ रोजी ग्लॉबल हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केअर सेंटर सिव्हील लाईन, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सुचना

याव्दारे सर्वत्र लोकांना कळवीण्यात येते की, मी नामे प्रमोद सुरेश शिरभाते रा. गुणवंत नगर मुर्तिजापूर जि. अकोला येथील रहीवाशी असुन मी दि. १/७/२०२४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समीती येथून घरी जात असतांना माझ्या सोबत असलेली पिशवी ही वाटेतच पडली व हरवीली आहे. सर्वत्र शोधाशोध केली परंतू मिळाली नाही. सदर पिशवी मध्ये मी व माझा भाऊ विशाल सुरेश शिरभाले यांचे दस्त क्र. ११८२/२०१० दि. ३०/४/२०१० रोजी मौजा- हातगाव सर्व्हे नं. १५०/९ प्लॉट क्र.९९ क्षेत्रफळ १८५.८७ चौ.मी. २००० चौ. फुट ज्याची चर्तुसिमा पुर्वेस - कारंजा रस्ता पश्चीमेस - प्लॉट नं. १२, उत्तरेस- ले-आऊट मधील रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ३० वर्णनांकीत प्लॉटचे अस्सल खरेदी खत होते.

सदर खरेदी खत जर कोणास ही मिळुन आल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर ९२७३४३०१११ तथा वर नमुद पत्त्यावर संपर्क साधावा.

दि. ३/७/२०२४
ठिकाण-मुर्तिजापूर
**प्रमोद सुरेश शिरभात**

# सामाजिक समस्या सोडविण्यासाठी रोटरी क्लबने पुढाकार घ्यावा - डॉ. के. के. अग्रवाल



■ प्रतिनिधी | अकोला ■

रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थचा नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. के. के. अग्रवाल यांनी 'सामाजिक समस्या सोडवताना तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवण्याची गरज आहे' असे म्हणत रोटरी क्लबने समाजातील वाढत्या कौटुंबिक व सामाजिक समस्यांचे समाधान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रवीण ढोणे होते. सचिव डॉ. मेघना गांधी यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. नवीन कार्यकारिणीत डॉ. श्रद्धा अग्रवाल यांनी अध्यक्ष, प्रा. महेश बाहेती यांनी सचिव (प्रशासन), तर स्नेहल दोशी यांनी सचिव (प्रकल्प) म्हणून पदभार स्वीकारला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रा. देवेंद्र देशमुख यांनी गणेशवंदना व स्वागत गीत सादर केले. प्रेसिडेंट इलेक्ट मंजुषा कौशल यांनी सुविचार सादर केला. प्रमुख अतिथी डॉ. अग्रवाल आणि सहाय्यक प्रांतपाल प्रकाश सारडा यांचा स्वागत व सत्कार डॉ. सुरेश तारे, विजय कौशल, प्रा. प्रवीण ढोणे व डॉ. श्रद्धा अग्रवाल यांनी केला. नवीन कार्यकारिणीत अनेक पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला असून, यामध्ये प्रेसिडेंट इलेक्ट मंजुषा कौशल, उपाध्यक्ष अखिलेश पारिका, कोषाध्यक्ष डॉ. गजानन वाघोडे, सहकोषाध्यक्ष ममता खेतान, सहसचिव रवी खेतकर, सार्जंट ॲट आर्म्स नरेश अग्रवाल, तसेच विविध संचालक व सल्लागारांचा समावेश आहे. नवीन सदस्यांचा परिचय रवी खेतकर यांनी करून दिला. यामध्ये ॲड. अनुप देशमुख, गोपाल अग्रवाल, डॉ. निराली अग्रवाल, ॲड. प्रशांत वराडे, राहुल डोंगरे, संजय मालविया, अंकीता अग्रवाल आदींचा समावेश आहे. या सर्वांना रोटरी पीन व प्रमाणपत्र देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन देवेंद्र वाकचवरे व ममता खेतान यांनी केले. सचिव (प्रकल्प) स्नेहल दोशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत व स्नेहभोजनाने झाली. या कार्यक्रमास अकोल्यातील विविध रोटरी क्लबचे पदाधिकारी, सदस्य, आणि डिस्ट्रीक्टचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## Change In Name

I Have Change
My Name From
**ZIYAULLAH KHA**
-TO-
**ZIAULLAH KHAN QUADEER KHAN**
My Passport
No Is - Y8238574
My Residential Address
is - AT KHAKTA POST
NARSIPUR, TQ
TELHARA AKOLA,
444108

## Change In Name

I have change
my name From
**Mohammad Saadan Sheikh Khwaja Qureshi**
-To-
**Mohammad Saadan Shaikh khwaja Qureshi**
Passport No. U9452178
Address
Near Momin pura Masjid
Momin pura Akola

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २१९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०६०/२०२५ प्रोसेस नं. ९७३२/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. मधुकला भास्करराव बोपटे २. विनायक भास्करराव बोपटे ३. रामेश्वर भास्करराव बोपटे क. १ ते ३ रा. आपातापा, ता. जि. अकोला ४. गोकुळा मनोहर ठाकरे. रा. एरीगेशन कॉलनी, अवस्थी कॉलनी, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम ५. ललीता पाटील रा. राजेन्द्र पाटील. सी ३१/६, आर. आर. केट कॉलनी, इंदौर, ता. जि. इंदौर मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भास्कर तुळशीराम बोपटे
**पत्ता :-** रा. आपातापा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भास्कर तुळशीराम बोपटे यांचे दि. २२/०६/२०१४ रोजी आपातापा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११०९/२०२४ प्रोसेस नं. १०२३६/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ दिनांक : ०२/०७/२०२५

**अर्जदार :** १. उमेश शृंगास चतरकर २. योगेश शृंगास चतरकर दोन्ही रा. कापसी तलाव, ता. जि. अकोला ३. माया रविंद्र जानुनकर रा. महान ता. बार्शिटाकळी जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शृंगास शेषराव चतरकर २. नर्मदाबाई शृंगास चतरकर
**पत्ता :-** रा. दोन्ही रा. कापसी तलाव, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शृंगास शेषराव चतरकर यांचे दि. २२/०६/२०२० रोजी कापशी येथे निधन झाले आहे. तसेच मयत नर्मदाबाई शृंगास चतरकर यांचे दि. २५/११/२०२४ रोजी कापशी येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११२१/२०२४ प्रोसेस नं. १०२४०/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ दिनांक : ०२/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती अनुराधा महादेव तुंबडे २. मनिषा महादेवराव तुंबडे ३. रविंद्रनाथ महादेव तुंबडे सर्व रा. नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : महादेव शंकरराव तुंबडे
**पत्ता :-** रा. नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महादेव शंकरराव तुंबडे यांचे दि. १५/०३/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०६४/२०२५ प्रोसेस नं. ९९३७/२०२५
चौ.ता. ०१/०८/२०२५ दिनांक : २६/०६/२०२५

**अर्जदार :** १. लक्ष्मण भिकाजी सोळंके २. महादेव भिकाजी सोळंके ३. रामदास भिकाजी सोळंके ४. कमल मेथाराम कुवारे अर्जदार क्र. १ ते ३ रा. चांदुर ता. जि. अकोला. अर्जदार क. ४ रा. सावरगांव ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिकाजी मोतीराम सोळंके
**पत्ता :-** रा. चांदुर ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिकाजी मोतीराम सोळंके यांचे दि. ०२/०६/२०२३ रोजी चांदुर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०१५/२०२५ प्रोसेस नं. ९५५८/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ दिनांक : २४/०६/२०२५

**अर्जदार :** १. राशिदा खातून राहिम खान २. जोहरा बी राहीमन खान ३. रिझवान खान रेहमान खान ४. नेहा परवीन मोहम्मद शाहिद अफरिदी रा. चिस्तिया मस्जिद जवळ, ख्वाजा नगर सोनटक्के प्लॉट्स, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ५. नुरजहान खनम शेख मोइन रा. हातरूण, ता. बाळापूर, जि. अकोला. ६. उझमा परवीन रेहमान खान क्र. १, २, ३ व ६ रा. नवाबपुरा, शिवाजी नगर, जूने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रहमान खान रहिम खान
**पत्ता :-** रा. व्दारा करिम खान रहीम खान, नवाबपुरा, अल्लू पहेलवान घर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रहमान खान रहिम खान यांचे दि. २१/०४/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०१६/२०२४ प्रोसेस नं. ९५६६/२०२५
चौ.ता. ३०/०७/२०२५ दिनांक : २४/०६/२०२५

**अर्जदार :** १. अरेफा झरीन अब्दुल सत्तार २. अहतेशाम परवेझ अब्दुल सत्तार दोघेही रा. ताज अपार्टमेंट, अन्सार कॉलनी, फिरदोज कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. शाहगुप्ता झरीन मोहम्मद इस्माईल रा. ताज नगर, खैर मोहम्मद प्लॉट, मेहराज डऱ्याव्हर च्या घराजवळ, जुने शहर अकोला. ता. जि. अकोला. ४. इफ्तेखर परवेझ अब्दुल सत्तार रा. देवडी मैदान, पातूर ता पातूर जि. अकोला ५. अन्सार परवेझ शेख अब्दुल सत्तार रा. साहिल फराझ सी.एच.एस, पुजा नगर रोड, मिरा भाईंदर, मिरा रोड, ठाणे. ४०११०७ ६. विकार परवेझ अब्दुल सत्तार रा. रियाझ कॉलनी, इन्स्पेक्टर नगर, वाशिम रोड, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अब्दुल सत्तार अब्दुल तव्वाब
**पत्ता :-** रा. व्दारा अहतेशाम परवेझ अब्दुल सत्तार रा. ताज अपार्टमेंट, अन्सार कॉलनी, फिरदोज कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अब्दुल सत्तार अब्दुल तव्वाब यांचे दि.१७ / १२ / २०१२ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३० /०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८१०/२०२४ प्रोसेस नं. १०३२१/२०२५
चौ.ता. ०२/०८/२०२५ दिनांक : ०२/०७/२०२५

**अर्जदार :** १) तुळसाबाई मधुकर अतकरे पत्ता- रा. कुंभारी ता. जि. अकोला २) लक्ष्मण मधुकर अतकरे रा. कुंभारी ता. जि. अकोला ३) शोभा संतोष कुकड़े रा. उगवा ता. जि. अकोला ४) मिरा राजाभाऊ धोकणे रा. ॲट पोस्ट सस्ती ता. पातुर जि. अकोला ५) गजानन मधुकर अतकरे रा. कुंभारी ता. जि. अकोला ६) नंदा नागेश घ्यार रा. मैन रोड, शिंगोळी, मोरजडी, ता. जि. अकोला ७) वंदना शिवाजी घोळे रा. मंगरूळपिर रोड, न्यू खेतान नगर, कौलखेड अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर मोतीराम अतकरे
**पत्ता :-** रा. कुंभारी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर मोतीराम अतकरे यांचे दि.१८/१०/१९९९ रोजी कुंभारी, ता. व जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# वर्धा बाजार समितीला सर्वाधिक सव्वाकोटीचा नफा

## ‘शेतकरी कल्याण सन्मान योजने’ला प्रारंभ

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा कृषी उत्पन्न बाजार समिती जिल्हास्थळी असली तरी, जिल्ह्यात आणि राज्यात चर्चा आणि नावलौकिक नेहमी हिंगणघाट बाजार समिती राहिला आहे. मात्र, वर्धा बाजार समितीही आता हिंगणघाट बाजार समितीच्या समोर जाऊ पाहत आहे. गेल्या आर्थिक वर्षात या बाजार समितीला ३ कोटी ४५ लाख ३८ हजार १६३ रुपयांचे उत्पन्न झाले. त्यापैकी २ कोटी २४ लाख ४२ हजार १६३ रुपये खर्च वजा जाता निव्वळ नफा १ कोटी २० लाख ९६ हजारांचा झाला. वर्धा बाजार समितीच्या इतिहासात यावर्षी झालेले उत्पन्न आणि नफा हा सर्वाधिक ठरला आहे. यासोबत या बाजार समितीत शेतमाल विक्री करणा-या शेतक-यांकरिता रणजितदादा कांबळे शेतकरी कल्याण सन्मान योजना’ सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ मिळण्याकरिता शेतकरी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील असावा, अल्पभूधारक (५ एकरपर्यंत शेती) असावा, वीज पडून बैल, गाय मृत्युमुखी पडल्यास समितीद्वारे मदत, शेतकरी कर्करोगाने ग्रस्त असल्यास समितीद्वारे मदत, कार्यक्षेत्रा बाहेरील शेतक-याने समितीत शेतमाल विकल्यास (चालू वर्षात) उपरोक्त मदत त्यालाही मिळेल, असे स्वरुप आहे.

या बाजार समितीच्या स्वनिधीतही वाढ झाली अहे. बचतखात्यांमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ८४ लाख २८ हजार ३२६ रुपये, भारतीय स्टेट बँकेत ६१ लाख १७ हजार ८०५, युनियन बँकेत २५ लाख ४७ हजार ८३७ रुपये आहेत. यासोबत एकूण बचतठेवींत जिल्हा मध्यवर्ती बँकेत २ कोटी २९ लाख २३ हजार रुपये, भारतीय स्टेट बँकेत ५० लाखांच्या दोन स्वतंत्र ठेवी, युनियन बँकेत ५० लाख, एचडीएफसी बँकेत ५० लाख आणि पंजाब नॅशनल बँकेत ५० लाख रुपये अशी एकूण ६ कोटी ५० लाख १६ हजार ९६८ रुपयांची रक्कम जमा आहे.



अलीकडच्या काळात बाजार समितीने विविध विकासात्मक कामे केलीत. समितीच्या संपूर्ण आवारात सीसीटीव्ही कॅमे-यांचे कार्यान्वयन, समितीच्या मुख्य द्वारापासून ते कॅंटिनपर्यंत डांबरीकरण रस्ता व त्यानंतर चौकीपासून ते हायमास्टपर्यंत सिमेंटीकरण रस्ता, शेतक-यांना शेतमाल ठेवण्यास ६ हजार ५०० चौरस फुटांचे शेड बांधकाम, समितीची पशू वैद्यकीय विभाग, वर्धाकडून गोट मार्केट चालविण्यास नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती, २०२४-२५ मध्ये आमसभेसोबत शेतकरी संवादाचे आयोजन तसेच चांगले काम करणारे धान्य, कापूस व भाजीपाला व्यापारी, अडते, महिला बचतगट, सेवा सहकारी संस्थांना समितीद्वारे पुरस्कार देऊन प्रोत्साहन, कापूस उत्पादक शेतक-यांसाठी वायगाव (निपाणी) येथील सीसीआय केंद्रात वॉटर कुलरची सुविधा करण्यात आली. शेतक-यांसाठी रब्बी हंगाम चर्चासत्र घेण्यात आले. समिती व महिंद्रा कोटक बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत दंत चिकित्सा शिबिरात सुमारे १,२०० शेतक-यांची मोफत तपासणी करण्यात आली.

**भाविष्यातील विकासकामांचे नियोजन**

समितीच्या मुख्य यार्डवर सौरऊर्जा पॅनेलची उभारणी करणे, शेतक-यांसाठी २ नवीन शेड उभारणे, जुन्या ३ शेडची दुरुस्ती व सिमेंटीकरण करणे, समितीच्या आंजी (मोठी) येथील उपबाजारात ६० मे. टनाचा भूईकाटा व पेट्रोलपंपाची उभारणी करणे, समितीचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत करणे व संकेतस्थळाची निर्मिती करणे, बजाज चौकाजवळील समितीच्या भाजीबाजाराचे बांधकाम ’बीओटी’ तत्त्वावर करण्याच्या मान्यतेबाबतचा प्रस्ताव पणन मंत्रालयाचे प्रधान सचिव यांना पाठविण्यात आला असून, त्याचा पाठपुरावा करणे, ठोक व किरकोळ भाजीबाजाराचे नियोजन करणे, अशी महत्त्वाकांक्षी कामे बाजार समितीने हाती घेतली आहेत. या यशात शेतकरी बंधू-भगिनी, उपसभापती, सर्व संचालक, कर्मचारीवर्ग, अडते, व्यापारी आणि इतर सर्व घटकांचा मोलाचा वाटा आहे, अशी माहिती वर्धा बाजार समितीचे सभापती अमित गावंडे यांनी दिली.

## संक्षिप्त

### दहशत पसरविणाऱ्यास पोलिसांनी बेड्या ठोकल्या

**हिंगणघाट-** शस्त्राचा धाक दाखवून नागरिकांमध्ये दहशत पसरविणाऱ्या गावगुंडास पोलिसांनी बेड्या ठोकल्या. हर्षल मनोहर टामटे (वय २५, रा. डांगरी वॉर्ड) हा हातात शस्त्र घेऊन गाडगेबाबा वॉर्डाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नागरिकांमध्ये दहशत पसरवित होता. पोलिसांनी घटनास्थळ गाठून त्यास अटक केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### चोरास बसस्थानक परिसरातून अटक

**आष्टी (शहीद)-** चोरीच्या बेतात अंधारात लपून बसलेल्या प्रकाश मारोतराव खांडेकर (५०, रा. नवन अंतोरा) याला लहान आर्वी बसस्थानक परिसरातून अटक केली. प्रकाश अंधारात पानटपरीलगत चेहऱ्यावर दुपट्टा बांधून बसला होता. पोलिसांना पाहून तो पळाला. अखेर त्याला पकडून गुन्हा दाखल केला.

### दुचाकीला कारची धडक; कर्मचारी जखमी

**वर्धा-**जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वच्छता कर्मचारी म्हणून सेवा देणाऱ्या मनोज बिलवान यांच्या दुचाकीला कारने धडक दिली. यात ते जखमी झाले. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज हे एमएच ३२ एवाय ५८९५ क्रमांकाच्या दुचाकीने जिल्हा सामान्य रुग्णालयात कर्तव्यावर जात होते. त्यांची दुचाकी बजाज चौक परिसरात आली असता मागून आलेल्या एमएच ३२ वाय ४००२ क्रमांकाच्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात मनोज गंभीर जखमी झाले. याप्रकरणी मनोज यांच्या पत्नीने वर्धा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### माळेगाव काळीत वृद्धाला जलसमाधी

**तळेगाव-**पोलिस स्टेशन तळेगावच्या कार्यक्षेत्रात येणा-या माळेगाव गाळी येथे वृद्धाचा डोहात बुडून मृत्यू झाला. मारोतराम तुकाराम साठे (वय ७०) रा. माळेगाव काळी ता. कारंजा असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी तळेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# शालेय साहित्य महागले, पालकांच्या खिशाला कात्री

## नोटबुक रजिस्टर पोहोचले ६०-७० रुपयांच्या वर

**आष्टी/जनमाध्यम**

महागाई दिवसेंदिवस वाढतच असून तिने रौद्ररूप धारण केले आहे, काही केल्या महागाई कमी होण्याचे नावच घेत नसून गगनाला भिडलेल्या महागाईमुळे सर्वसामान्यांच्या अडचणी वाढल्या आहेत, पेट्रोल डिझेल गॅस सिलेंडर अन्नधान्य भाजीपाला इत्यादी दैनंदिन वस्तू बरोबरच शालेय साहित्यही महागले असून गरीब पालकांच्या खिशाला कात्री बसत आहे,

परीक्षा संपून दोन महिने झाले आहे त्यानंतर आता नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले आहे, त्यामुळे बाजारात आता स्टेशनरी व बुक स्टॉलच्या दुकानात गर्दी दिसून येत आहे, गणवेश व्यातिरिक्त विद्यार्थी व इतर स्टेशनरी खरेदी करताना दिसून येत आहे नवीन शैक्षणिक सत्रात शिक्षण साहित्याचे दर वाढल्याने वाढीव दराचा बोजा पालकावर पडत असल्याने पालक चिंतेत आहेत याबाबत काही बुक स्टॉल दुकानदाराकडून माहिती जाणून घेतली असता आंतरराष्ट्रीय बाजारात कागदासह इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्यामुळे नोटबुक्स आणि इतर स्टेशनरी साहित्याच्या किमती वाढल्या आहेत पेन्सिल खोड रबर पासून



पुस्तके कंपास या सर्व गोष्टीसाठी पालकांना आता जास्त पैसे मोजावे लागत आहे गेल्या वर्षीच्या तुलनेत नोटबुक रजिस्टरच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली असल्याचे सांगण्यात येते मागील वर्षी ४० ते ४५ रुपयांमध्ये मिळणारे नोटबुक रजिस्टर आता ६० ते ७० रुपयांच्या आसपास पोहोचले आहे परिसरात अनेक पालक भूमिहीन असून मोलमजुरीवरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह असतो मात्र अशा बिकट परिस्थितीतही अनेक पालकांनी आपली मुलं खाजगी महागड्या इंग्रजी शाळेत दाखल केली असल्याने इंग्रजी शाळेचा महागडा खर्च व भरमसाठ महागलेले शेती साहित्य विकत घेताना दमछाक होत असल्याचे पालक सांगतात अलीकडे बुक स्टॉल व स्टेशनरी दुकानांमध्ये ब्रॅण्डेड वस्तूचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत हे स्पर्धेचे युग असल्याने प्रत्येक क्षेत्रात स्पर्धेमुळे विविध कंपन्यांच्या साहित्याचे दरही वेगवेगळे आहेत शालेय साहित्याच्या किमतीत मोठी दरवाढ झाल्याने व आपल्या पाल्यासाठी शाळेसाठी वेगळी आणि ट्युशन क्लासेस साठी वेगळी शिक्षण साहित्य घ्यावे लागत असल्याने पालकाचा खर्च दुप्पट वाढला आहे आज सर्वत्र ब्रॅण्डेड वस्तूचा बोलबाला असल्याने विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारचे शालेय साहित्य बाजारात उपलब्ध आहेत मात्र सामान्य पालकांची आपल्या पाल्यासाठी ब्रॅण्डेड वस्तू खरेदी करताना दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे.

## जलसंधारण विभागाच्या दुर्लक्षितेमुळे

# खडकी गावाला महापुराचा धोका

**आष्टी (शहिद)/जनमाध्यम**

येथुन नजीकच असलेले खडकी हे गाव विविध समस्यांनी ग्रासले आहे.गावाच्या मधोमध मौजा डोंगरगाव,चेकबंदी आणि सुंदरपुर कडुन आलेला मोठा नाला आहे. सदर नाल्यात मौजा डोंगरगाव पहाडाचे पाणी येते.हा नाला खडकी गावाचे मध्यभागातुन गेला आहे. गेल्या दहा वर्षापासुन नाल्यातील साफसफाई ग्रामपंचायतने केली नाही.

सदर नाल्यातील साफसफाई करण्याची जबाबदारी जलसंधारण विभागाची असल्याची चर्चा परीसरात सुरू आहे.परंतु अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही. आता पावसाळ्याचे दिवस असल्याने जुलै महिन्यात जोरदार पाऊस आल्यावर नाल्याला पूर आल्यास झाडाझुडपांनी बुजलेल्या नाल्याचे पाणी गावात शिरून मोठे नुकसान होईल. परिणामी जीवितहानी होण्याची भीती नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळी पुर्व नियोजन करून नाल्यातील झाडाझुडपांची साफसफाई करण्यासाठी लहान आर्वी प्रभाग संघाच्या अध्यक्षा सीमा नागपुरे यांच्या नेतृत्वात



खडकी येथील शेकडो महीलांनी खडकी ग्रामपंचायतला आणि तहसिलदार डॉ.हंसा मोहणे यांना लेखी निवदन दिले. ग्रामपंचायत ला दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र गुळघाने आणि प्रशासक शिवदास रेवस्कर यांनी ग्रामसभा काढुन ग्रामसभा ठराव क्र. ८ दि.२८ मार्च २०२५ रोजी चर्चा झालेल्या ठरावाच्या प्रती उपविभागीय अधिकारी ,जलसंधारण विभाग (राजस्तर), आर्वी यांना देण्यात आल्या. मात्र तीनं महिन्याचा कालावधी लोटुनही नाला खोदकाम व झाडे झुडपे साफसफाईची कामे झाली नसल्याने खडकी येथील महीला आंदोलनाचे पावित्र्यात असल्याचे दिसून येत आहे. जून गेला आता जुलै महिन्याची सुरवात झाली तरी जलसंधारण विभागाची खोलीकरण करण्याचे नियोजन झाले नसल्याचे दिसत आहे.

तहसिल कार्यालयात लहान आर्वी प्रभाग संघाच्या अध्यक्षा सीमा नागपुरे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देतेवेळी शेकडो महिलांनी तहसीलदार डॉ.हंसा मोहणे यांच्याशी चर्चा करून आंदोलन केल्या जाईल असेही ठणकावून सांगितले.

# पुलगावचा जुना पूल वाहतुकीकरिता बंद

**पुलगाव/जनमाध्यम**

येथील वर्धा नदीवर पुलाच्या ठिकाणावर वाहतूक वळविण्याची अधिकारी, वर्धा अधिसूचना निघाली असल्याने या पुलावरून होत असलेली वाहतूक राज्य महामार्ग क्रमांक ७५३ वर वळविण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला होता. उपविभागीय महसूल अधिकारी यांनी वाहतूक वळविण्याबाबतची अधिसूचना बुधवार, २ जुलै रोजी निर्गमित केली. अधिसूचनेमुळे या पुलावरून आता कुणालाही वाहतूक करता येणार नाही.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग पुलगावचे कार्यक्षेत्रातील देवळी दहेगाव-पुलगाव ते अमरावती जिल्हा सिमा रस्ता राज्य महामार्ग क्रमांक ३२२-अ वरील जुना पूल जिर्ण झाल्यामुळे पुलाच्या ठिकाणी नविन पुलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत पुलावरुन जाणारी वाहतुक वळती करण्याबाबत प्रस्ताव महसूल कार्यालयाला देण्यात आला होता. उपविभागीय यांनी नवीन पुलाचे बांधकाम करण्याच्यादृष्टीने नविन पुलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत अस्तित्वातील पुलावरून पुढील धोका टाळण्याच्या दृष्टीकोणातून दुचाकी वाहतुक व पायदळ रहदारी बंद करण्याकरिता अधिसूचना जारी केली आहे. पुलगाव ते अमरावती जिल्हा सिमा येथील पुलाचे बांधकाम करीत असताना या मार्गावरील सर्व वाहतूक राज्य महामार्ग क्रमांक ७५३-आय वरून वळती करण्यात येत असल्याबाबत अधिसूचना जारी केली आहे. ही अधिसूचना पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील. त्याप्रमाणे वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी पोलीस अधीक्षक, वर्धा व पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, वर्धा यांनी वाहतुकीचे नियमन करावे, असे सांगण्यात आले आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रयत्न करणार-नितीन मडावी



**समुद्रपूर/जनमाध्यम**

तालुक्यातील उब्दा गावात प्राथमिक आरोग्य केंद्र बनले पाहिजे यासाठी मी प्रयत्न करणार असून शासना पर्यन्त प्रस्ताव टाकावं असे मत जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष नितीन मडावी यांनी उब्दा गावाला भेट देत व्यक्त केले

उब्दा गावात नितीन मडावी यांनी भेट देत तेथे सुरू असलेल्या पाण्याच्या आरो च्या कामाची पाहणी केली सोबतच विविध शासकीय योजनाची माहीती देत सदर गावाला प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे त्या सोबतच मुख्य रोड साठी प्रयत्न करणार असल्याचे या वेळी सांगितले यावेळी उब्दा गावच्या सरपंच सारिका कांबळे, उपसरपंच प्रमोद गराड, माजी सरपंच अनिकेत कांबळे,माजी सरपंच अरुण महाकळकर, ग्रामपंचायत सदस्य नारायण चौके, जोत्स्ना कांबळे, माला तुराळे, पोलीस पाटील अविनाश घोरपडे, मुख्यध्यापक राहुल महाबुद्धे,तलाठी प्रीती माहुरे आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व नागरिक उपस्थित होते.

# ग्रामीण शिक्षण व्यवस्थेकडे लक्ष देण्याची मागणी



## गोर सेनेचा आंदोलनाचा इशारा

**आर्वी/जनमाध्यम**

बोथली (किनाळा ) येथील प्राथमिक शिक्षण १ ते ८ वर्ग असून तेथे फक्त ४ शिक्षक कार्यरत आहे, पटसंख्या जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचा नुकसान होत आहे.शालेय व्यवस्थापन समितीने शिक्षकाची मागणी केलेली असून वारंवार पत्र व निवेदन देऊन सुद्धा प्रशासन जागा होत नसल्याने गोर सेने च्या वतीने गटविकास अधिकारी पंचायत समिती आर्वी यांना निवेदन देऊन लवकरात लवकर शिक्षकाची व्यवस्था करावी अन्यथा गोर सेनेच्या स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. रामेश्वर सुरकार यांचे समायोजन अति तातडीने रद्द करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

निवेदन देताना गोर सेने चे नागपूर विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर राठोड़, बादल राठोड़ गोर सेना तालुका सचिव गिरधर पवार,पंकज अवथलळे,अध्यक्ष शिक्षण समिती मुकेश चव्हाण, उपाध्यक्ष शिक्षण समिती पंकज लांडगे, किशोर बाळनोत,रवींद्र चौकोने, आशाताई दखणे इत्यादी हजर होते.

# रेशीम शेतीतून कमी खर्चात अधिक उत्पन्न

## रेशीम शेतीतून हमखास उत्पन्न घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन
## रोहयोतून ४ लाख ३२ हजारांचे अनुदान

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात रेशीम शेतीला मोठ्या प्रमाणात वाव आहे. नैसर्गिक परिस्थितीवर मात करुन शेतकऱ्यांना आर्थिक उन्नती साधण्यासाठी रेशीम शेती पर्याय ठरु शकते. पारंपारिक पिकांसोबतच कमी खर्चात अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांनी वळावे, यासाठी रेशीम शेतीला प्राधान्य दिले जात आहे. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने तुती लागवड करुन रेशीम कोषाचे उत्पादन घेऊन आर्थिक उन्ती साधावी.

रेशीमसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तीन वर्षांसाठी प्रति एकर ४ लाख ३२ हजार २४० रुपयांचे अनुदान दिले जाते. पारंपारिक पिकांवरील खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल, सततची नापीकी, बेभरवश्याची बाजारपेठ, वाढती महागाई या सर्व बाबींमुळे शेती ही परवडण्यासारखी राहिलेली नाही. या कारणांमुळे उत्पादकतेत घट होत असल्याचे दिसुन येत आहे. रेशीम शेतीकरीता अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे किमान एक एकर जमीन तसेच बारमाही सिंचनाची सोय उपलब्ध असावी. जिल्ह्यात रेशीम तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी महारेशीम अभियान राबविण्यात येते. रेशीम शेती अत्यंत फायद्याची शेती आहे. या शेतीतुन वर्षातुन ४ ते ५ वेळा कोष उत्पादन घेता येते. इतर पिकांच्या तुलनेत खर्च कमी असून हमखास उत्पन्न मिळते. गेल्यावर्षी अनेक शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचा अंगीकार केला. तसेच झाडगाव, वायफड, पवनार, घोराड, आर्वी छोटी, चिंचोली, कुरझडी फोर्ट, रसुलाबाद इत्यादी गावांमध्ये शेतकरी समुहाने रेशीम उद्योग करीत आहे.



रेशीमसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधून प्रति एकर ५०० रुपये नोंदणी शुल्क भरावे व मनरेगा योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ग्रामसभेमध्ये तुती लागवड विषय ठराव मंजुर करुन घेण्यात यावा. एका गावामध्ये किमान १५ शेतकऱ्यांनी निवड करावयाची आहे. शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीबरोबरच रेशीम शेतीची जोड दिल्यास गावातच रोजगार निर्मिती होऊन रेशीम कोष उत्पादन करुन दरमहा उत्पन्न घेता येते. रेशीम शेतीमध्ये एका एकरातून वर्षाला ५ पीके घेता येतात व दोन एकर तुती लागवड केल्यास दरमहा शाश्वत उत्पन्न घेता येते. यासाठी शेतकऱ्यांनी रेशीम शेती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे.

९० टक्के पर्यंतही अनुदानाची तरतुद ज्या लाभार्थ्यांना मनरेगा, पोकरा या दोन्ही योजनेचा लाभ घेता येत नाही अशा लाभार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ योजना राबविली जाते.

**असे मिळते शेतक-यांना अनुदान**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तुती लागवड मजुरी, किटक संगोपन साहित्य व किटक संगोपनगृह बांधकाम यासाठी तीन वर्षाकरीता प्रति एकर ४ लाख ३२ हजार २४० रुपये देण्यात येतात. सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत रेशीम शेतीसाठी २ एकर तुती लागवडीकरिता अंदाजपत्रकीय ७ लाख ५० हजार रकमेच्या सर्वसाधारण लाभार्थ्यांना तुती लागवड, ठिबक सिंचन संच, किटक संगोपनगृह बांधकाम, किटक संगोपन साहित्य व निर्जंतुकीकरण औषधी या घटकांकरिता ७५ टक्के व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ९० टक्के अनुदान देण्यात येते. एक एकरासाठी ५ लाख रकमेच्या अंदाजपत्रकानुसार वरील प्रमाणे घटकांसाठी सर्वसाधारण लाभार्थ्यांना ७५ टक्के व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ९० टक्के अनुदान मिळते. एकदा तुती लागवड केल्यानंतर १० ते १५ वर्षांपर्यंत तुती लागवड टिकुन राहते. इतर पिकांचे सवलतीच्या दरामध्ये अंडीपुंज पुरवठा केला जातो. प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन विनामुल्य दिल्या जाते. रेशी किटकांची विष्ठा संगोपना मधील उरलेल्या तुती फांदया सेंद्रिय शेतीसाठी उपलब्ध होतात.

तुती लागवडीसाठी मनरेगा योजना, सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी ओलीताचे साधन व पाण्याचा निचरा होणारी जमीन असणाऱ्या नोंदणी करावे. नोंदणीसाठी आवश्यक ७/१२, ८-अ, आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेबुक झेरॉक्स, मनरेगा योजनेकरीता आवश्यक असलेले जॉबकार्ड तसेच २ पासपोर्ट फोटो आवश्यक आहे. तुती लागवड व्यवस्थापन व किटक संगोपनगृह बांधकाम यासाठी जिल्हा सहकारी बँकेकडुन कमाल १ लक्ष ६० हजार रुपये पीककर्ज उपलब्ध होणार आहे, असे रेशीम विकास अधिकारी विलास शिंदे यांनी कळविले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २१९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - १२१५/२०२५
विमल व इतर वि. निरंक
पुढील तारीख १९.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-**
१. **विमल प्रेमलाल फुरसुले,** वय ८८ वर्षे, धंदा - निरंक
२. **शांता पार्श्वनाथ धनखाडे,** वय ७१ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.लोकमान्य चौक, जैन मंदिर जवळ वार्ड नं. १४,तेल्हारा, जि.अकोला
३. **माणिक प्रेमलाल फुरसुले,** वय ६३ वर्षे, धंदा - निवृत्त
क्र.१ व ३ रा.प्लॉट नं.९०, मिनी बायपास रोड शुभम पॅलेस जवळ चैतन्य कॉलनी, रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **मंगला अनिल आगरकर,** वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा. प्लॉट नं.१४, हॅन्डपंप जवळ पाटील लेआउट स्वावलंबी नगर व्हीटीसी नागपूर, ता.जि.नागपूर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रेमलाला रुंजाजी फुरसुले** हे **दि.११/०७/२०१३** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार विमल प्रेमलाल फुरसुले व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विमल प्रेमलाल फुरसुले व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०२.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - ११०१/२०२५
कमल वि. निरंक
पुढील तारीख ०८.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-**
१. **कमल सुभाषराव वंजारी,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पोलीस क्वार्टर नं.३४८, भातकुली जवळ पंचायत समिती कॅम्प, अमरावती
२. **राखी मनिष तायडे,** वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.झोपडपटटी वॉर्ड नं.६,शिराळा, अमरावती
३. **रोहित सुभाषराव वंजारी,** वय ३५ वर्षे, धंदा - नोकरी
४. **राहुल सुभाषराव वंजारी,** वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी
क्र.३ व ४ सर्व रा. जय भवानी कॉलनी मार्डी रोड, कॅम्प, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाष सहदेवराव वंजारी** हया **दि.२०/११/२०२४** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार कमल सुभाषराव वंजारी व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल सुभाषराव वंजारी व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १८.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३६६/२०२५
पुढील ता.२४.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) श्रीमती अनिता प्रेमदास नन्नावरे, वय ६५ वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. संघपाल प्रेमदास नन्नावरे, वय-२९ वर्ष, व्यवसाय-मजुरी दोघेही रा.चिंचोलीगवळी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
३) सौ. संगीता अमोल संगोलकर, वय-२६ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.न्यु अंबेडकर नगर, वार्ड नं.८० महाबली नगर कोलार रोड हुजूर भोपाल, ता.जि.भोपाल (मध्यप्रदेश)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे **वडील नामे प्रेमदास देवराव नन्नावरे** हे दिनांक १८/१०/२०२२ रोजी Chincholi Gavali, Tq. Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता बारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आआंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अस्था कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४१९/२०२५
पुढील ता.१४.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) सौ. कुसूम प्रकाशराव बहाड, वय ६२ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. बुधवारा अमरावती, ता. जि. अमरावती.
२) अशोकराव महादेवराव खांडेकर मयताचे वारस
२अ) श्रीमती वंदना अशोकराव खांडेकर, वय-५६वर्ष, व्यवसाय- घरकाम
२ब) शुभम अशोकराव खांडेकर, वय-३० वर्ष, व्यवसाय-शेती दोघेही रा. तळेगांव, ता. मोर्शी, जि. अमरावती.
२क) सौ. दिपीका मुकेशराव नेरकर, वय-३४ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.पार्वतीनगर अमरावती, ता.जि. अमरावती.
३) कांता लक्ष्मणराव पाटणे मयताचे वारस
३अ) श्री. विनोद लक्ष्मणराव पाटणे, वय-५८ वर्ष, व्यवसाय-शेती
३ब) श्री. मंगेश लक्ष्मणराव पाटणे, वय-४६ वर्ष,व्यवसाय-शेती
३क) सौ. अर्चना अरविंद बहाड, वय ५० वर्ष, व्यवसाय-घरकाम सर्व रा.राजुरा बाजार, ता. वरुड, जि. अमरावती.
३ड) दिनेश लक्ष्मणराव पाटणे मयताचे वारस
३डअ) श्रीमती सुनिता दिनेशराव पाटणे, वय-४२ वर्ष, व्यवसाय-शेती
३डम) ईश्वरी दिनेशराव पाटणे, वय-१७ वर्ष,व्यवसाय-शिक्षण दोघीही रा. काटोल, ता. काटोल, जि. नागपूर.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :**Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी,यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ ची आई तर अर्जदार क.२ (अ) ची सासु तर अर्जदार नं.२ (ब.क) तसेच अर्जदार नं.३ (अ.ब.क) यांची आजी तर अर्जदार नं.३ (डअ) ची आजीसासु तर अर्जदार नं.३ (डब) ची **पणआजी नामे शांताबाई महादेवराव खांडेकर** ही दिनांक ०९/०१/२०१६ रोजी तीचे राहते घरी तळेगांव दाभेरी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. वरील मयतांना अर्जदारांशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २९९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एन.सी.सोरटे ७ सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - ११५०/२०२५
श्रीमती जायेदा बी अधिक चार विरुध्द निरंक
पुढील तारीख २५.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1) **Zaheda Bi Iqbal Khan Pathan**
Age 49 yrs., Occu.- Household
2) **Rubeena Parveen Iqbal Khan Pathan**
Age 28 yrs., Occu.- Household
3) **Samina Parveen Iqbal Khan Pathan,** Age 26 yrs., Occu.- Household
4) **Shahrukh Khan Iqbal Khan,** Age 24 yrs., Occu.- Business
5) **Saniya Saba Ikbal Khan Pathan,** Age 22 yrs., Occu.- Household
All R/o. Indla, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत इकबाल खान शेहर खान पठाण** हे **दि.२७.०२.२०२१** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार जाहेदा बी अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **जाहेदा बी अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - १११२/२०२५
श्री.ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक
पुढील तारीख २२.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1) **Dnyaneshwar Hamraji Thorat**, Age 61 yrs., Occu.- Labour
2) **Sushil Dnyaneshwar Thorat**, Age 32 yrs., Occu.- Labour
R/o. Zopadpati, Shegaon, V.M.V. Road, Tq. & Dist. Amravati -444 604

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत बेबी ज्ञानेश्वर थोरात** हे **दि.०१.०८.२०२४** रोजी ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री. ज्ञानेश्वर अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहिर नोटीस

### विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)

### चांदूर बाजार, जि अमरावती

आर.एम.जे.सी. क्र. ४१३/२०२५ ने.ता, ९/०८/२०२५

**अर्जदार :** १. नीलिमा नंदकुमार देशमुख, वय ६६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. चैतन्य नंदकुमार देशमुख, वय ४० वर्षे, व्यवसाय - सव्हींस३. ईशान नंदकुमार देशमुख, वय ३६ वर्षे, व्यवसाय -सव्हींस सर्व रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती,

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मय्यत नंदकुमार काशीराव देशमुख** यांचा मृत्यु दि. ३०/०९/२०२४ रोजी रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मय्यत गयाबाई काशिराव देशमुख** यांचा मृत्यु दि. २८/११/२००८ रोजी रा. बेलोरा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे मरण पावले,यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत, अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४१३/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाच अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २७/०६/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३९१/२०२५
पुढील ता.४.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) श्री. प्रकाश पंजाबराव निकम, वय-५४ वर्ष, व्यवसाय-शेती रा. तळणी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
२) सौ. रजनी गजानन देशमुख, वय-५१ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. अमडापूर,पो. राजुरा बाजार, ता. वरूड, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे **वडील नामे पंजाब दौलतराव निकम** हे दिनांक २९/०४/२०२१ रोजी त्यांचे राहते घरी तळणी, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मरण पावलेले आहे तसेच अर्जदारांची आई नामे कमलाबाई पंजाबराव निकम ही दिनांक ०८/०८/२०११ रोजी तीचे राहते घरी तळणी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४४०/२०२५
पुढील ता.७.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) श्रीमती चंद्रभागा सदाशिवराव ठोंबरे, वय ७८ वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. पुंडलिक सदाशिवराव ठोंबरे, वय ६२ वर्ष, व्यवसाय-शेती
३) श्री. नंदकिशोर सदाशिवराव ठोंबरे, वय ६० वर्ष, व्यवसाय-शेती सर्व रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.
४) श्री. वासुदेव सदाशिवराव ठोंबरे, वय-५४ वर्ष,व्यवसाय-शेती रा. मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
५) सुमन पांडुरंग आंबेकर, वय-६४ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. गडीपूरा करजगांव, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ चे पती तर अर्जदार क.२ ते ५ चे वडील नामे **सदाशिव तुळशीराम ठोंबरे** हे दिनांक २४/०९/२०१९ रोजी Khanapur, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे बारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा से समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.पी.के.धोंडगे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - ११४९/२०२५
श्रीमती रिना अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील तारीख २८.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1) **Reena Prashant Jamodkar**, Age 49 yrs., Occu.- Housewife
2) **Akshaya Prashant Jamodkar**, Age 24 yrs., Occu.- Education
3) **Arya Prashant Jamodkar**, Age 80 yrs., Occu.- Household
4) **Manorama Dattatray Jamodkar**,
All R/o. Hariom Colony, Near Gajanan Maharaj Temple, Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत प्रशांत दत्तात्रय जामोदरकर** हे **दि.०४.०७.२०२२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार रिना अधिक तिन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती रिना अधिक तिन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २१.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

### अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२५/२०२५ ने.ता.०३/०७/२०२५

पिटीशनर :- निलेश काकडे अधिक १

-- विरुध्द --

रिस्पाडंट :- मंदाकिनी व इतर

**APPLICATION IN THE MATTER OF ADOPTION OF THE CHILD DARPAN (FEMALE, HINDU) , DOB:25/10/2015) AS PER PROVISIONS OF CHAPTER II SECTION 5 OF HINDU ADOPTION AND MAINTENANCE ACT, 1956**

ज्याअर्थी वरील वादी निलेश काकडे यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती, यांच्या न्यायालयात प्रतिवादी मंदाकिनी साहेबराव धांडे व इतर यांच्या विरुध्द अपिल सादर केले आहे.

त्याअर्थी प्रतिवादी नं.३ मोहम्मद शफी शेख हबीब, रा.गणेश पेठ,प्रविणनगर, अमरावती, ता.जि.अमरावती, वारंवार नोटिस देऊनही न्यायालयात हजर राहत नसल्याने त्यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी अपिलाची सुनावणीसाठी दिनांक **०३/०७/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अपिलाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ३०.०६.२०२५**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## जाहिर नोटीस

### विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)

### चांदूर बाजार, जि अमरावती

आर.एम.जे.सी. क्र. ४१२/२०२५ ने.ता, १९/०८/२०२५

**अर्जदार :** १. कुसुम वसंतराव भुस्कडे, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. अभय वसंतराव भुस्कडे, वय ५१ वर्षे, व्यवसाय उप मुख्याध्यापक मेडीकल कॉलेज सर्व रा. कु-हा ता. चांदुर बाजार जि. अमरावती

....... विरुध्द.......

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मय्यत वसंतराव अमृतराव भुस्कडे यांचा मृत्यु दि. ०७/०१/२०२५ रोजी रा. कु-हा ता. चांदुर बाजार जि, अमरावती येथे झालेला आहे. तसेच मय्यत पार्वताबाई अमृतराव भुस्कडे ह्या अंदाजे १९९६ व्या वर्षी मय्यत झाली आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. **४१२/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाच अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. २७/०६/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३८१/२०२५ पुढील ता.१०.०५.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) श्री दिनेश महादेवराव संभावीत, वय ५२ वर्ष, व्यवसाय-शेती
२) श्री. प्रशांत महादेवराव संभावीत, वय ४३ वर्ष, व्यवसाय-शेती दोघेही रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती.३) सौ. माधुरी सुधिर याऊल, वय ४९ वर्ष,व्यवसाय-घरकाम रा. शिरजगांव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती.४) सौ. वनमाला प्रभाकरराव सुने, वय-४५ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा.कु-हा, ता. तिवसा, जि. अमरावती.५) अर्चना प्रमोदराव अंबाडकर मयताचे वारस ५अ) कु.श्रावणी प्रमोदराव अंबाडकर, वय-१७ वर्ष, धंदा-शिक्षण
६) कु.ईश्वरी प्रमोदराव अंबाडकर, वय-१४ वर्ष, व्यवसाय-शिक्षण दोघीही रा.नांदगांव खंडेश्वर, ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ४ ची आई अर्जदार नं.५ (अ.ब) ची **आजी नामे वच्छलाबाई महादेवराव संभावीत** ही दिनांक १७/०१/२०२२ रोजी तीचे राहते घरी अंबाडा, ता.मोर्शी, जि. अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नावे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. वरील मयतांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत, आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३७९/२०२५
पुढील ता.२९.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) संगीता लक्ष्मण राऊत, वय-५१ वर्ष, व्यवसाय -घरकाम
२) श्रीमती अश्विनी अंकुश राऊत,वय-२४ वर्ष, व्यवसाय -घरकाम
दोघेही रा. मायवाडी, पो. पाळा, ता. मोर्शी, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चा मुलगा तर अर्जदार नं.२ चे पती नामे अंकुश लक्ष्मणराव राऊत हे दिनांक २७/०३/२०२३ २०२३ रोजी Yavali, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक ३/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

No.2

## CIVIL JUDGE SENIOR DIVISION

**IN THE COURT OF Shri R.M.Choutre Amravati,Amravati.**

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (O, 5, R, 1, 5)**

**Spl. C.S./156/2017**
**Swapnil Badalsingh Raghuwanshi Vs Sudhir Bhagchand Gupta**
**NEXT DATE: 22.07.2025**

**To,**
**Saroj Naresh Nandiyana**
**Infront of Dr. Mahesh Heda, Near Chitra Steel Furniture Depot. Maltekdi Road, Amravati. MAHARASHTRA**

Whereas **Swapnil Badalsingh Raghuwanshi** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in the Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **27.07.2025** at **11.00 o'clock in the forenoon,** to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **21.06.2025**

**Notice -** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord you can have a summons from this Court to compel the attedance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.ए.बी.कटट ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - १११८/२०२५
निलेश वि.निरंक
पुढील तारीख ३०.०७.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-** १. **निलेश रामदास गायकवाड,** वय ४४ वर्षे, धंदा - मजुरी
रा.अंतोरा, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामदास महादेवराव गायकवाड** हे **दि.०२/०२/२०१६** रोजी व श्रीमती सुशिलाबाई रामदास गायकवाड हे खूप वर्षापूर्वी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार निलेश रामदास गायकवाड** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निलेश रामदास गायकवाड** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २३.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहिर नोटीस

### विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क स्तर)

### चांदूर बाजार, जि अमरावती

आर.एम.जे.सी. क्र. ४२२/२०२५ ने.ता, २१/०८/२०२५

**अर्जदार :** १) वामन नामदेव राऊत, वय ७८ वर्षे, व्यवसाय - शेती रा. बेलोरा, ता चांदर बाभार, जि. अमरावती.२)सुमन अंबादासराव ठाकरे, वय ७२ वर्षे व्यवसाय - घरकाम रा. परसोळा, पोस्ट. खराळा, ता. चांदूर बाजार जि. अमरावती३) रजनी हिम्मत खाडे, वय १९ वर्षे व्यवसाय -घरकाम रा. वार्ड नं. ३, आशेली, ता. मोशी, जि. अमरावती.४) अलका नंदकुमार निभोरकर, वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा. नरसिंगपूर, बाचली शहिद ता. जि. अमरावती

....... विरुध्द.......

**गैरअर्जदार :-निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार क्र १ ते ४ वरील विकाणी राहतात अर्जदार ते ४ यांचे **वडील नामे नामदेव मारोतराव राऊत** यांचा मृत्यु दिनांक २०/०२/२००५ रोजी बेलोरा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथे झाला. तसेच **अर्जदार यांची आई नामे वत्सलाबाई नामदेवराव राऊत** यांचा मृत्यु दिनांक १५/०९/२००७ रोजी बलता बाबर जि. अमरावती येथे झालेला आहे. वरील अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत, अर्जदार मयताचे कामदेशिर बारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्राम ध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार**

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.४२१/२०२५
पुढील ता.१३.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) सौ. रसिका गणेशराव भुयार, वय ४० वर्ष, व्यवसाय-घरकाम
२) श्री. गणेश बळीराम भुयार, वय ५३ वर्ष, व्यवसाय-शेती
दोघेही रा. निंभी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २. बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचा **मुलगा नामे प्रणव गणेशराव भुयार** हा अविवाहीत असतांना दिनांक १७/०५/२०२५ रोजी Nimbhi, Tq Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेला आहे. वरील अर्जदारांशिवाय त्याला ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही, त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**दिनांक २/०७/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,मोर्शी

## विद्यमान दिवाणी न्यायाधिश, साहेब क. स्तर, मोर्शी

किरकोळ अर्ज क्र.३९९/२०२५
पुढील ता.६.०८.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** १) श्रीमती पल्लवी रविकिरण इंगळे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२) कु.श्रीनीती रविकिरण इंगळे, वय-११ वर्षे, व्यवसाय -शिक्षण
३) कु. ऋतुजा रविकिरण इंगळे, वय ३ वर्षे
(अर्जदार कं. १ ही अर्जदार क्रं. २ व ३ ची अ.पा.क.आई असे)
४) कमल श्रीराम इंगळे, वय ७३ वर्षे, व्यवसाय -घरकाम
सर्व रा. चिखलसावंगी, ता. मोर्शी, जि. अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

वरील अर्जदारांनी वि. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २ बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार कं. १ हीचे पती, तर अर्जदार कं. २ व ३ यांचे वडील व अर्जदार कं. ४ चा मुलगा नामे रविकिरण श्रीराम इंगळे यांचा दि.२९/०४/२०२५ रोजी न्युरॉन हॉस्पीटल नागपुर, ता. जि. नागपुर येथे मृत्यु झाला. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २७/०६/२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर मोर्शी

# चाकुने हल्ला करत घरावर दरोडा

## हिऱ्यांच्या अंगठीसह अख्ख्या साड्या पळविल्या, १५ ते २० लक्ष रूपयाचा ऐवज लंपास

**अचलपूर/ वार्ताहर**

गेल्या काही वर्षापासून परतवाडा शहरालगत असलेल्या नारायणपूर मार्गावरील देवमाळी येथील विश्वकर्मा विहार परिसरात प्रसिध्द बिल्डर जानराव डाहाके निवासी आहेत. ३ जुलैच्या मध्यरात्री २.३० वा. सुमारास जानराव डाहाके व त्यांच्या पत्नी इंदिरा डाहाके झोपेत असतांना तीन दरोडेखोरांनी घरात प्रवेश करत चाकूचा धाक दाखवून सोने, चांदी, हिऱ्याच्या अंगठीसह नगदी १ लाख १० हजार रूपये पळविले. विशेष म्हणजे या दरोडेखोरांनी कपाटातील अख्ख्या साड्या व इतर साहित्यही एका साडीत बांधून नेत पोबारा केला.





डाहाके दाम्पती घरी झोपेत असतांना इंदिरा डाहाके यांना चोरांनी कपाटाची चाबी मागत दागिने व पैश्याची मागणी केली. याच दरम्यान बोलण्याचा आवाज आल्याने जानराव डाहाके यांना जाग आली त्यांनी त्या चोरट्यांना काठी मारून प्रतिकार केला. मात्र ३० ते ३५ वयोगटातील व तरूण दरोडेखोरांनी जानराव डाहाके यांच्या हातावर चाकूचे वार केले.कपाट फोडून नगदी एक लाख दहा हजार, सोन्याच्या चार अंगठ्या त्यात एक हिरे असलेली अंगठी जिची किंमत ५ लाख रूपये, सौ. डाहाके यांच्या गळ्यातील मंगळसुत्र, कानातील टॉप्स, बांगड्या घरातील चांदीचे दागिने असा एकुण १५ ते २० लक्ष रूपयाचा माल लंपास केला. या दोघांना एका खोलीत बंद केले. हा सर्व प्रकार सकाळी ४ वाजेपर्यंत चालला.

त्यानंतर डाहाके यांनी परतवाडा येथील रहिवाशी असलेली मुलगी कल्पना बंडू घोम, अलका सतवासे यांना दरोड्याबाबत माहिती पोलिसांना देण्यास सांगितले. पोलिसांचे पथक घटना स्थळी दाखल झाले असून पुढील तपास केल्या जात आहे.मात्र जुळ्या शहरात चोरीचा घटनेत वाढ होत असल्याने नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संक्षिप्त

## विद्यापीठात 'ब्राह्मी लिपी' शिकण्याची सुवर्णसंधी

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संस्कृत विभागातर्फे दि. १४ व १५ जुलै, २०२५ रोजी 'राष्ट्रीय लिपी कार्यशाळा' आयोजित करण्यात आली आहे.भारताच्या प्राचीन लिपींचा अभ्यास करण्याची ही एक सुवर्णसंधी असून, सदर कार्यशाळेत ब्राह्मी लिपीचे वाचन व लिखाण शिकवले जाईल.ही एक विनामूल्य ऑफलाइन कार्यशाळा असून, यासाठी नावनोंदणी सुरु झाली आहे. केवळ ५० जागा उपलब्ध असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी त्वरित आपली जागा निश्चित करावी, असे आवाहन संस्कृत विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांनी केले आहे. कार्यशाळेत सहभागी होऊन भारताच्या समृद्ध लिपी परंपरेची माहिती करून घ्यावी व कार्यशाळेचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे. अधिक माहितीकरीता समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्रमांक ९४२०५१९९४६ यावर संपर्क साधता येईल.

## वृक्षारोपणातून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**तिवसा-** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, सातरगाव येथे कृषी दिनाचे औचित्य साधून एक प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील रावे (ग्रामीण कृषी कार्यानुभव) अंतर्गत कार्यरत कृषी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने हा उपक्रम उत्साहात राबविण्यात




आला.शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा भोजने, शिक्षक जनार्धन शेंडे व प्रियांका उमरे, तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शेतीचे महत्त्व, शाश्वत शेती व कृषी नवकल्पनांबाबत माहिती दिली.यावेळी रावे विद्यार्थी मोनीष बावनकर, प्रणय बैगणे, हिमांशु कोंडे, साक्षी भगत आणि रुची अलोने उपस्थित विद्यार्थ्यांना कृषी दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमानंतर सर्वांनी मिळून शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.या उपक्रमासाठी प्राचार्य अरूण डहाके, रावे समन्वयक सावन राठी, आणि विस्तार शिक्षण विषयाचे मार्गदर्शक मनोज लुंगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## नवीन रुग्णवाहीका द्या - नागरिकांची मागणी

**शिराळा-** येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एक रुग्णवाहिका बरेच दिवसापासून बंद आहे.त्यामुळे शिराळा प्राथमिक आरोग्य केंद्राला नवीन १०८ नंबर एबुलेंन्स थांबा देण्यात यावी अशी शिराळा परिसरातील नागरिकांची मागणी आहे. अमरावती तालुक्यातील मोठे गाव शिराळा असून आरोग्य केंद्रात अठरा गांव समाविष्ट आहेत. तसेच काही ठिकाणी उपकेंद्र आहे. शिराळा, पुसदा, नांदुरा, रोहणखेडा, यावली शहिद, देवरा, देवरी, फाजलापुर, दोनद,टेंभा, खानापूर , नादुरा बु., नरशिंगपुर ,भगवानपुर, थुगांव अशी गावे आहेत. मात्र १०८ नंबर एबुलेंन्स ची सुविधा नसल्यामुळे रुग्णांना भांड्याच्या गाडीने अमरावती जावे लागते. या सर्व बाबींची दखल घेवुन शिराळा प्राथमिक आरोग्य केंद्राला नवीन १०८ नंबर एबुलेंन्स थांबा देण्यात यावी अशी मागणी नागरिकांची मागणी केली आहे.

## परिवर्तन प्रबोधिनीचे अमरावती भूषण व जीवनगौरव पुरस्कार जाहीर

### सुदर्शनजी गांग व नरेशचंद्र काठोळे पुरस्काराचे मानकरी





**अमरावती/ का.प्र.**

परिवर्तन प्रबोधिनी अमरावती तर्फे दिले जाणारे अमरावती भूषण व जीवनगौरव पुरस्कार नुकतेचं जाहीर करण्यात आले असून यंदा या पुरस्काराचे मानकरी सुदर्शनी गांग व नरेशचंद्र काठोळे हे आहेत.

जेष्ठ समाजसेवक व सामाजिक कार्यकर्ते सुदर्शनजी गांग यांना अमरावती भूषण तर मिशन आय. ए. एस. चे प्रमुख संचालक,शिक्षणतज्ञ श्री नरेशचंद्र काठोळे यांना त्यांच्या कार्यासाठी जीवनगौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात येणार आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा ६ जुलै रोजी स.१० वा. कांचन रिसॉर्ट अमरावती येथे होऊ घातलेल्या दुसऱ्या परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलनात विविध साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.याबद्दल या दोन्ही मान्यवरांचे परिवर्तन प्रबोधिना च्या अध्यक्ष, प्रा.डॉ.शोभा रोकडे ,प्रा.रेखा बेलसरे, प्रा.डॉ.मंदा नांदूरकर, सौ.वासंती गौपाल, सरिता काठोळे, विशाखा पाळेकर, माधवी देशमुख, ॲड.प्राजक्ता राऊत, प्रा.डॉ. वनिता देशमुख, डॉ. सुनंदा गडकर यांनी अभिनंदन केले असून विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# सौर कृषी पंपाच्या समस्यांबाबत मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

**अमरावती/ का.प्र.**

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.



सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

# अशोक नगर येथे सेवापुर्ती व गुणगौरव सोहळा

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा अशोक नगर येथील मुख्याध्यापक वनमाला चौधरी यांचा ग्रामपंचायत अशोक नगर व शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्ग व समूह गट साधन केंद्र अंजनसिंगी यांच्या वतीने सेवापूर्ती सोहळा व सत्कार समारंभ संपन्न झाला .



वनमाला चौधरी जिल्हा परिषद शाळा अशोक नगर येथे मुख्याध्यापिका म्हणून अत्यंत शांत संयमी शिस्तप्रिय म्हणून सर्वत्र परिचित होत्या.त्यांनी त्यांच्या सह कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन ग्रामपंचायत अशोक नगरच्या सरपंच स्नेहल कडू व तात्कालीन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश कडू व सर्व सदस्यांना सोबत घेऊन सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये खाजगी शाळेच्या स्पर्धेमध्ये आपली शाळा कशी आणता येईल हे डोळ्यासमोर ठेवून पालकांना सोबत घेऊन शाळेची पटसंख्या ही शंभर टक्के ठेवण्यात त्या यशस्वी ठरल्या. त्यांचे सहकारी शिक्षक विनोद राठोड व सुषमा गायधने व सहकर्मचारी कल्याणी कडू व रवीना परतेकी या सर्वांनी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम राबवून सर्वांचे कौशल्य दाखवण्याची संधी दिली व विद्यार्थ्यांच्या मनावर शिस्त व संस्कार निर्माण केले.

त्यांच्या याच कार्यामुळे ३० जून २०२५ रोजी त्यांची सेवा संपल्यामुळे ग्रामपंचायत अशोक नगर तसेच शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांच्या वतीने त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आजपर्यंत कधी न झालेला सेवापूर्ती सोहळ्याचा कार्यक्रम व गुणगौरव सोहळा करण्यात आला. ग्रामपंचायत उपसरपंच अभिजीत इंगळे,अंजनसिंगी गटसाधन केंद्राचे प्रमुख तायडे,चव्हाण,माजी उपसरपंच तथा सदस्य ओंकार व खंडारे रेखा साठवणे, ग्रामपंचायत सदस्य मीना ठाकरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पूजा शलोकार, उपाध्यक्ष पूजा तिघरे, जया शेंडे, शिरसाट,राहुल कडू, प्रवीण वानखडे, प्रमोद शहारे, संकेत मोहोळ, मुख्याध्यापक हटवार,अंगणवाडी सेविका मदतनीस आशा वर्कर प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व कर्मचारी ग्रामपंचायत सचिव महेश चंद्र शेलार तसेच गावातील पालक वर्ग गणेश तिघरे, नितीन कांबळे, अतुल घोडे व शाळा व्यवस्थापन समितीचे तज्ञ संचालक दिनेश कडू या सर्वांची उपस्थिती होती.

# शहरातील महारुद्र नगर परिसरातील रस्ते चिखलमय

**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**

शहरातील महारुद्र नगर परिसरातील कच्च्या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून नागरिक महिलांना या रस्त्यावरून ये जा करणे कठीण झाले आहे. कच्च्या रस्त्याच्या या दयनीय अवस्थेला घेऊन या परिसरातील महिलांनी गुरुवारला नगरपरिषद येथे अभियंत्यांना घेराव घालत निवेदन दिले. यावेळी मुख्याधिकारी मात्र कार्यालयात गैरहजर आढळले तर महिलांनी लोकप्रतिनिधी बद्दल नाराजी व्यक्त केली.

शहरातील महारुद्र नगर हा वर्दळीचे परिसर असून या ठिकाणी लहान मुलांची शाळा सोबत अनेक कॉलनी बनल्या आहेत. या परिसरातील नागरिक नगर परिषदला अनेक कर भरतात मात्र नगर परिषदे कडून या परिसरात रस्ते सुद्धा बांधण्यात आले नाही.दरवर्षी या कच्च्या रस्त्यावर नगरपालिके कडून मुरूम टाकण्यात येते. पावसाळ्यात हे रस्ते अतिशय चिखलमय होत




असून या रस्त्यावरून दुचाकी सुद्धा जीव मुठीत घेऊन चालवावी लागते. कित्येकदा या परिसरातील नागरिकांची दुचाकी स्लिप होऊन अपघात झालेले आहेत. परिसरातील नागरिक या समस्याना घेऊन दरवर्षी नगरपालिका तसेच लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात येते.तरीसुद्धा नगरपालिका किंवा लोकप्रतिनिधी कडून याची ही दखल घेण्यात आली नाही म्हणून परिसरातील महिला नागरिकांनी नगरपालिका अभियंत्याला घेराव घालत त्यांच्या ह्या समस्या मांडल्या.

# जिल्हयातील प्रकल्पात ४० टक्केच जलसाठा

**अमरावती/ का.प्र.**

जून महिन्याच्या प्रारंभापासून पावसाने खंड दिल्याने धरणांतील जलसाठ्यावर परिणाम होऊ लागला आहे. गतवर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे प्रकल्पात असलेला जलसाठा झपाट्याने कमी होऊ लागला असून सद्यस्थितीत जिल्ह्यातील धरणांमध्ये सरासरी ४० टक्के जलसाठा शिल्लक आहे. आगामी काळात दमदार पाऊस न झाल्यास पाणीटंचाईचे संकट कायम राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिल्ह्यात अप्पर वर्धा हा मोठा व सात मध्यम प्रकल्पांसह ४८ लघु प्रकल्प आहेत. या प्रकल्पांची एकूण जलसंचय क्षमता १,०४७दलघमी असून सद्यस्थितीत ४२२ दलघमी एवढा साठा शिल्लक आहे. या साठ्यावर पाणीपुरवठा, सिंचन



आणि औद्योगिक वसाहतीचा पाणीपुरवठा अवलंबून आहे. गेल्यावर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे धरणे शंभर टक्के भरून त्यामधून विसर्ग करण्याची वेळ आली होती. यंदा मान्सूनचे अद्यापही दमदार आगमन झालेले नाही. जेमतेम ६३ मिमी पाऊस झाला आहे. पाणलोट क्षेत्रात हे प्रमाण त्यापेक्षाही कमी आहे. त्यामुळे धरणात पाण्याचा येवा होऊ शकलेला नाही. या उलट नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढली आहे. पाऊस न आल्यास शेतीसाठी ही पाणी सोडण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. दरम्यान, अप्पर वर्धा धरणात २४३ दलघमी साठा शिल्लक असून त्यावर अमरावती शहरासह ग्रामीण पाणीपुरवठा योजना व औद्योगिक वसाहतीचा भार आहे. सात मध्यम प्रकल्पांत १०३ दलघमी व ४८ लघु प्रकल्पांत ७६ दलघमी साठा शिल्लक आहे. यातील २७ लघु प्रकल्प कोरडे पडले आहेत, तर काहींनी तळ गाठला आहे. आगामी दिवसांत पाऊस न बरसल्यास भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

**पाणीसाठ्याची स्थिती दलघमी**

अप्पर वर्धा २४१. ३०, शहानुर १८.१८. चंद्रभागा २४.८७, पूर्णा २०.२३, सपन २७.४०, पंढरी १०.७२ व बोडर्डी नाला १.७० दलघमी पाणी साठा शिल्लक आहे.

# रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाच्या कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ

### लक्ष साध्य होईपर्यंत कार्य करीत रहा - डॉ. जुगल चिरानिया

**अमरावती/ का.प्र.**

ईश्वराने आपल्याला सेवा करण्याची संधी दिली असून आपण प्रत्येक जण आज मानवतेसोबत सृष्टीची सेवा करीत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी जोपर्यंत लक्ष साध्य होत नाही तोपर्यंत सेवेचे अमूल्य असे कार्य करीत राहावे असे आवाहन रोटरीचे डिस्ट्रीक सेक्रेटरी डॉ. जुगल चिरानिया यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाच्या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ नुकताच हॉटेल महफिल येथे पार पडला. या पदग्रहण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या पदग्रहण सोहळ्याला रोटरीचे पीडीजी व जबलपूर येथील उद्योजक सुनील फाटक, असिस्टंट गव्हर्नर आनंद साठे ,सुरेश मेठी ,नवनियुक्त अध्यक्ष अमोल चवणे, सचिव डॉ. लोभस घडेकर, डॉ. पूजा कोल्हे,माजी अध्यक्ष राम छुटलानी,माजी सचिव अखिलेश खेतान आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोही करवा, वल्लरी हिंडोच्या, भार्गवी वानखडे ,विनया खंडेलवाल, अन्वित वाटाणे, रियांश मोहता, रियान ढोले, विहान चिठोरे, यशस्वी चिठोरे ,सानवी राठी , यश मानकर यांनी पंढरीची वारी ,गणेश वंदना व देवस्तुती सादर केली तर डॉ. पंकज मोरे व डॉ. मनोज चिठोरे यांनी रोटरीच्या नवीन सदस्यांचा परिचय करून दिला. सोबतच निलेश खंडेलवाल व कीर्ती बोडके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.याप्रसंगी सुरेश मेठी यांनी आपल्या प्रास्ताविकातून रोटरीच्या कार्याची माहिती विशद केली तर अंबिकाच्या नवनियुक्त सचिव डॉ. पूजा कोल्हे यांनी आगामी वर्षात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचे नवनियुक्त अध्यक्ष युवा उद्योजक अमोल चवणे, सचिव डॉ. लोभस घडेकर, डॉ. पूजा कोल्हे ,कोषाध्यक्ष अमित तिडके, राम छूटलानी, गौरव वानखडे, उपाध्यक्ष स्वप्निल करवा, अमित हिंडॉच्या, अखिलेश खेतान, युगंधरा गुल्हाने, संजय बोरोडे ,अतुल कोल्हे, रवी टांक, डॉ. मोनाली ढोले, नरेंद्र खंडेलवाल, संकेत मोहता ,डॉ. प्रवीण बोडखे ,हार्दिक कक्कड, निलेश खंडेलवाल, डॉ. अंकुश मानकर या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पदाची शपथ देत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोटरीची मानाची पिन बहाल करण्यात आली.संचालन प्रवीण परिमल व पायल करवा यांनी तर सचिव डॉ. लोभस घडेकर यांनी आभार मानले. सदर पदग्रहण सोहळ्याला रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिकाचे सर्व सदस्य व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.पदग्रहण सोहळ्याचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिका कडून एचआयव्ही बाधित मुलांसाठी कार्य करणाऱ्या आधार संस्थेला विविध प्रकारे मदत करण्यात आली सोबतच गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना

# आता... एका फोनवर मोकाट प्राण्यांपासून सुटका

**अमरावती/ का.प्र.**

महापालिका क्षेत्रात मोकाट कुत्रे व जनावरांचा प्रश्न सोडविण्यासाठी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी तक्रारींची तत्काळ दखल घेत त्याचा निपटारा करण्यासाठी एका कॉलवर नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याकरिता एक टीम तयार करण्यात आली असून त्या टीम मधील अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर जारी करण्यात आले. त्यामुळे आता नागरिकांना मोकाट कुत्रे व जनावरांच्या समस्येबाबत तक्रार करून सुटका करता येईल. रस्त्यांच्या मधोमध बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळेसुद्धा दुर्घटना घडल्या आहेत. मोकाट जनावरांना पकडल्यास त्यांना ठेवण्यासाठी महापालिकाकडे गोरक्षण व गोसेवा केंद्र आहेत, मात्र कुत्र्यांना पकडून ठेवायचे कुठे किंवा त्यांच्यावर काय कारवाई करावी याबद्दल स्पष्ट गाईडलाईन नसल्याने कुत्र्यांना पकडून ठेवण्यासाठी शेल्टर हाऊस पविण्यात आले.महापालिका क्षेत्रात रहाटगाव व कोळेश्वर ये शेल्टर हाऊस बनविण्याचे काम पूर्ण झाला. त्यामुळे आता मोकाट जनावरे व कुत्रे पकडण्याची कारवाई महापालिका प्रशासनाने सुरू केले. यासंदर्भात पाच कर्मचा-यांची नियुती करण्यात आली असून हेल्पलाईन क्रमांक सुद्धा प्रसिद्ध करणार आहे. फोनवर या समस्या सांगून त्याचा निपटारा करू शकतील.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय




### परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चंद्रकांता नगरमध्ये

# शिक्षणतज्ज्ञ डहाके यांच्या घरावर दरोडा

## चाकूचा धाक दाखवत लाखोंची लूट

**अचलपूर/प्रतिनिधीः** - अमरावती जिल्ह्यातील परतवाडा शहरातील नामांकित शिक्षणसंस्था चालक आणि समाजसेवक जानराव डहाके यांच्या राहत्या घरावर मध्यरात्रीच्या सुमारास दरोडेखोरांनी चाकूचा धाक





दाखवत जबर हल्ला करत १५ ते २० लाख रुपयांची मौल्यवान वस्तू आणि रोकड लुटून नेल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ही घटना चंद्रकांता☞(पान २ वर)

### स्थानिक आरोपींचा संशय

दरोडेखोर २० ते २५ वयोगटातील असून ते मराठी भाषेत बोलत असल्याने पोलिसांनी त्यांच्यावर स्थानिक आरोपींचा संशय व्यक्त केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही अटक झाली नाही.

### घटनेनंतर पोलिसांची धावपळ

घटनेनंतर जानराव डहाके यांनी कसाबसा स्वतःला मुक्त करत पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच परतवाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी, गुन्हे शाखा, आणि डॉग स्क्वॉड घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करत सीसीटीव्ही फुटेज आणि परिसरातील मोबाइल नेटवर्क्सचा मागोवा घेत तपास सुरू केला आहे.

# माजी मंत्री जगदीश गुप्ता ७ जुलै रोजी घेणार शिंदे सेनेत प्रवेश

## जवळपास १०० समर्थक जाणार सोबत



**अमरावती/प्रतिनिधीः** - गेल्या दोन-तीन महिन्यापासून माजी मंत्री जगदीश गुप्ता यांच्या शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याच्या चर्चा जोरावर होत्या. आता या चर्चांना विराम लागणार आहे. जगदीश गुप्ता आपल्या समर्थकांसह सोमवार सात जुलै रोजी सायंकाळी सात वाजता शिंदे सेना मध्ये प्रवेश करणार आहे. त्यांच्या सोबत त्यांचे जवळपास १०० समर्थक शिंदे गटात जाणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा त्यांच्या प्रवेशावर मंजुरी दिली आहे. माहिती अनुसार जगदीश गुप्ता गेल्या ३० वर्षापासून भारतीय जनता पार्टी सोबत जुळले होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हिंदुत्वाचा नारा देत पार्टी सोबत बगावत करून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. यामुळे त्यांना भाजपामधून निष्कासित करण्यात आले होते. त्यांच्या विरोधात महायुती उमेदवार म्हणून सुलभा खोडके यांनी निवडणूक लढविली होती आणि त्या विजयी झाल्या.निवडणूक झाल्यावर त्यांना विश्वास होता की त्यांना पुन्हा भाजपा मध्ये बोलावले जाईल, पण पार्टीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी मोदी भक्त असणारे जगदीश गुप्ता यांनी शिंदे सेना मध्ये जाण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा हिंदुत्वाचा नारा दिलेला आहे आणि निवडणूक आयोगाने त्यांना शिवसेने चा नाव आणि चिन्ह दिलेला आहे. त्यामुळे हिंदुत्व विचारधारावर चालणाऱ्या जगदीश गुप्ता यांनी शिंदे सेना मध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.☞(पान २ वर)

# दर्यापूर तहसिलच्या नविन इमारतीचे उद्घाटन केव्हा?

**सद्यस्थितीत तहसिल चालत आहे अपुऱ्या जागेत**

## नविन इमारत उद्घाटनाच्या प्रतिक्षेत,

**खल्लार /प्रतिनिधी :-** तालुका स्तरावर तहसिल कार्यालय हे नागरिकांसाठी महत्त्वाचे कार्यालय मानले जाते अनेक शासकीय कागदपत्रांची नोंद, शेतीची नोंद तहसील दप्तरी असते. सद्यस्थितीत वर्ग अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी



अनेक कागदपत्रांची जुळवाजुळक करावी लागत आहे. त्यामध्ये कास्ट सर्टिफिकेट, नॉन क्रिमिलियर, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, सातबारा, ☞(पान २ वर)

# पेट्रोल टँकरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

## इर्विन ते राजापेठ उडानपुलावर भीषण अपघात



**अमरावती/प्रतिनिधी:-** स्थानिक इर्विन चौक ते राजापेठ उड्डाण पुलावर गुरुवार ३ जुलै च्या दुपारच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. पेट्रोलने भरलेल्या टँकरने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर उड्डाण पुलावर वाहतूक काही वेळी खोळंबली होती. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत केली. वर्षा सोपान कांळगे (५२, ग्रीन पार्क अपार्टमेंट, अर्जुन नगर, शेगांव नाका) मृत महिलेचे नाव आहे. माहितीनुसार अर्जुन नगर निवासी वर्षा काळंगे आज गुरुवार असल्यामुळे साईनगर येथील साईबाबा मंदिरात दर्शनासाठी जात होती. त्यावेळी इर्विन चौक ते राजापेठ चौकापर्यंत असलेल्या





उड्डाण पुलावर वर्षाच्या स्कुटी एमएच २७ डीसी ९००८ ला पेट्रोलने भरलेल्या ट्रॅकर एमएच २७ बी एक्स ७४५९ ने जोरदार धडक दिली. या धडकेत वर्षा काळंगे खाली पडल्या.यानंतर ट्रॅकरच्या चाकाखाली सापडल्या त्या गंभीर जखमी झाल्या. पंधरा मिनिटे पर्यंत त्या तिथेच तडफडत होत्या पण कोणीही त्यांच्याकडे लक्ष दिले नाही, त्यांना मदत करण्याऐवजी नागरिक फोटो आणि व्हिडिओ काढण्यामध्ये मग्न होते. यामुळे त्यांची रुग्णालयात घेऊन जातात मृत्यू झाल. या घटनेमुळे माणुसकी कुठे गेली हा प्रश्न उत्पन्न झालेला आहे ? ☞(पान २ वर)

# नारायणपूर मध्ये बिल्डर डहाकेंच्या घरी दरोडा

## चाकूच्या धाकवर लुटले १.१० लाख रोख , ९० ग्राम सोना व २०० ग्राम चांदी

### परतवाडा पोलीस घेत आहे तीन बदमाशांचा शोध

**परतवाडा/प्रतिनिधी : -** परतवाडा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या नारायणपूर ग्रामपंचायत क्षेत्रातील विश्वकर्मा कॉलनी मध्ये राहणाऱ्या ख्यातनाम बिल्डर जानराव डहाके यांच्या घरात गुरुवारच्या मध्यरात्री अज्ञात तीन बदमाश्यांनी शिरून चाकूच्या धाकवर १ लाख १० हजार रोख, ९० ग्राम सोने व २००



ग्राम चांदी लुटली आणि फरार झाले. डहाके यांनी विरोध केला तर आरोपींनी त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. यामध्ये त्यांच्या हातावर जखमा झाले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर



घाबरलेल्या डहाके दांपत्यांनी आज गुरुवार तीन जुलैच्या सकाळी परतवाडा ठाण्यात जाऊन घटनेची तक्रार दिली त्यांनी संपूर्ण घटनाक्रम पोलिसांना सांगितले.☞(पान २ वर)

# मुलींचे अश्लील व्हिडिओ इन्स्टा वर टाकणारे पाच आरोपी गजाआड

**फ्रेजरपुरा पोलिसाची यशस्वी कामगिरी**

**अमरावती/प्रतिनिधी:-** रस्त्यावरून जाणाऱ्या मुलींचे लपून-छपून व्हिडिओ काढून त्यामध्ये एडिटिंग करून रील बनवून इंस्टाग्रामवर अपलोड करणाऱ्या पाच आरोपींना फ्रेजरपुरा डीबी स्कॉडच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. शेख फैजान शेख कादर (१९,ताज नगर), शेख साकीब उर्फ सोनू शेख याकूब (२०, अलीम नगर), मुदत्सीर खान अनिस खान (२०,ताज नगर ),जय संतोष सरसे (२१ चपरासीपुरा) व आयुष राजेश किल्लेकर (२१,



चपरासीपुरा) अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. माहितीनुसार डीबी पथक मधील कर्मचारी ☞(पान २ वर)

### तत्काळ ११२ वर करा फोन

पोलीस आयुक्तालय हद्दीत युवक युवतींना पोलीस विभागात द्वारा आवाहन करण्यात आले आहे की, जर सार्वजनिक ठिकाणी आपले संमती बिना कुणीही व्हिडिओ शूटिंग काढून सोशल मीडिया साईटवर पोस्ट प्रसारित करीत असेल तर त्याबाबत तत्काळ माहिती संबंधित पोलीस स्टेशन, पोलीस ☞(पान २ वर)

# एएसआय अब्दुल कलाम कुटुंबीयांना न्याय द्या

**निवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी असो.ची मागणी**

**अमरावती/प्रतिनिधी:** वलगाव पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत पोलीस उपनिरीक्षक अब्दुल कलाम अब्दुल कदिर यांची २८ जून रोजी कर्तव्यावर जात असताना पाच ते सहा आरोपींनी मिळून धारदार शस्त्राने हत्या केली. एका पोलीस अधिकारी च्या या प्रकारे झालेल्या हत्याचा असोसिएशनने निषेध केला आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय दिल्या जाण्याची मागणी आज गुरुवार ३ जुलै रोजी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया



यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. निवेदनात म्हटले आहे की एका पोलीस अधिकाऱ्याच्या असे निर्दयपणे खून करणे ही जिल्ह्याच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे. पोलीस अधिकाऱ्याची अमानुषपणे हत्या होत असेल☞(पान २ वर)

# सावत्र बापाने केली चिमुकल्या मुलाची हत्या

## संपत्तीत वाटेकरी नको म्हणुन अघोरी डाव

### वडील सह अंजनगाव सुर्जी येथील दोघाना घेतले ताब्यात

**अकोला / प्रतिनिधी :-** अमरावती जिल्ह्यातील अकोटमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला आहे.





एका ९ वर्षीय अल्पवयीन मुलाचा निर्घृणपणे खून करून मृतदेह अकोला आणि अमरावती जिल्ह्याच्या सीमेवरील जंगलात फेकून देण्यात आला. सावत्र वडिलांनी मित्राच्या मदतीने या नऊ वर्षीय मुलाची निर्घृणपणे हत्या केलीय. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. दरम्यान,☞(पान २ वर)

### ३०० रुपयांसाठी हत्याकांडात सहभागी

मिळालेल्या माहितीनुसार गौरव गायगोले याने ३०० रुपयांसाठी त्याचा मित्र अर्थातच मारेकरी सावत्र बापाला हत्याकांडात मदत केली. दोघांनी मिळून दर्शनचा खून केला आहे. दरम्यान मृतक दर्शनाच्या वर लैंगिक छळ झाल्याच प्राथमिक रित्या समजत आहे,मात्र शव विच्छेदनाच्या अहवालानंतरच सर्व बाबी समोर येतील, असे पोलिसांनी सांगितले.

### गळा आवळून दर्शनची हत्या

सावत्र वडील आकाश आणि त्याचा मित्र गौरव या दोघा जणांनी दर्शनला दुचाकीवर नेत त्याचा खून केला. त्यानंतर दर्शनचा मृतदेह अमरावती अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील जंगल परिसरात टाकून दिला. यामुळे खळबळ उडाली.

# तलवार आणि देशी पिस्तूल सह एकाला घेतले ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधी:-** साईनगर परिसरातील साईकृपा कॉलनी येथे राजापेठ डीबी पथकाने कार्यवाही करून तलवार आणि देशी पिस्तोल सह आरोपी अब्दुल शफिक अब्दुल हफिज (३०,बिस्मिल्ला नगर, लाल खाली रोड ) याला ताब्यात घेतले. त्यांच्या कडून २० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीला ५ जुलै पर्यंत पी सी आर देण्यात आलेला आहे. राजापेठ डीबी पथक पेट्रोलिंग करीत असताना एक संशयित पांढऱ्या रंगाची कार साई मंदिर कडे येताना दिसली. सदर वाहनास ☞(पान २ वर)

# मेंढपाळांना दिलासा : चराईवर वनविभागाची बंदी नाही

**बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश, मंत्रालयात निर्णय**

**मुंबई-अमरावती/प्रतिनिधी:** - प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत मेंढपाळांना दिलासा देणारा निर्णय निगर्मीत करण्यात आला.मुंबई मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत वनविभागाच्या क्षेत्रात मेंढपाळांना चराईस बंदी घालण्यात येणार नाही असा स्पष्ट निर्णय घेण्यात आला.या निर्णयामुळे मेंढपाळांचा चराईचा मोठा प्रश्न मिटला आहे. शिवाय मंत्रालयात इतर विभागाच्या वतीने देखील बच्चू कडू यांच्या मागण्यांवर देखील निर्णय घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट संकेत आहे. या



बैठकीस बच्चू कडूंसह संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेत बच्चू कडू यांनी सविस्तरपणे मेंढपाळ व धनगर समाजाच्या समस्या मांडल्या. यानंतर सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला.शेतकरी, ☞(पान २ वर)

**जाहीर सुचना**

सर्व आम जनतेस याव्दारे सुचित करण्यात येते की, **माझे पक्षकार नामे श्री.श्रीकांत नारायणरावजी दातेराव,** रा.दातेराव मंगल कार्यालय, राजापेठ, अमरावती यांनी **श्री अविनाश प्रमोद उगले व श्री आनंद दत्तात्रय बारब्दे,** दोघेही रा.वलगांव,ता.जि.अमरावती व त्यांनी **श्री विनोद यशवंतरावजी इंगळे,** रा.नवी मुंबई, खारघर, रायगड यांचेकडून निम्नवर्णीत मिळकत विकत घेण्याचा सौदा केला असून सदर मालमत्ता ही लिहून देणार यांचे एकमेव मालकी व ताब्यातील आहे.मिळकतीचे वर्णन :-

नोंदणी पोट तुकडी भातकुली ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद, अमरावतीचे हददीतील **मौजे खारतळेगाव भाग २**,प्रगणे नांदगाव पेठ, ता.भातकुली जि.अमरावती येथील **भूमापन क्रमांक व उपविभाग १३७,** भोगवटदार वर्ग १ यांचे **एकुण क्षेत्रफळ ३ हे ५४ आर.** आ.रु.४.४६ पैसे, शेतजमीन यापैकी २ हे १७ आर आणि **आता मोजणीनंतर ताब्यात असलेले १ हे ९९ आर.शेतजमीन** खरेदी करण्याचा लेखी करार केलेला आहे व सदर कराराच्या अटी व शर्ती नुसार १५ दिवसांमध्ये खरेदी आहे. सदर शेताची चतुःसिमा : पुर्वेस - याच गट नंबर मधील श्री भागवत यांना दिलेला १ हे २१ आर. शेतजमीन व नंतर गोविदराव जानवाडे यांचे शेत, पश्चिमेस : सिदीकी अनवर यांचे शेत, उत्तरेस- गोविंदराव जानवाडे यांचे शेत, दक्षिणेस - अमरावती-दर्यापूर रोड व याच शेतातील उर्वरित भाग.

येणेप्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील शेतजमीनीची **खरेदी दिनांक १७/०७/२०२५** रोजी ठरलेली असून सर्व लोकांना, भागीदारी, पेढी,कंपनी, बँका, सहकारी संस्था व इतर सर्व जनांना या जाहीर सूचनेव्दारे कळविण्यात येते की, सदर करारनामा व होत असलेल्या खरेदीबददल कोणतेही आक्षेप असल्यास दिनांक १५/०७/२०२५ किंवा त्यापूर्वी निम्नलिखित पत्यावर लेखी स्वरुपात आपले आक्षेप नोंदवावे, यानंतर आपले कोणतेही उजर चालणार नाही, याची नोद घ्यावी.

सही/-
**ॲड.गिरीश दादारावजी धर्माळे**
**विद्याभारती कॉलेज समोर, कॅम्प रोड, अमरावती, मो.- ९२२५७२३५२३**

दिनांक : ०३/०७/२०२५